# लोकसभेतील महिला नेतृत्वाचा एक अभ्यास (२००४–२०१४)

संशोधक
सौ.स्वाती सदाशीव कुराडे

मार्गदर्शक
डॉ.माणिक सोनवणे
(राज्यशास्त्र विभाग, एन.आय.एस.एस.)
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ
तात्विक आणि सामाजिक शास्त्रे विद्याशाखांतर्गत राज्यशास्त्र
विषयाच्या विद्यानिष्णात (एम.फिल.) पदवीसाठी
सादर केलेला संशोधन अहवाल

एप्रिल–२०१९

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे

# प्रतिज्ञापत्र

मी प्रतिज्ञापूर्वक निवेदन करते की, **''लोकसभेतील महिला नेतृत्वाचा एक अभ्यास (२००४–१४)''** या विषयातील प्रबंध मी स्वतः लिहिलेला असून तो **टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या राज्यशास्त्र या विषयात एम.फिल पदवीसाठी सादर** केला आहे. हा शोध प्रबंध अन्य कोणत्याही विद्यापीठात या स्वरुपात कोणीही सादर केलेला नाही. तसेच मी देखिल तो अन्य विद्यापीठात सादर केलेला नाही.

स्थळ : पुणे

दिनांक :

**संशोधक**

**(सौ.स्वाती कुराडे)**

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, **सौ.स्वाती सदाशिव कुराडे** यांनी **टिळक महाराष्ट्र विद्यापीठ मध्ये, सामाजिक शास्त्रे विद्या शाखाअंतर्गत राज्य शास्त्र विषयातील एम.फिल पदवीसाठी** सादर केलेल्या **''लोकसभेतील महिला नेतृत्वाचा एक अभ्यास (२००४–२०१४)''** या शोध प्रबंधासाठी केलेले संशोधन कार्य माझ्या मार्गदर्शनाखाली पुर्ण केले असून अन्य कोणत्याही विद्यापीठात, अन्य कोणत्याही पदवी अथवा प्रमाणपत्रासाठी सादर केले नाही. या विषयातील केलेले संशोधन कार्य मुळ आणि अस्सल असून ते एम.फिल पदवीसाठी योग्य आहे.

स्थळ : पुणे

दिनांक :

डॉ.माणिक सोनवणे
राज्यशास्त्र विभाग,
नेहरु सामाजिक शास्त्रे विद्यास्थान,
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

# ऋणनिर्देश

लोकसभेतील महिला नेतृत्वाचा एक अभ्यास (२००४-१४) हा प्रबंध मी एम.फिल साठी सादर करीत आहे. त्यासाठी मला माझे **मार्गदर्शक डॉ.माणिक सोनवणे** (राज्यशास्त्र, नेहरू सामाजिक शास्त्रे विद्यास्थान, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे) यांचा बहुमोल पाठींबा व योग्य मार्गदर्शन मिळाले. त्यामुळे मी त्यांचे मन:पूर्वक आभार मानते. तसेच विभाग प्रमुख, नेहरू सामाजिक शास्त्रे विद्यास्थान, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे **डॉ.विशाल जाधव** सर यांचेही मन:पूर्वक आभार मानते. त्याचबरोबर विद्याशाखेचे अधिष्ठाता **डॉ.बी.डी.कुलकर्णी** सरांनी वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शन व सहकार्यामुळे मी त्यांची ऋणी राहील. राज्यशास्त्र विभागातील सहाय्यक **प्रा.ओंकार केणे** सरांनी वेळोवेळी मदत केली, त्यामुळे त्यांचेही आभार. श्री शाहू मंदिर महाविद्यालय, राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ.वैशाली पवार मॅडम यांचे आभार.

तसेच ग्रंथालयातील विविध पुस्तके देवून सहकार्य केल्याबद्दल ग्रंथपाल प्रमुख यांचेही आभार. प्रा.सचिन मरळे, प्रा.नवनाथ कुचेकर, तसेच पक्ष कार्यालयातील सेवक, पर्सनल असिस्टंट यांचे सहकार्य लाभल्यामुळे यांचेही आभार.

प्रोजक्टचे पेज ले-आऊट, टायपींग, करेक्शन, सेटींग इ. कामात गौरव एन्टरप्रायजेस चे श्री.राम देशमुख सर यांनी योग्य ती मदत केल्याबद्दल त्यांचेही आभार.

संशोधन कार्यासाठी भरपुर वेळ देऊन सहकार्य केल्याबद्दल आई-वडील, सासू-सासरे, बहिण-भाऊ माझे पती श्री.संदीप पाटील, मुलगी कु.वेदा यांचेही मन:पूर्वक आभार मानते.

स्थळ : पुणे — संशोधक

दिनांक : — (सौ.स्वाती सदाशीव कुराडे)

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | तपशील | पान नं. |
|---|---|---|
| | **मुखपृष्ठ** | i |
| | **प्रतिज्ञापत्र** | ii |
| | **प्रमाणपत्र** | iii |
| | **ऋणनिर्देशन** | iv |
| | अणुक्रमणिका | v |
| | तक्तासूची | |
| | आलेख सूची | |
| **प्रकरण १** | **प्रस्तावना** | **१–६३** |
| | १.१ प्रस्तावना | १-४४ |
| | १.२ भारतीय स्वातंत्र्य चळवळीत स्त्रियांचा सहभाग | ३ |
| | १.३ महिला सबलीकरण | १३ |
| | १.४ संसद निर्मितीची ऐतिहासिक पार्श्वभूमी | १८ |
| | १.५ भारतीय संविधानाची जडण घडण | ३३ |
| | १.६ प्रतिनिधिक शासनाचा विकास | ३५ |
| | १.७ लोकसभेची विश्लेषणात्मक माहिती | ३८ |
| | १.८ नेतृत्वाचे संकल्पनात्मक विश्लेषण | ४४ |
| **प्रकरण २** | **सदंर्भ साहित्याचा आढावा** | ६४-७२ |
| | २.१ प्रस्तावना | ६४ |
| | २.२ संबांधित साहित्याचा आढावा | ६४ |
| | २.३ गत संशोधनाचा आढावा | ७१ |
| | २.४ समारोप | ७२ |

| | | |
|---|---|---|
| **प्रकरण ३** | **संशोधन कार्यपद्धती** | ७४-८२ |
| | ३.१ प्रस्तावना | ७४ |
| | ३.२ संशोधन प्रश्न | ७५ |
| | ३.३ संशोधन विषयाचे महत्त्व | ७५ |
| | ३.४ संशोधन विषयातील परिभाषिक संज्ञा | ७९ |
| | ३.५ संशोधनाची उद्दिष्टे | ८० |
| | ३.६ संशोधनाची गृहितके | ८० |
| | ३.७ संशोधन पद्धती | ८१ |
| | ३.८ तथ्य संकलनाची साधने | ८१ |
| | ३.९ संशोधन अध्ययनाची व्याप्ती | ८१ |
| | ३.१० संशोधनाच्या मर्यादा | ८१ |
| | ३.११ प्रकरणांची योजना | ८२ |
| **प्रकरण ४** | **तथ्य विश्लेषण आणि अर्थनिर्वचन**<br>**( लोकसभेतील महिला नेतृत्वाच्या अभ्यासाचे विश्लेषण)** | ८३-८७ |
| | **भाग– एक**<br>४.१  २००४ च्या निवडणुकीची माहिती व विश्लेषण<br>४.२ २००९ च्या निवडणुकीची माहिती व विश्लेषण<br>४.३ २०१४ च्या निवडणुकीची माहिती व विश्लेषण | ८८-११२ |
| | **भाग – २**<br>लोकसभेमधील महिला नेतृत्वाच्या मुलाखतीमधील माहितीचे विश्लेषण, तक्ते, व आलेख यांचे सादरीकरण | ११३-१३३ |
| **प्रकरण ५** | **सारांश,निष्कर्ष, शिफारशी** | १४५-१५१ |
| | ५.१ प्रस्तावना | १४५ |

| | | |
|---|---|---|
| | ५.२ सारांश | १४५ |
| | ५.३ निष्कर्ष | १४६ |
| | ५.४ गृहितकांची पडताळणी | १४७ |
| | ५.५ शिफारशी | १४८ |
| | ५.६ पुढील संशोधनाची दिशा | १४९ |
| | **संदर्भ ग्रंथ सूची** | १५१ |
| | **परिशिष्ट्ये** | १५२-१७५ |
| | १. प्रश्नावली | १५२ |
| | २. फोटो | १५६ |
| | ३. राष्ट्रीय महिला सशक्तीकरण धोरण -२००१ | १५७ |
| | ४. नकाशे | १७२-१७५ |

# तक्तासूची


| अ.क्र. | तक्तासूची | पान नं. |
| --- | --- | --- |
| **प्रकरण १** | | |
| तक्ता क्र. १ | लोकसभा महिलांचे प्रतिनिधीत्व आणि टक्केवारी ( २००४ ते २०१४) | १८ |
| तक्ता क्र. २ | लोकसभेतील महिलांची पक्षनिहाय संख्या (२००४ ते २०१४ ) | १८ |
| तक्ता क्र. ३ | लोकसभा राज्यनिहाय प्रतिनिधीत्व | ३९ |
| तक्ता क्र. ४ | जागतिक साधण प्रतिनिधीत्व टक्केवारी | ४० |
| तक्ता क्र. ५ | भारतीय लोकसभेतील महिला खासदार | ४१ |
| **प्रकरण ४** | | |
| तक्ता क्र. ४.१ | राज्यनिहाय महिला प्रतिनिधीत्व / सदस्य-२००४ | ८५ |
| तक्ता क्र. ४.२ | राज्यनिहाय महिला प्रतिनिधित्व/ सदस्य-२००९ | ८६ |
| तक्ता क्र. ४.३ | राज्यनिहाय महिला प्रतिनिधीत्व / सदस्य-२०१४ | ८७ |
| तक्ता क्र. ४.४ | महिला पुरुष घटकांनुसार खासदारांचे वर्गीकरण (२००४) | ८८ |
| तक्ता क्र. ४.५ | केंद्रिय लोकसभेतील मतदारसंघ निहाय महिला सदस्य (२००४) | ८९ |
| तक्ता क्र. ४.६ | महिला खासदारांचे पक्षनिहाय वर्गीकरण (२००४) | ९१ |
| तक्ता क्र. ४.७ | २००४ – महिला खासदार पक्ष | ९३ |
| तक्ता क्र. ४.८ | महिला खासदारांना मिळालेली मते (२००४) | ९५ |
| तक्ता क्र. ४.९ | महिला खासदाराचे प्रवर्गानुसार वर्गीकरण (२००४) | ९७ |
| तक्ता क्र. ४.१० | महिला पुरुष घटकानुसार खासदारांचे वर्गीकरण (२००९) | ९९ |
| तक्ता क्र. ४.११ | केंद्रिय लोकसभेतील मतदारसंघ निहाय महिला सदस्य (२००९) | १०० |
| तक्ता क्र. ४.१२ | महिला खासदारांचे पक्षनिहाय वर्गीकरण (२००९) | १०३ |
| तक्ता क्र. ४.१३ | २००९ – महिला खासदार पक्ष | १०५ |
| तक्ता क्र. ४.१४ | महिला खासदारांना मिळालेली मते (२००९) | १०७ |

| | | |
|---|---|---|
| तक्ता क्र. ४.१५ | महिला खासदाराचे प्रवर्गानुसार वर्गीकरण (२००९) | १०९ |
| तक्ता क्र. ४.१६ | महिला पुरुष घटकानुसार खासदारांचे वर्गीकरण (२०१४) | ११३ |
| तक्ता क्र. ४.१७ | केंद्रिय लोकसभेतील मतदारसंघ निहाय महिला सदस्य (२०१४) | ११३ |
| तक्ता क्र. ४.१८ | महिला खासदारांचे पक्षनिहाय वर्गीकरण (२०१४) | ११६ |
| तक्ता क्र. ४.१९ | २०१४ – महिला खासदार पक्ष | ११९ |
| तक्ता क्र. ४.२० | महिला खासदारांना मिळालेली मते (२०१४) | १२० |
| तक्ता क्र. ४.२१ | महिला खासदाराचे प्रवर्गानुसार वर्गीकरण (२०१४) | १२३ |
| तक्ता क्र. ४.२२ | २००४  मंत्रीपदे | १२७ |
| तक्ता क्र. ४.२३ | २००९ मंत्रीपदे | १३० |
| तक्ता क्र. ४.२४ | २०१४ मंत्रीपदे | १३२ |
| तक्ते व आलेख | मुलाखतीच्या माध्यमातून मिळविलेल्या माहितीचे तक्ते आणि आलेख | १३९-१४४ |

# आलेख सूची


| अ.क्र. | आलेख सूची | पान नं. |
|---|---|---|
| **प्रकरण १** | | |
| आलेख क्र.४.१ | राज्यनिहाय महिला प्रतिनिधीत्व / सदस्य–२००४ | ८९ |
| आलेख क्र.४.२ | राज्यनिहाय महिला प्रतिनिधित्व/ सदस्य–२००९ | ९४ |
| आलेख क्र.४.३ | राज्यनिहाय महिला प्रतिनिधीत्व / सदस्य–२०१४ | ९९ |
| आलेख क्र.४.४ | महिला पुरुष घटकांनुसार खासदारांचे वर्गीकरण (२००४) | १०० |
| आलेख क्र.४.५ | केंद्रिय लोकसभेतील मतदारसंघ निहाय महिला सदस्य (२००४) | १०६ |
| आलेख क्र.४.६ | महिला खासदारांचे पक्षनिहाय वर्गीकरण (२००४) | ११२ |
| आलेख क्र.४.७ | २००४ – महिला खासदार पक्ष | ११३ |
| आलेख क्र.४.८ | महिला खासदारांना मिळालेली मते (२००४) | १२० |
| आलेख क्र.४.९ | महिला खासदाराचे प्रवर्गानुसार वर्गीकरण (२००४) | १२६ |
| आलेख क्र.४.१० | महिला पुरुष घटकानुसार खासदारांचे वर्गीकरण (२००९) | १२८ |
| आलेख क्र.४.११ | केंद्रिय लोकसभेतील मतदारसंघ निहाय महिला सदस्य (२००९) | १३० |
| तक्ते व आलेख | मुलाखतीच्या माध्यमातून मिळविलेल्या माहितीचे तक्ते आणि आलेख | १३९-१४४ |

# प्रकरण पहिले
# संशोधन विषयाचे शीर्षक
# 'लोकसभेतील महिला नेतृत्वाचा अभ्यास'
# (२००४ ते २०१४)

## १.१ प्रस्तावना :

'लोकसभेतील महिला नेतृत्वाचा अभ्यास' वा विषयांचे अध्ययन करित असताना प्राचीन काळापासन ते सध्य स्थितीपर्यंत स्त्रियांचे स्थान कशाप्रकारे होते यांचा शोध घेणे महत्त्वाचे ठरते, कारण महिला सबलीकरणची वाटचाल आजपर्यंत कशी राहिली आहे तसेच त्यास कोणते घटक पूरक होते आणि कोणते घटक प्रतिकूल होते इ. चा आढावा घेतल्याने माहिती प्राप्त होते.

स्त्रियांच्या बाबतीत जगतील इतर देशाप्रमाणे भारतीय समाजातील स्त्रियांचे प्रश्न देखील महत्त्वाचे बनले, खरे पाहता, उत्तर वैदिक काळापासुन स्त्रियाच्या समस्याना सुरवात झाली. चार भिंतीच्या आतच त्यांचे जीवन कोंडले हेते. अठराव्या शतकापासून स्त्री प्रश्नांना वाचा फुटू लागली. अनेक समाजसुधारकांनी सामाजिक बंधने, वाईट चालीरिती यातून सूटका करण्याचे महत्त्वाचे कार्य केले.

भारतीय संस्कृतीला खूप मोठी परंपरा आहे. भारतात अनेक राजे, महाराजे होऊन गेले तरीही भारतीय संस्कृती ही अखंड आणि चिरंतन राहिली आहे. आधुनिक काळातील स्त्रीचे स्थान लक्षात घेण्यासाठी प्राचीन काळापासुन तिचे स्थान कसे होते हे जाणून घेतले पाहिजे विविध काळात त्यात कशाप्रकारे बदल होत गेले हे पाहिले पाहिजे.

प्राचीन वैदिक काळात स्त्रियांना फार मोलाचे स्थान दिले जात असते. त्या काळातील स्त्रिया सर्व क्षेत्रात पुरुषाबरोबर कार्यरत होत्या. माता, पत्नी, बहिण म्हणुन तिची पुजा होत असे. ज्ञान, शक्ती, संपत्ती, विद्‌वत्ता या सर्वांची अधिष्ठाती देवता ही स्त्री आहे म्हणुन तिला सरस्वती, दुर्गा, लक्ष्मी या नावाने ओळखले जाते.[१]

उत्तर वैदिक काळात मात्र स्त्रियांचे स्थान बदलत गेले. समाजात स्त्री आणि पुरुष असे दोन घटक निर्माण केल्याने स्त्रियांना कनिष्ठ दर्जा देण्यात आला. मनुस्मृती ग्रंथात तर स्त्री आणि पुरुष यांच्यासाठी वेगवेगळे नियम असल्याचे दाखले आहेत. स्त्रियांन पुरुषांच्या आधारानेच त्यांचे जीवन जगावे लागत असते. बालपणी पित्यावर, तरुणपणी पतीवर तर वार्धक्यात मुलांवर अवलंबुन रहावे लागत असते. चुल आणि मूल एवढेच स्त्रिचे कार्यक्षेत्र बनले. त्यामुळे घरच्या चार भिंतीच्या आत तिला नेहमी बंदिस्त रहावे लागत असे. यास्तव तिच्या कडे नेहमी भौतिक वस्तू म्हणुनच पाहिले जात असे. यामुळे महिलांना कोणतेही अधिकार प्राप्त झाले नव्हते. धार्मिक स्वातंत्र्य, संचार स्वातंत्र्य हिरावून घेण्यात आले हेते. विवाहाचे वय कमी करण्यात आले होते. मनुने विवाहाचे वय तर केवळ आठ वर्षेच केलेले होते. त्यामुळे महिलांचे शैक्षणिक जीवनच खुंटले, मुलींचे उपनयन करण्याची प्रथा बंद झाली. वैदिक मंत्र ऐकण्यास देखील स्त्रीयांना परवानगी दिली जात नसे.

नारद स्मृतीमध्ये देखील स्त्रियांना स्वातंत्र्य देणे इष्ट नाही असा पुरस्कार केला गेला. मनुस्मृतीमध्ये काही वाईट चालिरिती वगळता स्त्रियंना चांगला दर्जा होता. मनुस्मृतीमध्ये जेथे नारी पूजा केली जाते तेथे देवता वास करते असे म्हटले आहे. काही स्मृती सती प्रथेचे समर्थन करतात तर काही सतीच्या चालीचा निशेष करतात. स्त्रियांना संपत्तीत हक्क होता. [२]

प्राचीन काळाप्रमाणे मध्ययुगीन काळातही स्त्रियांवर अनेक निर्बंध होते. प्राचीन काळातील अनिष्ट सामाजिक चालिरिती व रुढी याही काळात तशाच चालू राहिल्या किंबहूना यापेक्षा अधिक जाचक व कठोर बनल्या. स्त्रीयांचा शैक्षणिक हक्क नाकारण्यात आला होता तसेच त्यांना पुरुषांच्या बरोबरीने काम करण्यात येत नव्हते.

त्यामुळे तिच्यावरील अन्याय अधिक खोलवर रुजत गेले. मध्ययुगातच मुस्लिम स्त्रियांमध्ये पडदा पध्दती आणि वधुपित्याकडून हुंडा घेण्याची पध्दत रुढ झाली, सती प्रथा सुरु झाली. वेश्यांना सामाजिक व्यवस्थेचे अंग म्हणुन पाहिले जाऊ लागले. बालविवाह, वरदक्षिणा, कुळ –गोत्र पाहून विवा या प्रमुख चालिरिती होत्या. तत्कालीन स्त्रिया पुरुष वर्चस्वाखालीच असत. [३]

संतकाळात स्त्री – पुरुष असा भेदभाव केला जात नसते. स्त्रियांना नितीमुल्ये व सदाचाराचे शिक्षण दिले गेले. मुक्ताबाई, कान्होपात्रा, संत जनाबाई संत सखू इ. श्रेष्ठ संत स्त्रिया वारकरी संप्रदायाच्या होवून गेल्या. हा संप्रदायच क्षमतेवर आधारित हे कान्होपात्रा ही वेश्येची कन्या होती तर संत जनाबाई ही शुद्र दासी होती.[४]

एकोणिसाव्या शतकात लोकहितवादी, आगरकर, म. फुले, ताराबाई शिंदे या समाजसुधारकांनी समाजातील अनिश्ट रुढी, प्रथा, चालिरिती, अंधश्रध्दा, दैववाद, ब्राम्हणांचे वर्चस्वी यावर टीका केली होती त्याचा परिणाम व ख्रिश्चन मिशनरीवरील गोष्टींवर केलेली टीका म्हणून त्यांचे प्रश्न हळूहळू कमी होत गेले. समाजात विज्ञाननिष्ठा व बुध्दिवाद वाढत गेला.

बंगालमधील प्रसिध्द समाजसुधारक पं. ईश्वरचंद्र विदयासागर हे विधवांच्या विवाहाचे समर्थक व बहुपत्नी प्रथेचे कट्टर विरोधक होते. त्यांच्याच प्रयत्नामुळे ब्रिटिश सरकारने विधवा पुनर्विवाह १९५६ मध्ये पास केला. वैदिक साहित्याच्या अभ्यासातुन त्यांनी सिध्द केले की, वेदांमध्ये विधवा विवाहास मान्यता होती.

१८७२ मध्ये सिव्हिल मॅरेज ॲक्ट पास झाला त्यानुसार मुलीचे वय कमीत कमी १४ व मुलाचे वय १८ ठरवण्यात आले.

१९८१ चा 'एज ऑफ कन्सर्ट ॲक्ट' या कायदयानुसार १२ वर्षाखालच्या मुलीचा विवाह बेकायदेशीर ठरवण्यात आला.

शारदा कायदा (१९२१) या कायदयानुसार विवाहासाठी मुलीचे वय १४ वर्षे आणि मुलाचे वय १८ वर्शे ठरवण्यात आले.

२० व्या शतकात मात्र स्त्री सुधारणा चळवळीला विशेश गती प्राप्त झाली. आणि स्त्री सबलीकरणाकडे वाटचाल सुरु झाली. ९०२ मध्ये रमाबाई रानडे यांनी 'हिंदू लेडिज सोशल व लिटररी क्लबची' स्थापना केली. १९०४ मध्ये 'भारत महिला परिषद' स्थापन झाली. या परिषदेने महिलांसाठी शैक्षणिक व इतर कार्यक्रम हाती घेतले. इ.स. १९१८ मध्ये भोपाळ नवाबच्या बेगमने 'अखिल भारतीय मुस्लिम महिला संमेलन' ची स्थापना केली. या संमेलनात सामाजिक सुधारणा आणि शिक्षणविषयक अनेक लेख वाचले गेले. बहुविवाहाच्या विरुध्द या संमलेनात आवाज उठवला.

इ.स. १९१७ ते १९२८ या काळातील महिलांचे आंदोलन हे राजकीय अधिकार मिळावेत यासाठी होते यामुळे महिला प्रतिनिधित्व करु शकणार होत्या. तर १९२८ ते १९३७ या कालावधीत महिलांचे मताधिकार वाढवण्यासाठी आंदोलन होते. त्यामुळे राजकीय क्षेत्रात महिला पूर्णपणे सहभागी होणार होत्या. १९३७ च्या निवडणुकित ४४१ जागा महिलांसाठी राखीव ठेवण्यात आल्या होत्या. निवडून आलेल्या महिलांमध्ये विजयालक्ष्मी पंडित, मेहता व दुर्गाबाई देशमुख यांचा समावेश होता.

## १.२ भारतीय स्वातंष्य चळवळीत स्त्रियांचा सहभाग –

१९२०–४७ हा कालखंड गांधीयुग म्हणुन ओळखला जातो. गांधीजीनी स्त्री जीवन व स्त्रियांचे प्रश्न यासंबंधी भरपूर चिंतन व लेखन केल्याचे दिसते. पडदा पध्दत, बालविवाह प्रथा, स्त्रियांची दागिणे घालण्याची हौस, हुंडा पध्दती इ. प्रथांना त्यांचा सक्त विरोध होता व त्यावर त्यांनी टीकाही केली होती. गांधीजीच्या प्रेरणेमुळे शेकडो स्त्रिया घराबाहेर पडल्या व समाजसेवा करु लागल्या. स्वातंत्र्य चळवळीत ही योगदान देऊ लागल्या. गांधीजीनी स्त्रिया या राष्ट्राच्या नागरिक असल्यामुळे त्यांनीही पुरुषाच्या बरोबरीने स्वातंत्र्यांच्या चळवळीत भाग घेतला पाहीले अशी भूमिका मांडली होती.

**१) विजयालक्ष्मी पंडित (१९०० –१९९०)**

स्वातंत्र्यसेनानी पं. मोतीलाल नेहरुंच्या कन्या, पंडित नेहरुंच्या भगिनी, युनोच्या पहिल्या महिला अध्यक्ष, महाराष्ट्राच्या राज्यपाल, भारताच्या राजदूत अशी विविधअंगी ओळख असलेल्या विजयालक्ष्मी पंडित या एक ख्यातनाम महिला आहेत. इ.स. १९३० –३१ च्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीत त्यांनी भाग घेतला होता. इ.स.१९३२ मध्ये त्यांना तुरुंग वासाची शिक्षा झाली होती. इ.स. १९३४ मध्ये अलाहाबाद नगरपालिकेच्या सदस्या म्हणून त्या निवडल्या गेल्या. नगरपालिकेचे शिक्षण सभासद पदही त्यांच्याकडेच होते. इ.स.१९३७ मध्ये ज्या प्रांतीय निवडणुका झाल्या त्यात उत्तर प्रदेशातुन निवडून आल्या. व प्रांतात त्यांना मंत्रिपद मिळाले. भारतात प्रांतात मंत्रिपद भूषवणाऱ्या त्या पहिल्याच महिला होता.१९४०–४२ या काळात अखिल भारतीय महिला संमेलनाचे अध्यक्षपदही त्यांनी भूषवले होते. स्वातंष्यानंतर विजयालक्ष्मी यांनी भूषवलेली पदे

१. इ.स.१९४९–५२– अमेरिका व मेक्सिकोत भारताच्या राजदूत

२. इ.स.१९५३–५४– युनोच्या महासभा या शाखेच्या अध्यक्षा

३. इ.स.१९५३–५४ – युनोच्या साधारण सभेच्या अध्यक्षा

४. इ.स.१९५४–६४– ब्रिटनमध्ये उच्चायुक्त त्याचबरोबर स्पेन व आर्यलँडच्या राजदूत.

## २) सूचेता कृपलानी

गांधीजीच्या आवाहनास प्रतिसाद देऊन प्राध्यापिकेची नोकरी सोडून १९४० मध्ये गांधीजीच्या व्यक्तिगत सत्याग्रहात त्यांनी भाग घेतला. अरुणा असफ अलीबरोबर भूमिगत राहून त्यांनी कार्य केले. 'भूमिगत स्वयंसेवक दल' स्थापन केले.

सूचेता कृपलानी या इ.स. १९४०–४२ मध्ये अखिल भारतीय कॅाग्रेस कमिटीच्या महिला विभागाच्या अध्यक्षा होत्या. सामाजिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रात स्त्रियांना संधी मिळावी म्हणुन त्यांनी खूप प्रयत्न केले. त्या एक उत्तम संसदपटू होत्या.

स्वातंत्र्यानंतर सूचेता कृपलानी यांनी अनेक पदे भूषवली

१. इ.स.१९४८–५१– काँग्रेस कार्यकारिणीच्या सदस्या

२. इ.स.१९५८–६०– कॅाग्रेसच्या अध्यक्षा

३. इ.स.१९५२–५७ – लोकसभेच्या अध्यक्षा

४. इ.स.१९५७–६२– लोकसभेच्या अध्यक्षा

५. इ.स.१९६३–६७– उत्तर प्रदोश्चे मुख्यमंत्रीपद

## ३) कमलादेवी चट्टोपाध्याय

कमलादेवी चट्टोपाध्यास इ.स.१९२९ साली ऑगस्टमध्ये युरोपात प्राग येथे 'Women`s League for Peace and Freedom' या संघटनेमार्फत भरलेल्या आंतरराष्ट्रीय महिला हजर राहिल्या होत्या. इ.स. १९३६ मध्ये काँग्रेस सोशालिस्ट पक्षाच्या त्या अध्यक्षा होत्या. भारतातील हस्तव्यवसायाला उर्जितावस्था प्राप्त करुन देण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. अखिल भारतीय हस्तव्यवसाय मंडळाची स्थापना त्यांनी केली. भारताच्या सांस्कृतिक राजदूत म्हणुन त्या ओळखल्या जात होत्या. १९६५ मध्ये मॅग्रेसे पुरस्कार मिळाला. पद्मभूषण पदवी मिळाली होती.

## ४) अरुणा असफ अली – (१९०६ ते १९९५)

१९४२ च्या आंदोलनाच्या नायिका म्हणुन त्या ओळखल्या जात. दैनिक ट्रिब्युनने १९४२ ची झाशीची राणी अशी उपाधी त्यांना दिली होती. स्वातंष्यानंतर त्यांनी अनेक पदे भूषवली. अमेरिकेत भारताच्या राजदूत म्हणून त्या गेल्या होत्या. उत्तर प्रदेशचे राज्यपालपद त्यांनी भूशवले. इ.स.१९५४ मध्ये National Fedration of Indian Women ची स्थापना त्यांनी केली.

इ.स. १९५८ मध्ये दिल्ली नगरपालिकेचे अध्यक्षपद भुषवले. देशसेवा व समाजसेवेबद्दल त्यांना अनेक पुरस्कारांनी सम्मानित केले गेले.

उदा. – १) लेनिन शांती पुरस्कार – १९५६

२) इंदिरा गांधी राष्ट्रीय एकता पुरस्कार – १९८७

३) जवाहरलाल नेहरु आंतरराष्ट्रीय सद्भावना पुरस्कार

४) नेहरु अॅवार्ड

५) पद्मविभूषण

६) भारतरत्न (१९९७)

**५) सरोजिनी नायडू–**

स्वातंत्र्ययोध्दया, कवियत्रि, स्वतंत्र भारतातील उत्तर प्रदेशाच्या पहिल्या महिला राज्यपाल, उच्चशिक्षित व बहुभाशिक ज्ञान असलेली महिला अशी सरोजिनी नायडू यांची अष्टपैलू ओळख आहे. भारताची कोकिळा म्हणून प्रसिध्द होत्या.

जलियनवाला बाग हत्यांकांडाचा निशेध म्हणुन सरोजिनी नायडुंनी १९०८ मध्ये सूवर्ण पदकांसह मिळालेली 'कैसर–ए–हिंद' ही पदवी परत केली. १९२५ च्या कानपुर येथील भरतीय राष्ट्रीय कॉंग्रेसच्या अधिवेशनाच्या त्या अध्यक्षा होत्या. स्त्री स्वातंत्र्याच्या व पुरस्कर्त्या होत्या. अखिल भारतीय महिला परिशदेशी त्या सतत संपर्क ठेवुन होत्या. १९४७ मध्ये आशियाई राष्ट्र परिषदेच्या त्या अध्यक्षा झाल्या. संयुक्त प्रांताच्या पहिल्या स्त्री राज्यपाल होण्याचा मान त्यांना मिळाला. मिठाच्या सत्याग्रहात सहभागी होणाऱ्या त्या पहिल्याच महिला होत्या. [५]

**भारतीय स्त्रियांचा राजकीय सहभाग व हक्कांसाठी ब्रिटीश काळापासून विविध प्रकारचे प्रयत्न होत असलेले दिसतात त्यामध्ये –**

१. १९१७ साली भारतीय स्त्रियांच्या प्रतिनिधी मंडळाने लॉर्ड मॉन्टेस्क्यू यांची भेट घेऊन स्त्रियांसाठी मताधिकाराची मागणी केली.

२. १९२० साली संपत्तीदार स्त्रियांना मताधिकार बहाल केला गेला मात्र त्यांना विधीमंडळात प्रवेश नव्हता.

३. १९० साली 'वुमेन्स इंडिया असोसिएशन' यांच्या प्रयत्नांमुळे स्त्रियांना विधीमंडळात प्रवेश खुला झाला. यामुळे मुथुलक्ष्मी रेड्डी या पहिल्या प्रतिनिधी म्हणुन विधिमंडळावर कार्यरत झाल्या.

४. १९३० साली इंग्लंडमधील आयोजित गोलमेज परिशदेत जहान आरा शहानवास व राधाबाई सुब्बराव या स्त्री कार्यकर्त्यांनी विधीमंडळामध्ये ५ टक्के आरक्षणाची मागणी केली.

५. १९३५ च्या भारत सरकार कायदयाद्वारे स्त्रियांना मताधिकाराचा व विधिमंडळ प्रवेशाचा पाया व्यापक केला गेला. यामुळे प्रांतिक विधिमंडळ निवडणुकीत ५६ स्त्रिया प्रांतिक विधीमंडळ सदस्या बनल्या याशिवाय ३० स्त्रिया केंद्रिय विधीमंडळावर निवडून गेल्या.

६. १९५० मध्ये स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेने स्त्रियांना समान घटनात्मक अधिकार बहाल केले.

भारताला स्वातंष्य मिळाल्यानंतर, स्त्रियांच्या जीवनात बरेच परिवर्तन झाले. मध्यमवर्गीय सुशिक्षित स्त्रिया विविध क्षेत्रात कामे करु लागल्या. राजकीय क्षेत्रात सहभागी झाल्यामुळे स्त्रिया कार्यक्षम आणि मुक्त आहेत हे सिध्द झाले. पंडित नेहरुंनी सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टिने अनेक योजना आखल्या. सरकारने अनेक कायदे केले. शिक्षणात समान संधी दिली व स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने हक्क दिले परिणामी स्त्री ही अधिक सक्षम बनवण्यास मदत झाली.

१९५५ साली द्विभार्या प्रतिबंध कायदा आला या कायदयाने पहिली पत्नी जिवंत असताना एखादया पुरुशाने दुसरे लग्न करणे शिक्षेस पात्र गुन्हा ठरतो.

१९५६ मध्ये वारसा हक्क कायदा पास झाला. स्त्रियांनी संपत्तीचे मालक होणे हे स्वप्न वास्तवात आले. त्यामुळे स्त्रिचा कौटुंबिक व सामाजिक दर्जा सुधारला.

१९५५ साली हिंदू विवाह कायदयाने कायदेशीर विभक्तपणा आणि घटस्फोट या दोन गोष्टी मान्य केल्या.

१९७२ साली स्त्रियांना विशिष्ट परिस्थितीत गर्भपात करण्याचा अधिकार देणारा कायदा करण्यात आला.

१९६१ साली हुंडाबंदी कायदा पास झाला.

१९५६ मध्ये स्त्रियां व मुलींच्या अनैतिक व्यापाराला आळा घालण्यासाठी कायदा करण्यात आला.

१९५६ साली वेश्या व्यवसाय विरोधी कायदा करण्यात आला.

१९८० साली बलात्कार विरोधी कायदा पास झाला.

१९८४ मध्ये कुटुंब न्यायालयाची स्थापना करुन स्त्रियांचे कौटुंबिक प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न झाला.

१९८८ साली गर्भजलचाचणी विरोधी कायदा पास झाला. गर्भजलाची परिक्षा करुन गर्भ हा स्त्रिचा की पुरुशाचा याचे निदान करणे बेकायदेशीर ठरवण्यात आले. या कायदयामुळे स्त्रियांचे आरोग्य चांगले राहू लागले.

गर्भपात कायदा, प्रसूती रजेसाठी कायदा, हुंडाबंदी कायदा यामुळे सर्व जाती, धर्म पंथातील स्त्रियांना दिलासा मिळाला.

भारत सरकारने महिलांच्या समस्या सोडविण्यासाठी व त्याच्या सक्षमीकरणासाठी शासनपातळीवर धोरणात्मक बदल केले व त्यांवर अंमलबजावणी केली आहे. यानुसार भारतात ३४ स्त्री अभ्यासकेंद्रे आहेत. महिला आर्थिक विकास महामंडळ, आर्थिक बचत गट, राष्ट्रीय महिला कोश, राष्ट्रीय महिला आयोग, राज्य महिला आयोग इ. स्त्री सक्षमीकरणासाठी तरतूदी केल्या आहेत.[६]

**भारतीय राज्यघटनेतील स्त्री – पुरुष समानतेच्या तरतूदी –**

१) कलम १४ – कायदयापुढे समानता

२) कलम १५ (१)– राजसंस्था कोणत्याही नागरिकांबाबत केवळ धर्म, वंश, जात, लिंग व जन्मस्थान या आधारावर भेदभाव करणार नाही

३) कलम १५ (२)– राजसंस्था महिला व बालकांसाठी विशेष तरतूद करु शकते

४) कलम १६ (१) – राजसंस्थेच्या नियंत्रणाखाली असलेले कोणत्याही पदाबाबत व रोजगार नेमणुकीबाबत सर्व नागरिकांना समान संधी असेल.

५) कलम १६ (२) – धर्म, वंश, जात, लिंग, कुळ आणि जन्मस्थान यांच्या आधारावर सरकारी रोजगारामध्ये भेदभाव केला जाणार नाही.

६) कलम २१ – राजसंस्था कोणत्याही व्यक्तीचे कायदयाद्वारे प्रस्थापित केलेल्या कार्यपध्दतीशिवाय कोणाचेही जिवीत व व्यक्तिगम स्वातंत्र्य हिरावून घेतले जाणार नाही.

७) कलम ३९(अ)– स्त्री व पुरुष नागरिकांना उपजिविकेचे साधन मिळवण्याचा हक्क सारखाच असावा

८) कलम ३९(ड) – पुरुष व स्त्रिया यांना समान कामासाठी समान वेतन

९) कलम ४२–कामाबद्दल न्याय्य व मानवीय परिस्थिती आणि प्रसुतिविषयक साहाय्यांची तरतूद

१०)कलम ५१ (अ) (इ)–स्त्रियांच्या प्रतिष्ठेला उणेपणा आणणाऱ्या प्रथांचा त्याग करणे

११)कलम २४३ (५) – पंचायतीमध्ये महिलांसाठी ३३ टक्के जागा आरक्षित

१२) कलम २४३ (ट) – महानगरपालिकांमध्ये महिलांसाठी ३३ टक्के जागा आरक्षित [७]

**पंचवार्षिक योजनामधील महिलांविषयक धोरण –**

१) पहिली पंचवार्षिक योजना – १९५१ ते १९५६

सामाजिक कल्याण मंडळाची स्थापना व कल्याणकारी कार्यक्रमाची अंमलबजावणी

२) दुसरी पंचवार्षिक योजना – १९५६ ते १९६१ –

महिला मंडळामार्फत महिलांचा विकास

३) तिसरी व चौथी पंचवार्षिक योजना – १९६९–७४–

महिला, शिक्षण, बालक आरोग्य सेवा, बालकांना पर्यायी धोरण

४) पाचवी पंचवार्षिक योजना – १९७४–७८–

विकासलक्षी दृष्टिकोनाचा स्वीकार

४) पाचवी पंचवार्षिक योजना – १९७४–७८–

विकासलक्षी दृष्टिकोनाचा स्वीकार

४)	पाचवी पंचवार्षिक योजना – १९७४–७८–

विकासलक्षी दृष्टिकोनाचा स्वीकार

५)	सहावी पंचवार्षिक योजना – १९८०–१९८५ –

ग्रामीण भागातील महिला व मुलांचा विकास

६)	आठवी पंचवार्षिक योजना – १९९२–१९९७–

महिला समृध्दी योजना

इंदिरा महिला योजना

७)	दहावी पंचवार्षिक योजना – २००२–२००७–

वंदे मातरम् योजना

जननी सुरक्षा योजना

भारत निर्माण योजना

६)	आठवी पंचवार्षिक योजना – १९९२–१९९७–

महिला समृध्दी योजना

७)	अकरावी पंचवार्षिक योजना – २००७–२०१२–

जलद व आर्थिक समावेषक वृध्दी

६)	बारावी पंचवार्षिक योजना –

जलद, शाश्वत व आर्थिक समावेशी वृध्दी [८]

**महिलासंदर्भात कायदेमंडळाचे आर्थिक धोरण**

१.	कारखाना कायदा, १९४८

२.	किमान मजूरी कायदा, १९४८

३.	खाणकाम कायदा, १९५२,

४.	मातृत्व लाभ कायदा, १९६१

५.	करार कामगार नियमन व रद्दबातल कायदा, १९७०

६.	कारखाना कायदा, १९७६

७.	समान वेतन कायदा, १९७६ [९]

**महिलांशी संबंधित कायदे–**

१)	महिला असभ्य प्रदर्शन (प्रतिबंध) कायदा, १९८६

२)	हुंडा प्रतिबंध कायदा, १९६१

३)	अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा – १९५६

४) कौटुंबिक हिसांचारापासून महिलांच्या संरक्षणाचा कायदा, २००५

५) नोकरीच्या ठिकाणी लैंगिक छळापासुन महिला संरक्षण कायदा, २०१३

६) गर्भधारणपूर्व आणि जन्मपूर्व निदान तंत्र (लिंग निवड प्रतिबंध) कायदा, १९९४

**बेटी बचाओ, बेटी बढाओ अभियान**

– २२ जाने, २०१५ AMBASSADOR माधुरी दिक्षित

**उद्दिष्टे –**

१. लिंग आधारित तपासणी प्रतिबंध व निर्मूलन करणे.

२. मुलींचे अस्तित्व व संरक्षण सुनिश्चित करणे.

३. मुलींचे शिक्षण व सहभाग वाढवणे.

**लक्ष्य –**

१. जन्मावेळेच्या लिंगगुणोत्तरात वार्षिक १० ने वाढ करणे.

२. बालमृत्यूमधील तफावत कमी करणे.

३. मुलीमधील रक्तक्षय (ॲनिमिया) कुपोषण निम्मे करणे.

४. माध्यमिक शाळेतील पटनोंदणी करणे.

५. २०१७ पर्यंत प्रत्येक शाळेत मुलींसाठी शौचालय.

६. मुलीसांठी संरक्षित वातावरण निर्माण करणे (२०१२ बाललैंगिक शोषण संरक्षण कायदयाअंतर्गत)

७. जनजागृती करुन समाज चळवळ उभारणे. [१०]

**सुकन्या समृध्दी योजना**

२२ जाने २०१५ बेटी बचाओ बेटी पढाओ या योजनेबरोबरच सुरवात झाली.

– १० वर्षे किंवा त्याहून कमी वयाची मुलींसाठी ही योजना आहे.

**One Stop Centre Scheme**

१ एप्रिल २०१५ पासुन सुरुवात

राष्ट्रीय महिला सशक्तीकरण अभियान (२०१०) अंतर्गत महिला व बालविकास मंत्रालयाने ही योजना सुरवात केली.

**सेवा**

या योजनेत हिंसाचारामध्ये पिडित महिलांना (१८ पेक्षा कमी वयाच्या मुलीसहीत) पुढील सेवा दिल्या जातात.

१. त्वरित प्रतिसाद व बचाव सुविधा

२. वैद्यकिय सहाय्य

३. पोलिस सेवा

४. मानसिक – सामाजिक आधार व समुपदेशन

५. न्यायिक मदत

६. निवारा

७. व्हिडिओ कॉन्फरन्सिंग फॅसिलिटी

**महिला सशक्तीकरण व संरक्षण अभियान**

– ८ मार्च २०१०

२०१६–१७ पासुन महिला सशक्तीकरणाच्या आणि महिला संरक्षणाच्या सर्व योजना या सर्वोच्च योजनेखाली आणल्या गेल्या आहेत.

**घटक**

१. बेटी बचाओ, बेटी पढाओ

२. जेंडर बजेट

३. महिलांसाठी उच्चस्तरिय समिती

४. महिला व जनशिक्षण

५. सामाजिक सुरक्षतेतीतील नाविन्य उपक्रम

६. राष्ट्रीय महिला सशक्तीकरण अभियान

७. वन स्टॉप सेंटर

८. प्रियदर्शनी

९. स्वाधार गृह

१०. उज्ज्वला

११. स्टेप योजना

१२. वुमन हेल्पलाईन

१३. कार्य महिलासाठी वसतिगृहे

१४. निर्भया निधी

१५. संशोधन, प्रकाशन, पाहणी

महिला विकासांसाठी आवष्यक घटकामध्ये आरोग्य, शिक्षण, माहिती स्वयंविकासाकरित आजन्म शिक्षण, व्यावसायिक शिक्षण कौशल्य, व्यवसाय व अर्थार्जन संधी, तांत्रिक सहकार्य, भूमी व इतर प्रकारची

मालमत्ता, विवाहाबद्दल निर्णय घेण्याचा अधिकार, समन आर्थिक संसाधने, पत तंत्रज्ञान व बाजार इत्यादीबाबत समान व परिपूर्ण संधी देणे या घटकाचा समावेश होतो. महिला विकासाबाबत राष्ट्रीय धोरणात याबाबत निर्देश दिले आहेत. त्याकरीता अनेक योजनाचा व धोरणांचा यात समावेश होतो.

उदा. अन्नविशयक धोरण संरक्षण, व्यवसाय वा नोकरीत किमान वेतन, भूमी अधिकार इ. [११]

**किरण देवेंद्र यांच्या मते,**

महिला सबलीकरणाचा अर्थ – महिला ही आर्थिकदृश्टया स्वतंत्र, स्वयंनिर्भर व स्वालंबंधी असणे होय. तिला स्वत:बद्दल सकारात्मक दृष्टीकोन असावा जेणेकरुन कोणत्याही विपरित परिस्थितीला सामोरे जाता येईल. स्त्रीविकास कार्यात सहभागी होण्यास पात्र ठरेल. निर्णय निर्धारण प्रक्रियेत सहभागी होऊ शकेल. याकरिता शिक्षण हा सबलीकरणासाठी एक महत्त्वपूर्ण भूमिा वठवणारा घटक आहे.

Country Report of Government of India मध्ये म्हटल्याप्रमाणे, 'सबलीकरण म्हणजे बळजबरीने दुर्बल ठेवण्याच्या अवस्थेकडून शक्तीकडील वाटचाल होय याद्वारे स्त्रियांमध्ये स्वत:बद्दलची सकारात्मक प्रतिमा निर्माण होते व त्यांच्या क्षमतेत वाढ होते.

महिला सबल असणे म्हणजे ती महिला सध्या कुठे आहे? याचा विचार नव्हे, तर त्या स्वत:च्या आयुश्याबद्दलच्या, मुलाबद्दलच्या आणि कुटूंबाबद्दलच्या निर्णय स्वत: घेऊ शकतील तसेच सामाजिक निर्णय प्रक्रियेत सहभागी होतील. जे की महिलाच्या अधिकाराचा व्यक्तिश: संबंध येतो. त्या ठिकाणी पूनरुत्पादनाच्या अधिकाराचा संबंध येतो. सामाजिक, आर्थिक, राजकीय अधिकाराचा संबंध येतो. त्यांचे कुटूंबाप्रतीचे कार्य व जबाबदारी समाजाप्रतीची जबाबादारी निश्चित होते, ज्या ठिकाणी त्यांना लैंगिक व सामाजिक शोषणाची भिती राहत नाही, ज्या ठिकाणी त्यांच्या घरावरील हक्क व मुलांबाबतचा पालकत्वांचा अधिकार त्यांना प्राप्त होतो अशी परिस्थिती म्हणजे महिला विकास, सबलीकरण होय.

महिलांना त्यांनी केलेल्या उत्पादक कार्यातून प्राप्त होणाऱ्या उत्पादनाचा फायदा मिळावा तिने कुटूंबाप्रती केलेल्या मोफत कार्याची दखल घेऊन त्या कार्याला महत्त्व दिले जावे. कौटुंबिक कार्याकडे सम्मानजनक दृश्टीने पाहिले जावे व कुटूंबातील जबाबदारी व निर्णयपिक्रयेत त्यांना सामील करावे अशी विचारसरणी होय. त्याचबरोबर खरी सबलता म्हणजे समाजाची स्त्रीबाबतची मानसिकता बदलून स्त्रिला समजून घेणे तिचे विचार ऐकणे. तिची कृती पाहून त्यास प्रोत्साहन देण्याची मानसिकता तयार करणे होय. या सर्वातून स्त्रीबद्दलचा आदर वाढेल सोबतच स्त्रीला स्वाभिमान व आत्मविष्वास वाटावा अशी परिस्थिती व वातावरण निर्मिती होईल.

**महिला सबलीकरण : एक बाह्य घटक**

सबलीकरण हा एक बाहय घटक असून तो बाहेरुन साध्य केला जातो. आंतरिकदृष्टया एखादया व्यक्तीला सबलतेची जाणीव तेव्हाच होते तेव्हा तिला बाहयदृष्ट्या हा दर्जा प्राप्त होतो. सामाजिक वर्तन हे रुढी, प्रथा, परंपरा व संकेतामुळे लादले जाते. दुसरीकडे कायदे व राज्य हे या स्थितीबाबत कधीही समाधानी नसतात या ठिकाणी मान्यतेचा अभाव असतो. त्यांचा कलम हा नियंत्रणात्मक कृतीबाबत त्रासदायक स्वरुपाचा असतो. त्यामुळे समाज कायदे व राज्य या सर्वाच्या दडपशाहीविरुध्द संघर्श हा जागाच्या इतिहासाचा एक भाग आहे. जरी आपण सबलीकरणास अंतरिक घटक मानले तरी त्याकरिता उपयुक्त वातावरणनिर्मित आवश्यक ठरेल जो बाहय स्वरुपी असेल.

**क्रांतिकारी संघर्ष –**

प्रत्येक व्यक्ती जर जन्मजात समान असेल तर त्यातील एखादी दुर्बल कशी असू शकेल? हा प्रश्न उपस्थित होतो. सर्व स्त्री पुरुष जन्म: समान आहेत असे म्हटले तरी समतेचे काही घटक काही जणांकरित (मुख्यत्वे स्त्रियांकरिता) हरवलेले दिसतात. सामाजिक, आर्थिक व राजकीय दृष्टीने वाद केला जातो की विकासाचा प्रक्रियेतील समानतेचा ऱ्हास हा प्रबळांकडून दुर्बळांवर नियंत्रण प्रस्थापित करण्यासाठी सर्वच सिध्दांतामध्ये केला जातो. त्याविरुध्द संघर्ष करणे म्हणजे क्रांती करणे होय ही संकल्पना कोणत्याही प्रकारच्या शासनप्रकारात समानतेने आढळते.

जन्मजात सर्व स्त्री पुरुष समान आहेत. प्रत्येकाला कोणत्याही प्रतिबंधाशिवाय मुक्तपणे व स्वतंत्रतेने जीवन जगण्याचा अधिकार आहे. कुटुंबात, समाजात, राश्ट्रांमध्ये शांततेने सहकार्यपूर्ण व सुरक्षित जीवन ही विकासाची प्राथमिक अट आहे. म्हणून मानवाचा विकास समानतेच्या अटीवर होत असतो. त्यावर कुटूंब, समुदाय, समाज, राज्य व आंतरराश्ट्रीय स्तरावर शांतता समन्वय सुसंगती ही आवश्यक असते.

सामाजिक स्तरावर आपण रुढी, परंपरा, संस्कृती समजू शकतो की ज्या त्रासदायक अन्याय ठरु शकतात. विविध सिध्दांताच्या माध्यमातून समाजाच्या विविध स्तरावरील हा अन्याय विशद करण्यात आला आहे. विविध कायदे, सनदा या प्रकारच्या अन्यायाविरुध्द व अन्यायाच्या निवारणार्थ निर्माण झाल्या आहेत. स्त्रियांचा त्यांच्या अधिकार व न्याय स्थितीबाबतच्या संघर्ष हा समाजात राज्यांतर्गत समान दर्जासाठी महत्त्वपूर्ण ठरतो.

सबलीकरण ही संकल्पना स्त्रीच्या सामाजिक न्याय व समतेसाठीच्या लढयाशी व संघर्शाशी संबंधित आहे. शर्मा यांच्या मते 'महिला सबलीकरण' ही संकल्पना स्वत:बद्दल ठाम प्रतिवादन बाबतच्या कृतीपासून सामुहिक प्रतिकारापर्यंत आणि संघर्षासाठी एकत्र जमण्यापर्यंत सर्व घटकांशी निगडीत आहे. ज्यात मुळ सत्तासंबंधाना आव्हान दिले जाते.

विसाव्या शतकाच्या उत्तरार्ध या संघर्शाला अधिक संघटनात्मक स्वरुप प्राप्त झाले. संयुक्त राष्ट्रांच्या स्थापनेनंतर जून १९४५ नंतर याला अधिक वेग आला.

## १.३ महिला सबलीकरण :

**एक सकारात्मक दृष्टिकोन**

महिला सबलीकरण म्हणजेच स्त्रियांना शक्ती (Power) देऊन त्याद्वारे त्याची इतरांवर सत्ता वाढवणे किंवा इतरांवर त्याचे श्रेष्ठत्व निर्माण करणे नव्हे हे प्रथम सामान्यत: लक्षात घेतले पाहिजे. अख्तार यांनी याबाबत योग्य मत मांडले आहे, त्यांच्या मते, 'या शोषणाभिमुख व भ्रष्ट समाजात पुरुशाची शोशण करण्याची भ्रष्ट सत्ता (जी आतापर्यंत पुरुषांनी वापरली) ती आता स्त्रीने स्वीकारुन तिचा अवलंब पुरुषाविरुध्द करणे ही महिला सबलीकरणाची कल्पना नाही' महिलांना सत्ता म्हणजे किंवा त्या सत्तास्थानी अरुढ होणे म्हणजे त्यांनी पुरुषांना वाईट वागणुक देण्यासाठी सत्तेचा गैरवापर करणे किंवा पुरुषाचे शोशण करणे नव्हे. महिला सबलीकरण हे स्त्रियांना सबल करणारे असेल. त्यांना पुरुषांपेक्षा सत्तावान करणारे नसेल.

ग्रीफन यांच्या मते, महिलांच्या बाबतीत सत्ता या शब्दाचा अर्थ महिलांच्या सत्तेत वाढ होय. तिचे नियंत्रण, तिचे ऐकणे, तिला समान नागरिक म्हणून मान्यता व सन्मान मिळणे तसेच समाजात सक्रिय सहभाग होण्याची पात्रता तिच्यात निर्माण होणे हाये. महिलाच्या बाबतीत सत्ता ही केवळ घरातच नव्हे तर समाजातील सर्व स्तरावर सहभाग किंवा योगदान देण्याची क्षमता निर्माण करणे. सत्तेचा दूसरा अर्थ स्त्रीचा सहभाग अधिकृत व मौल्यवान करणे.

सबलीकरण म्हणजे स्वत:मधील क्षमता ओळखणे व त्यांचा विकास करणे आणि कुटूंब, समुदाय, समाज या क्षेत्रात योगदान देणे. तसेच स्वत:ची एक सकारात्मक प्रतिमा निर्माण करुन आत्मविश्वास निर्माण करणे होय. महिला सबलीकरण स्वत:बद्‌दल विश्वास निर्माण करणे. त्याच्या सुप्त क्षमतांचा व पात्रतांचा विकास करणे जेणेकरुन तिच्या मार्गात कोणत्याही प्रष्न व समस्यांचे निराकरण करण्याची पात्रता तिच्यात येईल. तिच्या स्वयंप्रतिष्ठा व न्यायाबद्‌दलच्या नैसर्गिक हक्काची जाणीव व्हावी आणि तिने अन्याय व सापत्न वागणुकीविरुध्द मागणी करुन न्याय मिळवावा.

महिला सबलीकरणाची सुरवात ही स्त्रीने तिच्यासोबत होणाऱ्या सामाजिक, मानसिक, सांस्कृतिक अन्याय समजून घेणे वा ओळखणे, तसेच लैंगिक विशमता आणि अन्यायाबद्‌दल सतर्क राहणे तसेच तिच्याविरुध्द क्रियाशील सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि राजकीय शक्ती ओळखून त्याबद्‌दल जागरुक राहणे तसेच स्त्री जेव्हा स्वत:च्या सकारात्मक व्यक्तीमत्त्वाबद्‌दल व प्रतिमेबद्‌ल सकारात्मक

अधिकार व कर्तव्याबद्दल आणि क्षमताबद्दल व सुप्त बुध्दी सामर्थ्याबद्दल जागरुक होईल. तेव्हाच सबलीकरणाची सुरुवात होऊ शकेल.

महिला सबलीकरणाचा खरा अर्थ स्त्रीच्या बुध्दिमत्तेला, निसर्गदत्त शक्तीला किंवा कार्यक्षमतांना, सामर्थ्यांला, धारणक्षमतेला फलवणे तसेच स्वतःची खरी ओळख, विचारस्वातंत्र, अभिव्यक्ती आणि कृती तसेच तिच्या जीवनातील प्रत्येक क्षेत्राला हाताळण्याचे सामर्थ्य तिच्यात निर्माण करणे होय. केवळ त्यांना त्यांच्या क्षेमतेची जाणीव करुन न देता त्यासोबतच त्यांना संधी, सुविधा आणि बाहय व अंतरिक वातावरण निर्माण करुन देणे त्याच्या उपजत  गुणांचा वापर करुन त्यांच्यात आत्मविश्वास विकसित करणे. स्वतःचा आदर आणि सामाजिक, मानसिक आर्थिकदृष्टया स्वावलंबी होऊन स्वयंप्रतिश्ठा प्रप्त करणे तिच्या विरुध्द होणाऱ्या अन्याय व शोशणाविरुध्द आवाज उठवणे व संघर्ष करण्याची पात्रता निर्माण करणे होय.

म्हणूनच आपणांस असे आढळते की लैंगिक न्याय, लैंगिक समता, स्त्रियांचे अधिकार आणि महिला सबलीकरण या संकल्पनाचा अतिशय जवळचा आंतरसंबंध आहे आणि त्या एक दुसऱ्यांशी क्रिया प्रतिक्रिया करत असतात. जर लैंगिक न्याय व समता असेल आणि स्त्रियांचे अधिकार व मानवी हक्काचे हनन होत नसेल, तर स्त्री ही सबलीकरणास प्राप्त ठरतेत, तर दुसऱ्या बाजूला लैंगिक समता आणि न्याय दैनंदिन जीवनात तेव्हाच प्राप्त होऊ शकतो. जेव्हा स्त्री खऱ्या अर्थाने सबल असेल.

महिला सबलीकरण संकल्पना व त्याचे विविध पैलू पाहिल्यानंतर विविध क्षेत्रात स्त्री दर्जा कशा प्रकारचा आहे हे देखील पाहणे संकल्पनेच्या परिपूर्ण विश्लेषणाकरिता आवश्यक ठरेल. [१२]

**महिला व अर्थकारण –**

महिलांच्या आर्थिक स्थितीबाबत मार्क्स म्हणतो की, उत्क्रांतीच्या टप्प्यावरुन पुढे सरकत असताना आणि रानटी अवस्थेतून सांस्कृतिक अवस्थेपर्यंत येत असताना उत्पादन साधने विकसित होत गेले त्यानंतर खाजगी मालमत्ता या संकल्पनेचा उदय झाला, त्याच्याबरोबरच पितृसत्ताक पध्दती रुढ झाली. त्यामुळे संपत्तीवरील व इतर आर्थिक बाबींवर हक्क पुरुषांकडे गेले. एंजेल्स पण म्हणतो जसजसी संपत्ती वाढली तस तसा पुरुषांचा कौटुंबिक आणि कुटुंबाबाहेरचा दर्जा महिलांच्या तुलनेत उंचावला त्यातून स्त्रिच्या लेखी आर्थिकदृष्ट्या दुय्यम दर्जा प्राप्त झाला’.

आज एकूण महिला कामगारापैकी जवळपास ३० टक्के असंघटित क्षेत्रात व केवळ १० टक्के संघटित क्षेत्रात काम करतात. असंघटित क्षेत्रात मिळणारा सहज प्रवेश, स्थानिक साधनांचा वापर, कामगारांच्या श्रमाचा पुरेपुर वापर, कामचलाऊ तंत्रज्ञान, अनियंत्रित स्पर्धात्मक बाजारपेठा, विविधता आणि अनिश्चितता शिवाय कोणत्याही संरक्षण यंत्रणाचा असलेला अभाव, संघटना, कायदयाची बांधिलकी कामाच्या ठिकाणची परिस्थिती, वेतन, कामाची सुरक्षितता इ. गोष्टींचा अभाव असणारी सर्व क्षेत्रे असंघटित म्हणून संबोधली जातात यात प्रामुख्याने कृषी व बिगरकृषी क्षेत्राचा अंतर्भाव होतो; मात्र शासनाच्या जनगणनेत

शेतात काम करणाऱ्या शेतकरी स्त्रियांची नोंद काम न करणाऱ्या अकामकरी स्त्रिया म्हणून होते. म्हणजेच स्त्रियांच्या सामाजिक श्रमावर आणि श्रमातून आलेल्या मिळकतीवर पुरुषांची मालकी असते. यामुळे ग्रामीण स्त्रिया आर्थिक क्षेत्रातून बाहेर फेकल्या जाताना दिसतात.

शहरी स्त्रियांची शिक्षित व संघटित क्षेत्रातील स्थिती ही यातुन काही फार वेगळी नाही २०११ च्या जनगणनेनुसार केवळ २५.५५ टक्के स्त्रिया भारतात संघटित क्षेत्रात नोकरी करतात. त्या कमी दर्जाच्या नोकरी करतात. औदयोगिक क्षेत्रामध्ये, घरगुती उदयोगामध्ये स्त्रियांचे जास्त प्रमाणात आढळते. यात रोजगाराची हमी नसते, पगार कमी असतो परंतु मुलांचे संगोपन करणे किंवा घरच्यांचे सहकार्य नसते यामुळे स्त्रियांना असली हीन दर्जाची कामे करावी लागतात किंवा तात्पुरती अर्धवेळ नोकरी पत्करावी लागते.

अशा प्रकारे स्त्रियांना आर्थिक क्षेत्रातील विविध समस्यांना तोंड दयावे लागते, ज्यात रोजगाराविषयी संधीमधील घट, वेतनासंबंधी भेदभाव, स्वयंरोजगारास अर्थसहाय्याचा अभाव, फुटीर उदयोगात मालकी हक्क नाही, विना वेतन काम (वेठबिगारी) व बेरोजगारी या व अशा अनेक कारणामुळे स्त्रियांचे आर्थिक स्थान पुरुषांपेक्षा दुय्यम राहते. [१३]

**महिला व राजकारण** :

एन.जी.एस. किणी यांच्या मते एक वर्ग या नात्याने महिलावर्ग हा राजकीयदृष्ट्या पुरुषापेक्षा उदासिन असतो यासाठी त्यांची कुटूंबाप्रती असलेली जबाबदारी कारणीभूत ठरतेत. कुटूंबातील आई व वडिलांच्या राजकीय सहभागाचे निरिक्षण केल्यानंतर त्यातील फरक हा देखील मोठेपणी राजकीय सहभागाबद्दलच्या उदासिनतेचे कारण ठरतो. राजकीय बाबतीत इच्छा असताना देखील महिला राजकीय घटनेबद्दल विचार प्रकट करताना दिसत नाही. मुलींसाठी कुटूंब हेच क्षेत्र नसते, मात्र मुलांचे क्षेत्र हे अधिक विस्तृत असते. त्यामुळे असे घडताना दिसते, युनोस्कोने देखील महिलांच्या राजकीय सहभागाविषयी केलेले अध्ययनही सांगता येईल.

सधारणतः प्रत्यक्षात निवडणुकीसाठी पक्षांची उमेदवारी देताना राजकीय पक्ष महिला सदस्यांपेक्षा पुरुष सदस्यांना प्राधान्य देतात. याकरिता अनेक कारणे कारणीभूत ठरतात. एकतर पुरुषप्रधान मजाव्यवस्था स्त्रियांना आपली एक मतपेढी आहे व त्याचा वापर आपण एकत्रितरित्या राजकीय कार्यासाठी करु शकतो यांची जाणीव नाही. राजकीय पक्ष स्त्रियांच्या विजयाबाबत साशंक असतो तसेच स्त्रियांच्या संघटन शक्तीबाबत असलेल्या नैराश्यामुळे राजकीय पक्ष स्त्री उमेदवाराबाबत उदासीन दिसतात आणि या सर्व कारणामुळे स्त्री उमेदवारांची संख्या कमी असते. [१३]

१९५२ ते २०१४ या कालावधीत लोकसभेच्या सोळा निवडणूका झाल्या त्यामध्ये असे दिसून आले की, प्रत्यक्षात मतदार म्हणून निम्म्यांपेक्षा जास्त वाटा असलेल्या स्त्रियांचा भाग मात्र अत्यल्प प्रमाणात

असताना दिसतो. २०१४ च्या निवडणुकी ६२ महिला खासदार होत्या हे प्रमाणे १० टक्के च्या आतच आहे. याला काही घटक कारणीभूत आहेत ते पुढीलप्रमाणे :

१. परंपरेमुळे व मानसशास्त्रीयदृष्ट्या स्त्री राजकारणापासून उदासीन राहते.

२. शिक्षणाचा अभाव हे याचे एक कारण दिसते.

३. कुटूंबाच्या राजकीय पार्श्वभूमीचा प्रभाव स्त्रियांच्या राजकीय सहभागावर मोठया प्रमाणात दिसतो.

४. महिलांचा राजकारणाकडे बघण्याचा नकारात्मक दृष्टीकोन हा देखील इथे कारणीभूत ठरतो.

५. महिलांची कुटूंबाप्रती असलेली जबाबदारी या व अनेक बाबी स्त्रियांच्या राजकीय सहभागातील कमी प्रमाणात कारणीभूत ठरतात.

वरील सर्व घटकांचा एकत्रित विचार केलयास स्त्री ही पुरुषांच्या तुलनेत दुर्लक्षित आहे असे दिसते म्हणून स्त्री सबलीकरण तिच्या विविध क्षेत्रातील विकास व सहभाग वाढवण्यास उपयुक्त व आवश्यक ठरते. या दृष्टीने स्त्री सबलीकरणाचे आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व प्रादेशिक स्तरावर केलेले व होत असलेले प्रयत्न अभ्यासणे गरजेचे ठरते.

**राष्ट्रीय स्तरावरील कार्य व प्रयत्न–**

भारतीय समाजाचा प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक इतिहास पाहिल्यास स्त्री विषयक सामाजिक परिस्थितीत मोठया प्रमाणात चढउतार झालेले दिसतात प्राचीन काळी भारतीय स्त्री ही पुरुषसमान सर्व क्षेत्रांमध्ये आपली भूमिका बजावत होती; मात्र मध्ययुगीन काळात स्त्रीविषयक नकारात्मक दृष्टिकोन दिसून येतो व पुरुषापेक्षा स्त्रीचे स्थान गौण व दुय्यम ठरवले गेलेले दिसते. पुढे अठराव्या व एकोणिसाव्या शतकात भारतात विविध समाजसुधारकांनी त्याच्या चळवळीनी याबबात उपयुक्त कार्य केले दिसते तसेच तिला पुन्हा पूर्व प्राचीन कालीन स्थान प्राप्त करुन देण्याचा प्रयत्न केलेल दिसतात.

त्याचप्रमाणे स्वातंत्र्योत्तर भारतात स्त्री सबलीकरणाविषयक झालेले शासकीय, गैरशासकीय प्रयत्न अधिक महत्त्वपूर्ण ठरतात.

भारताला स्वातंष्य मिळाले त्यावेळी जागतिक स्तरावर मानवी हक्काविषयी एका महत्वाच्या पर्वास सुरुवात झाली होती. दुसऱ्या महायुध्दानंतर संयुक्त राष्ट्राचे चार्टरवर १९४६ मध्ये स्वाक्षरी करण्यात आली यानंतर मानवी हक्काची स्थापना हे प्रत्येक राष्ट्राचे उद्‌दिष्ट म्हणुन निश्चित करण्यात आले. शांतता व सुरक्षितता ही शासनाची मुलभूत कर्तव्ये असतात. त्यातच परकिय शासनाची मुलभूत कर्तव्ये असतात. त्यातच परकिय नियंत्रणापासून मुक्तता तसेच नवीन लोकशाही मुल्यांची निर्मिती हे देखील उद्दिष्ट संयुक्त राष्ट्राद्वारे सर्व राष्ट्रापुढे ठेवण्यात आले भारतीय राज्यघटनेची जडणघडण या सर्व मुल्यांना समोर ठेवूनच करण्यात आली.

पाश्चिमात्य राष्ट्रांतील स्त्रीला दोन शकतांपासुन आपल्या राजकीय अधिकारांसाठी संघर्ष करावा लागला होता. मात्र तुलनेने भारतीय स्त्रीला भारतीय राज्यघटनेने २६ जानेवारी ला राज्यघटना लागू झाल्यापासूनच मतदानाचा हक्क मान्य केला. त्यानंतर भारतीय राज्यघटनेच्या ७३ व्या व ७४ व्या घटना दुरुस्तीद्वारे स्त्रीला स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये ५० टक्के आरक्षण बहाल करण्यात आले आहे. याद्वारे राजकीय क्षेत्रातील किंवा राजकीय संस्थामधील पायाभूत संस्था समजल्या जाणाऱ्या स्थानिक संस्थांपासून स्त्रीच्या राजकीय सहभागास जागृती व मूल्यशिक्षणासारख्या काही गोष्टी प्राप्त झाल्या आहेत. [१४]

घटनेत स्वातंत्र्य, समता, न्याय व बंधुतेची ग्वाही दिलेली आहे. यासोबतच जनतेद्वारे शासकीय व गैरशासकीय संस्थाद्वारे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संघटनाद्वारे स्त्रीविरोधी होणाऱ्या अन्यायाविरुध्द संघटनाद्वारे स्त्रीविरोधी होणाऱ्या अन्यायांविरुध्द, गुन्हयाविरुध्द आंतरराराष्ट्रीय स्तरांपर्यत कार्य करण्यात सुरुवात झाली आहे. हे सर्व स्त्री सबला होण्याची मुळे आहेत.

आज स्त्री ही आर्थिकदृष्ट्या परावलंबी, राजकीयदृष्ट्या उदासिन, शिक्षणात दुर्लक्षित कुटूबांत दुय्यम, समाजात उपभोग्य झाली आहे. त्यामुळे तिचे सबलीकरण करायचे असल्याास, केवळ शासकीय स्तरावरुन कार्य न करता व्यक्तीपासुन सुरवात करावी लागेल त्यानंतर कुटूंब, समुदाय, समाज, राज्य, राष्ट्र हा असा चढता क्रम पूर्ण करित असतानाच कायदा व न्यायशाखा, शिक्षणव्यवस्था, मूल्यशिक्षण, आरोग्य सुविधा, रोजगार संधी, आर्थिकदृष्ट्या स्वावलंबन या सर्व स्तरावर चालना व प्रेरणा देण्याचा प्रयत्न सुरु झाला. या सोबतच त्यानंतरच्या काळात अनेकदा राज्यविधीमंडळे व संसदेत देखील स्त्रीला आरक्षण देण्याबाबतची विधेयके संसदेत मांडली गेली, मात्र सर्वसंमती अभावी ती मंजुर होऊ शकली नाही, परंतु त्याबाबतचे प्रयत्न अजूनही सुरुच आहेत. [१५]

भारताच्या राजकारणात महिलांचे नेतृत्व राजकीय सहभाग अल्पस्वरुपाचा राहिला आहे. १९७० नंतर महिलांचा हा राजकीय सहभाग वाढलेला दिसतो. लोकसभा, राज्यसभा, विधानसभा, विधानपरिषद, स्थानिक शासन संस्था, महिला संघटन, महिला बचत गट अशा विविध पातळयांवर महिलांचा सहभाग वाढलेला आहे. सत्ता, संपत्ती, अधिकार, प्रतिष्ठा मिळवण्यासाठी महिला वर्गाचे संघटन केले जाते.

एकोणिसाव्या शतकामध्ये महिला राजकारणामुळे सहभागी होत नव्हत्या. महात्मा फुले यांनी महिलांचे सार्वजनिक पातळीवरील राजकारण उभे केले. त्यानंतर अखिल भारतीय कॉंग्रस पक्षामध्ये महिलांनी सहभाग घेतला परंतु कार्यक्रमाची शोभा वाढवण्यापलीकडे कोणते कार्य महिलांकडे नव्हते. १८८९ च्या कॉंग्रेस अधिवेशनामध्ये केवळ १० महिला सहीागी होत्या. त्यानंतर रमाबाई रानडे यांनी सामाजिक परिषदेच्या माध्यमातून स्त्रियांची सर्वांगीण प्रगती व सामाजिक सुधारणा करण्याचा प्रयत्न केला. महिला सामाजिक कार्यात सहभागी होत्या परंतु राजकारणात मात्र सहभाग घेत नव्हत्या. महात्मा गांधीच्या काळात महिलांचा राजकीय सहभाग वाढला परंतु त्यांची राजकीय भूमिका दुय्यम होती. भारत स्वतंत्र झाल्यापासून आजपर्यंत

महिलाचे स्वतंत्रपणे राजकारण उभे राहिले नाही. सन २००४ ते सन २०१४ च्या दरम्यान लोकसभेमध्ये १६६ महिला खासदार निवडून आल्या. २००४ ते २०१४ च्या काळामध्ये लोकसभेच्या तीन सार्वत्रिक निवडणुका झाल्या त्यामध्ये पुरुष सदस्य १४६३ व महिला सदस्य १६६ निवडुन आल्या. त्यामध्ये २०१४ पर्यंत कॉग्रेस पक्षाकडून सर्वात जास्त महिला खासदार निवडून आल्या तर २०१४ च्या निवडणुकीत आतापर्यंत सर्वात जास्त भाजप पक्षाकडुन महिला खासदार निवडुन आल्या.

**लोकसभा महिलांचे प्रतिनिधीत्व २००४ ते २०१४**

**तक्ता क्र.१.१**

| सन | महिला प्रतिनिधित्व | टक्केवारी |
|---|---|---|
| २००४ | ४५ | ८.३ टक्के |
| २००९ | ५९ | १०.९ टक्के |
| २०१४ | ६२ | ११ टक्के |

**लोकसभेतील महिलांची पक्षनिहाय संख्या**

**तक्ता क्र.१.२**

| पक्ष | जागा |
|---|---|
| कॉंग्रेस | १०० |
| भाजप | १०८ |
| जे.डी. | ०६ |
| जे.डी.(यु) | ०६ |
| सी.पी.एम | १५ |
| सी.पी.आय | ०६ |
| बी.एस.पी | ०७ |
| स.प | ०६ |

## १.४ संसद निर्मितीची ऐतिहासिक पार्श्वभूमी :

परकीयांची आक्रमणे ही भारतासाठी काही नवी गोष्ट नव्हती. युरोपीय आक्रमक येथे येण्यापूर्वी अनेक परके आक्रमक देशात आले आणि या देशातच त्यांनी बस्तान मांडले. ते भारतीय जनजीवनाशी एकरुप झाले.

सोळाव्या शतकापासून डच, फ्रेन्च, पोर्तुगीज आणि ब्रिटिश व्यापाऱ्यांचा डोळा हा समृध्द देशावर पडला. त्यांना या देशाचे धन लुटून नेण्यात रस होता. त्यांच्यापैकी कोणीच या देशाच कायम वास्तव्य करु इच्छीत नव्हता. १७ शतकात ब्रिटिश व्यापाऱ्यांनी राणीकडून या देशात व्यापार करण्याचा परवाना मिळवला. सुरुवातीच्या काळात तरी येथील मुघल साम्राज्य बळकट असल्यामुळे ईस्ट इंडिया कंपनीला आपला व्याप व्यापारापुरताच मर्यादित ठेवणे भाग पडले पण औरंगजेबच्या मृत्यूनंतर मात्र त्या साम्राज्याला ओहोटी लागली आणि राजकी क्षेत्रात तोंड घालण्याची संधी कंपनीला मिळाली. १७५७ चे प्लासीचे युध्द कंपनीने जिंकले आणि शतकभरात या संपूर्ण देशावर ताबा मिळवला. १८५७ च्या उठावानंतर कंपनीसरकार बरखास्त झाले आणि हिंदुस्थान देश ब्रिटिश सरकारची एक वसाहत झाला.

**वासाहतिक राजवटीचे स्वरुपः**

वासाहतिक राजवटीचे स्वरुप मुळातच विस्तारवादी असते. वसाहतवादी समूह मायभूमीचे आपले नागरिकत्वाचे हक्क व निष्ठा कायम ठेवून अन्य प्रदेषांत स्थलांतर करतात; आपली भाषा, आपल्या संस्था आणि आपले राजकीय व आर्थिक वर्चस्व त्या प्रदेशांवर लादतात, आपली संस्कृती व सभ्यता श्रेष्ठ समजून तिचे संस्कार स्थानिक जनतेवर करण्याचे 'उदात्त' कार्य आपण करत असल्याचा गवगवा करतात. प्रत्यक्षात मात्र वसाहतवादाचे अंतरंग स्थानिक जनतेचे सर्वांगीण शोषण करणाऱ्या साम्राज्य शाहीचे असते. ईस्ट इंडिया कंपनीकरवी हिंदुस्थान पादाक्रांत करुन या देशाच्या सर्व समृध्द संसाधनांचे शोषण करणाऱ्या ब्रिटिश साम्राज्यसत्तेचे स्वरुप निःसंशयपणे वासाहतिक होते.

ब्रिटिश साम्राज्याच्या स्वरुपात प्रथमच समुद्रमार्गे आलेल्या आक्रमकांनी हिंदुस्थान जिंकला होता. आपल्या या सागरी वर्चस्वाद्वारे ब्रिटिश सत्ताधाऱ्यांनी महानगरीय तळ पक्के धरुन ठेवले आणि आपल्या सत्तेला बळकटी आली. ब्रिटिशांचे भारतावर आक्रमण झाले त्या काळात इंग्लंडात औद्योगिक क्रांती जोरात सुरु होती. त्या क्रांतीचे अनेक बरेवाईट सामाजिक, आर्थिक, राजकी व सांस्कृतिक परिणाम वसाहत देशांवर घडून आले होते. त्यात अर्थातच वाईट परिणामांचेच प्रमाण जास्त होते. वसाहतवादी राजवटीने या देशात आधुनिकीकरणाची प्रक्रिया सुरु केली, आणि भांडवलशाही विकासाची मुहूर्तमेढ रोवली असे काही अभ्यासकांचे म्हणणे आहे. काही अभ्यासक मात्र अशा निष्कर्षाला आले आहेत की ती राजवट मुलतः लुटारु होती. तिने येथील नैसर्गिक संसाधने लुटून नेली. ज्या काही सुधारणा ब्रिटिश राज्यकर्त्यांनी या देशात केल्या त्या केवळ त्यांना ही लूट करणे सोयीचे जावे याच एकाच हेतून केल्या होत्या. त्यांना येथील सामाजिक जीवनात मूलगामी परिवर्तन घडवून आणण्यात काडीमात्रही रस नव्हता.

**ब्रिटिश राजवटीचे परिणाम :**

ब्रिटिश राजवटीचे हिंदुस्थानावर अनेक राजकीय, सामाजिक व आर्थिक परिणाम घडून आले. राजकीयदृष्टया हा देश प्रथमच एका मध्यवर्ती सत्तेखाली आला, येथे कायदा व सुव्यवस्था स्थापन झाली, एकात्म प्रशासन व न्यायव्यवस्था निर्माण केली गेली, एकात्म सनदीसेवांची चौकट उभी राहिली. पण दुसऱ्या बाजूने याया देशाचे स्वातंत्र्य संपले, लोकांचे राजकीय हक्क संपुष्टात आले, प्रशासन बेदरकार भ्रष्ट आणि अरेरावी झाले, सामाजिक सुविधा हिरावल्या जाऊन विकासकार्यांकडे दुर्लक्ष झाले, ब्रिटिश अधिकारी मस्तवाल झाले.

आर्थिक परिणामांचे स्वरुप तर या देशांचे कंबरडे मोडणारेच होते. विशम व्यापार आणि विभिन्न जमीनधरापध्दती, ब्रिटिश भांडवल व उदयोग यांची आयात, भारताताती संसाधनांची लूट, ब्रिटिशांना लाभदायक व भारतीयांना नुकसानकारक ठरतील असे विनिमय दर आणि प्रशुल्के, युध्दखर्चाचा भारतावर टाकलेला बोझा, भारतीय व्यापाराचे व उद्योगाचे जाणीवपुर्वक केलेले उद्ध्वस्तीकरण, शेतीचे व्यापारीकरण, जमिनीचे व श्रमशक्तीचे वस्तूकरण आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचा विध्वंस या वासाहतिक राजवटीच्या आर्थिक धोरणांचे अत्यंत दूरगामी व अनष्ठि परिणाम भारतावर झाले.

सामाजिक– धार्मिक उल्लेखनीय परिणामांची नोंद पुढीलप्रमाणे करता येईलः भारतीय मध्यम वर्गाचा उदय, काही सामाजिक सुधारणांबाबतचा पुढाकार, खिस्ती धर्मप्रसारातून हिंदू समाजात सुरु झालेले आत्मपरीक्षण, व्यक्तिवादी विचारमूल्यांची रुजूवात, वारसाहक्कात फेरबदल. पण एकंदरीत वासाहतिक धोरणाचा रोख भारतीय समाजाला विभक्त ठेवण्यावरच होता. त्यांनी पारंपरिक परस्पराश्रयी गावगाडा मोडला, फोडा आणि झोडा हे धोरण ठेवले, पारंपरिक शिक्षणपध्दती निकालात काढली, हिंदू व मुस्लिम यांच्यातील अंतर वाढवला. त्यातूनच पुढे देशावर फाळणीचे गंडांतर आले. अस्पृश्यता टिकून राहिली, जातीय अस्मिता बाळावल्या, सपाट देशातील लोकांपासून तुटून गिरिकंदरी राहिलेल्या जनजाती विकासाच्या प्रक्रियेपासून वंचित राहिल्या. ही सामाजिक विभक्तता वर्गविभाजनांमुळे अधिकच गुंतागुंतीची झाली. एकत्र कुटूंबपध्दती आणि ग्रामीण सामुदायिक जीवन संपुष्टात आले.

**स्वातंत्र्यप्राप्तीः**

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वातंत्र झाला. स्वातंत्र्य लढयतील असंख्य सैनिकांच्या बलिदानाचे सार्थक झाले. वर्षानुवर्षे अप्रतिहतपणे राष्ट्रीय चळवळ चालू ठेवणाऱ्या निस्वाःर्थी राष्ट्रभक्तांचे स्वप्न साकार

झाले. दीडशे वर्षापुर्वी या देशााच्या हातापायांना जखडलेल्या गुलामगिरीच्या शृंखला गळुन पडल्या. परवशतेचा पाश तुटला. स्वराज्य सुरु झाले.

या ऐतिहासिक महत्त्वाच्या क्षणी सत्तेचे संक्रमण होत असताना, स्वराज्याचा श्रीगणेशा होत असतांना जमेच्या बाजू कोणत्या होत्या आणि खर्चाच्या बाजू कोणत्या हे पाहाणे राज्य शास्त्राच्या विद्यार्थ्यांच्या दृष्टीने उद्बोधक ठरेल. अस्तंगत होणाऱ्या साम्राज्याने स्वातंत्र्याबरोबर भारताच्या पदरात आणखी काय घातले होते? पाश्चात्य राज्यकर्ते या देशात आले तेव्हापासून त्यांच्या सहवासाने, संपर्काने, शासनाने भारताला काय काय दिले? इथे कोणकोणत्याही क्षेत्रात कोणकाणेते ठळक बदल झाले? या आणि अशा काही प्रश्नांची स्थूलमानाने चर्चा आपल्याला येथे करावयाची आहे. त्या चर्चेतून भाताच्या राजकीच पध्दतीची पार्श्वभूमी तयार व्हावी, आणि आजच्या काही समस्यांची उकल होण्यास या पार्श्वभूमीचा उपयोग व्हावा हाही हेतू या प्रयत्नामागे आहे.

जगात अनेक राज्यकर्ते होऊन गेले. प्रत्येकाने शासितावर कमी–अधिका प्रमाणांत संस्कारही केले. ब्रिटिश येण्यापूर्वी भारतातही अनेक राज्यकर्ते राज्य करुन गेले, ज्याचप्रमाणे ब्रिटिशांनी जगात अन्यत्रही राज्ये केली, पण इथल्या ब्रिटिश राजवटीचे आगळेपण जर कशात असेल तर तिने भारतीय जीवनाला दिलेल्या आधुनिकेतेत! इतर कोणत्याही शास्त्याचा प्रभाव व्यापक आणि इतका खोलवर जाणारा आढळत नाही. गोपाळ कृष्ण गोखले म्हणतात त्याप्रमाणे, 'इतर देशांमध्ये पश्चिमेच्या संपर्कातून फक्त बाहय परिणाम झालेले दिसतात, भारतात मात्र खूप खोलवर जाणारे आणि अंतबाह्य परिणाम झाले आहेत.' त्यांच्या आगमनापूर्वी भारतातही एक श्रेष्ठ संस्कृती नांदत होती. संपन्न परंपरा होत्या आणि त्यामुळे ते इथे आले तेव्हा दोन महान संस्कृतीचा संगम इथे झाला. केवळ पाश्चात्य संस्कृतीच भारतावर लादली गेली असे नव्हे तर भारतीय संस्कृतीनेही पश्चिमी संस्कृतीला नवीन असे काही दिले. लॉर्ड मस्टन यांनी संस्कृती–संगमाची तुला सरिता–सागर या मिलनाशी केली आहे. ते म्हणतात पश्चिमेच्या संस्कृतीची नदी येऊन भारतीय संस्कृतीच्या समुद्राला मिळाली. काही काळ तिचा स्वतंत्र प्रवाद दिसला. पण नंतर ती इथल्या समावेशक संस्कृतीशी एकरु होऊन गेली. तीत पूर्णपणे विलीन झाली.

कार्ल मार्क्सने १८५० सालीच भाकीत केले होते, 'मोगल अमदानीत होते त्यापेक्षा अधिक संघटित व व्यापक राजकीय ऐक्य होणे भारताची सर्वात मोठी निकड होती. इंग्रजांच्या तलवारीने निर्माण केलेले ऐक्य आता वि?ुत आणि टेलिग्राफमुळे अधिक दृढ होणार आहे. ब्रिटिशांच्या ड्रिल सार्जंटने निर्माण केलेले शिस्तबध्द व प्रशिक्षित नेटिव लष्कर हे भारताच्या आत्ममुक्तीचे आणि यापुढे भारत परकीय आक्रमणाचे भक्ष्य नाही असे

जिवंत प्रतीक ठरणार आहे. आशियाई समाजात अस्तित्वात आलेली मुक्त वृत्तपत्रे या पुर्उभारणीचे अभिनव आणि समर्थ घटक ठरणार आहेत..... आज कलकत्यास शिक्षित होत असलेला नवा वर्ग शासनाच्या वाटा ठाऊक करुन घेत आहे. विज्ञान पचवी आहे. वाफेवर चालणाऱ्या यंत्रामुळे त्वरित व नियमित संपर्क युरोपशी साध्य झाला आहे..... त्यामुळे भारतातचा पूर्वापारचा एकाकीपणा व तज्जन्य गतिरोध संपुष्टात येत आहे.'

**इंग्रजी राजवटीचा सामाजिक–सांस्कृतिक वारसाः**

इतर सर्व क्षेत्रापेक्षा सामाजिक–सांस्कृतिक क्षेत्रात पश्मिचा झालेला प्रभाव अनेक कारणांसाठी महत्त्वाचा ठरतो. एक तर अन्य क्षेत्रापेक्षा या क्षेत्रात घडून आलेले परिवर्तन हे अधिक स्थायी स्वरुपाचे व दूरगामी परिणामांचे आहे आणि दुसरे म्हणजे या क्षेत्रात झालेल्या मन्वन्तरामुळेच राष्ट्रीय व राजकीय क्षेत्रातील कायापालट शक्य झाला आहे. सामाजिक–सांस्कृतिक परिवर्तनाखेरीज राजकीय, अस्मिता जागी होऊच शकली नसती आणि परिस्थितीत स्वातंत्र्य मिळाले असते तरी ते स्थिर, सबळ व यशस्वी होऊच शकले नसते. त्यामुळे या क्षेत्रातील वारशाचा विचार प्रथम करणे क्रमप्राप्त ठरते.

भारतीय स्वातंत्र्याने केवळ एक नवे सार्वभौम राज्यच निर्माण केले असे नाही तर जगाच्या पाठीवर एका नव्या सभ्यतेला जन्म दिला आहे. ही सभ्यता केवळ हिंदू वा भारतीय सभ्यता नाही. तिच्या सर्वांगावर पाश्चात्य सभ्यतेचा ठसा उमटला आहे. इथली पारंपरिक समाजव्यवस्था बदलली. सामाजिक संबंधाची नियमने बदलली, धार्मिक श्रध्दा बदलल्या, नैतिक संकल्पना बदलल्या, वैचारिक क्षेत्रात नवे प्रवाह निर्माण झाले, अीयासाचे नवी दालने उघडली, अनेक मार्गानी हजारो वर्षापूर्वीच्या भारतीय सवयी विचार आणि श्रध्दा यांचा परिष्चमी भूमीत रुजून विकसित झालेल्या आदर्शाशी, ज्ञानाशी आणि विचारांशी समन्वय झाला. आणि त्यामुळे भारतीय परंपरा अधिक संपन्न झाल्या. त्यांना नव्या स्वरुपात आविष्कृत होता ओ. आणि चैतन्य व सामर्थ्य वाढले.

ब्रिटिश भारतात आले होते तेव्हा इथली स्थिती सर्व दृष्टींनी खालावलेली होती. लहान लहान जुलमी राज्ये भारतभर विखुरलेली होती. भूतकाळात भारताची कीर्ती दिगंत करणारी संस्कृती मोडकळीस आली होती. संपन्न जीवन संपुष्टात आले होते. उत्कट तत्वज्ञानाची जागा तत्वशून्य कर्मकांड, तर्कदुष्ट क्रियाकर्म आणि क्रूर रुढी–पध्दतींनी घेतली होती. संस्कृत भाषेत ज्ञानाचा मोठा साठा समाविष्ट होता, शास्त्रे रचली गेली होती, पण निगमनाधिष्ठित गणिताचा त्यात समावेश नाही. भोतिक शास्त्रे निरीक्षण व प्रयोग यावर आधारित असतात, त्यात अभ्युपगम मांडले जातात आणि त्या अभ्युपगमांपासून निघणारे तार्किक निष्कर्ष अनुभवाने पडताळून घेतल्यावरच ते स्वीकारले जातात. या पध्दतीने ज्ञानात सतत भरत घातली गेली आहे. अशा भौतिकी व

रसायन यासारख्या अनुभवप्रामाण्याधिष्ठित शास्त्रांचा त्यात समावेश नव्हता. अशी अमूर्त शास्त्रे तर सोडूनच द्या, पण भारतीयांनी सहजतेने उपलब्ध असणारी भौगोलिक माहितीदेखील एकत्र गोळा केली नव्हती आणि एखाद्या शास्त्रात सुव्यवस्थितपणे तिची रचना केली नव्हती. भारतीय शास्त्रात अनुभवप्रामाण्याधिष्ठित इतिहासशास्त्राचाही समावेश नव्हता.....मिथ्य कहाण्या, आख्याने यांच्या स्वरुपात पुराणांमध्ये वर्णन केलेले भूतकाळाचे कथन यालाच आपल्या येथे इतिहास म्हटले व मानले जायचे (मे.पुं.रेगे, विवके आणि न्याय,११–२)

आत्मविस्कृत होऊन भारतीय जनता अविवेकाच्या ओझ्याखाली वाकली होती. परिस्थितीची गुलाम झाली होती. सामाजिक आचार–विचरात आणि राजकारणात, धर्मक्षेत्रात आणि कलाक्षेत्रात निष्क्रिय अनुत्पादकता बोकाळली होती. प्राचीन संस्कृतीचे, वैभवाचे चैतन्यहीन सांगाडे केवळ शिल्लक राहिले होते. गती संपून गतानुगतित्व व विकास संपून स्थितिप्रियता आली होती. एका प्रभावी चालनाशक्तीची आवश्यकता निर्माण झाली होती आणि पाश्चात्यांच्या आगमनाने ती मिळाली. भारतीयांचा बौध्दिक एकाकीपणा जाऊन नव्या क्षितिजांशी त्यांची ओळख झाली.

अनेक शतक पश्चिमेत पुनर्जागृतीचे व उदारमतवादी विचारसरणीचे समजले जाते. इंग्रजांसह हे लोण भारतात आले. उदारमतवाद ही अत्यंत व्यापक संकल्पना असून भारतीय जीवनावर उदारमतवादाचा अनेकविध स्वरुपात परिणाम झाला आहे. विवेकनिष्ठ परंपराचा व धर्माज्ञांचा विचार करायला भारतीयांना उदारमतवादाने शिकविले. त्याचबरोबरच मानवी विचारांचे केंद्र ईश्वर नसून मुनष्यच आहे, मानवी प्रगतीत दैवी प्रकटीकरणापेक्षा ऐतिहासिक सत्यांचे व उत्क्रातीचे महत्त्व मोठे आहे. धर्म आणि राजकारण परस्परांपासून भिन्न असावेत, व्यक्तीला व्यक्ती म्हणून काही अधिकार असतात, सर्व व्यक्ती समान असतात, इत्यादी अनेक कल्पना उदारमतवादांषी संलग्न आहेत. भारतीयांच्या पूर्वपंरपरांशी या कल्पना बव्हंशी विसंगत होत्या. राज्यकर्त्यांनी सुरु केलेल्या इंग्रजी शिक्षणामधून त्यांचा भारतीयांना परिचय झाला त्या शिक्षणाने त्यांना अनेक शतकाच्या मोहनिद्रेतून खडबडून जागे केले. त्यांना आजवर माहीत असलेल्या भरमसाट कल्पित भूगोलाची, दंतकथावजा इतिहासाची व कृत्रिम नकली विज्ञानाची जागा भौगोलिक सीमांची, राष्ट्रांच्या उदयास्तांची व निसर्गनियमांची रास्त व विचाराधिष्ठित स्पष्टीकरणे घेऊ लागली. एडमंड बर्क, जॉन स्टुअर्ट मिल इत्यादिकांनी त्यांना स्वातंत्र्याचा अर्थ सांगितला, मॅझिनी–काव्हूरच्या गौरवगाथांनी त्यांना रोमांचित केले. फ्रान्सच्या राज्यक्रांतीने पुरस्कारिलेल्या स्वातंत्र्य, समता, बंधुत्व या तत्वत्रयीने त्यांना उत्स्फूर्त केले. या सर्व कल्पना त्यांनी स्वतःच्या देशाच्या संदर्भात लावून पाहाण्यास प्रारंभ केला. सरकारी खर्चातून इंग्रजी शिक्षणाची व्यवस्था भरतात करण्याचा १८३५ चा निर्णय यामुळे महत्त्वाचा ठरला.

इंग्रजी रुपाने देशाच्या कानाकोपऱ्यांत राहणाऱ्या भारतीयांसाठी एक समान भाषा प्राप्त झाली. वाहतुकीच्या मार्गांनी साधनांनी आणि समान प्रशासनयंत्रणेने साधल्या गेलेल्या देशाला वैचारिक आदान–प्रदानाचा बौध्दिक दुवाही यामधून प्राप्त झाला. लॉर्ड मॅकोलच्या स्वप्नानुसार 'रक्ताने, वर्णने भारतीय पण वृत्तीने, मनाने व बुध्दीने पाश्चात्य असलेल्या' विचारवंताची एक पिढीच या शिक्षणातून निर्माण झाली. सरार क.एम. पाणिक्कर म्हणतात त्याप्रमाणे :'शिक्षणाचा (होता त्यापेक्षा निराळा कोणताही) आकृतीबंध जर इथे निर्माण झाला असता तर भारताच्या विकासाची दिशाच बदलून गेली असती. नवे शिक्षण भारतीय भाषांमधून दिले गेले असते तर प्रात्येक प्रांतातील चळवळीचा भर निरनिराळा राहिला असता. शिक्षणाचा प्रभाव त्या त्या प्रातिक भाषेच्या विकासाच्या, लवचिकपणाच्या व स्वरुपाच्या प्रमाणात कमी – अधिक झाला असता. परिवर्तनाला 'मास्टर प्लॅन' असा उरलाच नसता. सकल हिंदू जनसंमर्द असा उभा राहू शकला नसता. त्यांच्यात भाषावर तट पडले असते. खिस्ती धर्मातील भिन्न व परस्परविरोधी गटांमुळे युरोपात जसे झाले तसेच इथेही झाले असते. शिक्षणाच्या समान माध्यमामुळे हा धोका टळला'

प्रजेला शिक्षण देण्याची जबाबदारी शासनाने स्वकारावयाला पाहिजे हा नवा विचार इंग्रज राजवटीबरोबर ीारतात आला आणि रुजू लागला. शासनाने तर यासंबंधी पुढाकार घेतलाच, पण एतद्देशीय सुशिक्षित पदवीधरसुध्दा निष्ठेने या क्षेत्रात कार्य करण्यास पुढे सरसावले. राजा राममोहन रॉय यांनी कलकत्यांस 'हिंदू कॉलेजच' ची स्थापना केली, तसेच 'वेदान्त महाविद्यालय' नावांचीही संस्था काढली. हिंदूंचे वेदान्त ज्ञान आणि पाश्त्यांची भौतिक दृष्टी यांचा समन्वय या शिक्षणाद्वारे साधण्याचा त्यांनी प्रयत्न केला. पं. ईश्वरचंद्र विद्यासागर यांनी हेच कार्य पुढे चालवले. 'हिंदू कॉलेज' च्या प्राचार्यपदी असतानाच खेडोपाडी हिंडून सामान्य रयतेच्या मुलांसाठी त्यांनी अनेक शाळा उघडल्या, चार जिल्हयांमध्ये मुलींचय पस्तीस शाळा चालविल्या. केशवचंद्र सेन यांचेही या क्षेत्रातील कार्य उल्लेखनीय आहे. देशातील सर्व समाजाच्या व वर्गाच्या मुलांपर्यंत उपयुक्त शिक्षण नेण्याच्या हेतून शेतकरी, कामकऱ्यांसाठी रात्रीच्या शाळा काढल्या. मुलींच्या शिक्षणाला चालना मिळावी म्हणून आध्यापिका विद्यालय काढले. प्रौढ महिलांच्या शिक्षणासाठी व्हिक्टोरिया इन्स्टिटयूट चालवले. हस्तकला, लोहारकाम, सुतारकाम इत्यादी उपयुक्त शिक्षणासाठी स्वतः एका रात्रीची शाळा चालविली. बंगालमध्ये हे शैक्षणिक चैतन्य पसरत असतांनाच महाराष्ट्रातही बाळशास्त्री जांभेकर, दादाभाई नवरोजी, डॉ. भाऊ दाजी लाड, ना. जग्न्नाथ शंकरशेट, रानडे, लोकहितवादी, चिपळूणकर, टिळक महात्मा फुले इत्यांदिकांनी भिन्न भिन्न मार्गांनी शैक्षणिक कार्यास हातभारत लावला. बॉंबे नेटिव्ह असोसिएशन, न्यू इंग्लिष स्कूल, फर्ग्युसन कॉलेज, नूतन मराठी विद्यालय इत्यादी संस्थांचे या क्षेत्रातील

योगदान संपूर्ण राष्ट्राच्या दृष्टीने मोलाचे ठरले आहे. आर्यसमाजाच्या 'दयानंद ॲग्लो वैदिक कॉलेज' मार्फत आजही शिक्षणक्षेत्रात महत्त्वाचे कार्य होत आहे.

१८५७ साली कलकत्ता, मुंबई आणि मद्रास या तीन विद्यापीठांची स्थापना झाली. पाश्चात्य जगाशी वैचारिक देवाणघेवाण सुरु होण्यास मुख्यतः विद्यापीठच जबाबदार आहे. या देवाणघेवाणीमुळे नवनवे विचार आमच्याकडे येत राहिले आणि पाश्चात्यांना आमची अधिकाधिक चांगली ओळख होत गेली. आधुनिक शास्त्रीय विश्लेषण– पध्दतीच्या साहाय्याने भारतीय धर्म, परंपरा, प्राचीन जीवनपध्दती इत्यांनींचे अध्ययन, संशोधन होऊ लागले. राजकीय व सामाजिक सुधारणांच्या आंदालनाचे आरंभीच्या काळातील नेतृत्वही भारतीय विद्यापीठातून शिक्षण घेतलेल्या नेत्यांनीच दिले.

या शिक्षणामधून तरुण डॉक्टर, इंजिनियर, शिक्षक, वकील, वृत्तपत्रकार अशांचा एक व्यावसायिक वर्ग अस्तित्वात येऊन त्याच्याभोवती एक व्यापक मध्यम वर्ग निर्माण झाला. उद्योगपती आणि व्यापारी यांच्या वर्गाने त्यात भर घातली. उदारमतवादी धोरणाचे नेतृत्व करण्याची जबाबदारी या वर्गाने उचलली. इंग्रजी साहित्यातून, इंग्लंडच्या इतिहासाच्या प्रत्यक्ष ज्ञानातून – आणि त्या इतिहासाने प्रस्थापित केलेली हुकूमशाहीच्या अंताची व लोकशासनाच्या सुरुवातीची अपरिहार्यता पाहून या वर्गाच्या मनात नव्या आशा पालवल्या. त्याने स्वाभविकच त्या इतिहासाची, त्या इतिहासामागील तत्वांची व प्रेरणांची तुलना स्वदेशाशी केली. इंग्रजांचे भारतावरील साम्राज्य यांच्यातील अंतर्विरोध त्याला जाणवला. शिक्षणाने त्याच्या मनात स्वातंत्र्य भावना प्रज्वलित केली. तिला नीट संघटित करता येणे जनमानसात सामाजिक जीवनात प्रचंड वादळे उठविल्याशिवाय होणार नाही हे त्या वर्गाने ओळखले. त्यातून नवी सामाजिक उद्‌दिष्टये त्याला गवसली. सामाजिक व धार्मिक सुधारणांची गरज तीव्रतेने प्रतीत झाली. सामाजिक क्षेत्रात जातीयतेविरुध्द आवाज उठविणे, बालविवाह बंद करणे, विधवाविवाहास मान्यता देणे, स्त्री –पुरुषांचे समान हक्क प्रस्थापित करणे, सतीसारख्या अनिष्ट चालीरीती बंद पाडणे, अस्पृष्यता व सामाजिक विषमता नष्ट करणे, अशा अनेक क्षेत्रांमध्ये संघटित प्रयत्न सुरु झाले. राज्यकर्त्यांनी सुरुवातीला धार्मि बाबींसंबंधी तटस्थता पाळण्याचे जे धोरण स्वीकारले होते ते या सुधारकांनी शासकांना सोडणे भाग पाडले आणि अनिष्ट धार्मिक रुढींविरुध्द कायदे करायला लावले. धार्मिक क्षेत्रात धर्मभोळेपणा, अंधश्रध्दा, मुर्तिपूजा, अनेकेष्वरवाद, पूजक वर्गाचे पारंपारिक श्रेष्ठतव इत्यादीविरुध्द आवाज उठविणे अशा स्वरुपात ही चळवळ आविष्कृत झाली. हिंदू धर्माला कालसापेक्ष स्वरुप देण्याचे, त्याचे इतर धर्मापासून संरक्षण करण्याचे, राष्ट्रीय चळवळीला धार्मिक अधिष्ठान

देण्याचे – असे अनेक हेतू मनात ठेवून अनेक धार्मिक सूधारणा करण्यात आल्या. तसेच नैतिक जाणिवांचा उद्‌भवही या वर्गाला सुधारणाप्रवृत्त करण्यास कारणीभूत झाला.

राजा राममोहन रॉय प्रभुतींनी खिस्ती धर्मांची मूलतत्वे आत्मसात केली. त्यातल्या मानवतावादी विचारांनी ते प्रभावित झाले. परमहंस सभा, ब्राह्मो समाज, प्रार्थना समाज या हिंदू धर्मसुधारणेच्या पण खिस्ती अनुकरणातून सरसावलेल्या संस्था होत्या. त्यांच्या अनेक शिकवणूक खिस्ती धर्माशी साधर्म्य दर्शवीत असल्यातरी हिंदू परंपरेतील वेदान्तावर त्या आधरित होत्या. हिंदू धर्माला चिकटलेली रुढी–चालीरीतींची, विषमतेची, भ्रमांची जळमटे काढून टाकावीत, एकेश्वरी धर्मतत्वांचा प्रचार करावा, हिंदु धर्माला कालसुसंगत करुन त्याचे रक्षण करावे हा यां संस्थांचा उद्‌देश होता. पश्चिमी प्रबुध्दतेचा समन्वय औपनिशदिक तत्वज्ञानाशी घालण्याचा त्यांनी प्रयत्न केला होता. त्यांनी मिशनरी आक्रमणाला तर समर्थपणे तोंड दिलेच, पण भारतीय सामाजिक व धार्मिक प्रश्नांकडे पाहाण्याचा एक नवा आधुनिक दृष्टिकोणही दिला हे अधिक महत्त्वाचे आहे.

धर्मसुधारणेच्या क्षेत्रातील आणखी एका प्रवाहाचा उल्लेख करावा लागेल, तो म्हणजे दयानंद सरस्वतींनी स्थापन केलेल्या आर्य समाजाचा. या समाजाच्या मते वेदच फक्त प्रमाण असून इतर ग्रंथांमध्ये जेवढे वेदानुसार असेल तेवढेच ग्राहय आहे. धाम्रिक सुधारणेपेक्षा धार्मिक पुनरुज्जीवनावर या समाजाने जास्त भर दिला आहे. अर्थात तीन हजार वर्षांची संस्कृतीने केलेली वाटचाल मोडून वेदकालाचा आदर्श स्विकारायला लावणे हे तर्कविसंगत असल्यामुळे एक पंजाब सोडल्यास अन्य भागातील हिंदूंना या समाजाची शिकवण फारशी आकर्षक वाटली नाही हे स्वाभाविकच म्हणावे लागेल. ॲनी बेझंट यांच्या नेत्वाखाली थिऑसफिकल सोसायटीने धर्मसुधारणेच्या क्षेत्रात केलेल्या कार्याचा उल्लेखही आवश्यक आहे. विशेषतः हिंदू धर्माला जो सामाजिक संदर्भ या सोसायटीने प्राप्त करुन दिला तो फार महत्त्वाचा आहे. विवेकानंद आणि रामकृष्ण परंमहंस यांनी हिंदू धर्माला नवे स्वरुप देण्याचा प्रयत्न केला. हिंदू धर्माशस्त्राकडे नव्या दृष्टीने पाहाण्याच्या या प्रयत्नांमुळे हिंदू मनावर आधुनिकतेचे अत्यंत महत्वपूर्ण असे संस्कार झाले. खिश्चन धर्मपरिवर्तनाच्या प्रभावातून असेल, पण जाति–धर्मभेदातीत असे सेवाचरण स्वीकारुन रामकृष्ण मिशनसारखी संस्था अस्तित्वात आली.

इंग्रजी शिक्षणामुळे वाढलेल्या चिकित्सावृत्तीमुळे या समाजातील ग्रंथप्रामाण्य व अंधश्रध्दा जाऊन त्या जागी शास्त्रीय विश्लेषणाची सुरुवात झाली. स्त्री–दास्य, शूद्रांचे सामाजिक स्थान, ब्राह्मणांचे वर्चस्व इत्यांदीना कोणताच तार्किक व शास्त्रीय आधार नसल्याचे अभ्यासकांना आढळून आले.

इंग्रजी सत्तेचा याहून प्रत्यक्षपणे सामाजिक सुधारणेच्या कार्यास हातभार लागला तो सामाजिक कायदयांच्या (Social Legislation) स्वरुपात. खरे पाहता, सगळया अनिष्ठ रुढी, कर्मकांड व चालीरिती बळावण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे काळाप्रमाणे धर्माज्ञांना बदलविणारी यंत्रणाच कित्येक वर्षे हिंदूजवळ नव्हती. आधीच्या काळात भाष्यकारांनी हे कार्य केले. पण पुढे ज्यांची परंपरा खंडित झाली, त्यातच राजकीय सत्ता गमावल्यामुळे ती उणीव भरुन काढण्यासाठी सरकारी यंत्रणाही उपयोगी पडली नाही. पुढे ब्रिटिष राजवटीने सामाजिक, आर्थिक व राजकीय न्यायावर आधारलेली नवी समाजरचना उभी करण्याचे प्रयत्न केले. कायदयाचे राज्य (Rule of Law) व कायद्यासमोर समानता (Equity before the law) या दोन तत्वांचा अवलंब करुन मानवी हक्कांची त्यांनी प्रतिष्ठापना केली, असे भारतात आधी कधीच झाले नव्हते. त्यांच्या या प्रयत्नांमधूनच इथल्या विषमतेला, जातीयतेला, स्त्री–अस्पृष्य दास्याला सुरुंग लागले. नव्या विधिमंडळांनी वेळोवेळी कायदे करुन अनिष्ट चालीरितीविरुध्द, स्त्री– अधिकारांबद्दल संमतिवयाबद्दल तरतुदी केल्या.

दुसऱ्या बाजूने येथील नेतृत्वाकडूनही हिंदू धर्माला नवा अर्थ देण्याचे प्रयत्न चालूच होते. विवेकनंदानी हिंदुत्वाचे समान आधार शोधून लोकांमध्ये राष्ट्रीय अस्मिता जागृत करायला प्रारंभ केला होता. वेदान्ताचा समयोचित व सुलभ अर्थ त्यांनी लावला होता. धर्मग्रथंचे नवे भाष्यकार पुढे सरसावले होते. टिळकांनी 'गीतारहस्य' लिहून क्रियाशीलतेची प्रेरणा दिली. गीतेत व्यक्ती झालेली सामाजिक परिवर्तनाची संकल्पना स्पष्ट केली. महात्मा गांधीनी गीतेच्या स्थितप्रज्ञ कल्पनेवर व साधनषुचितेवर भर दिला. अषा अनेक विचारवंतांनी धर्मग्रंथाच्या परिशीलनातून समाज प्रबोधनाचे महान कार्य केले.

सामाजिक पुनर्जागरणाच्या या श्रेयात सुधारकाबरोबरच आपल्याला खिस्ती मिशनऱ्यांच्या कार्याचाही उल्लेख करावाच लागेल. धर्माच्या क्षेत्रात जरी त्यांना मर्यादित यशा आले असले तरी अन्य विशेषतः समाजसेवा, आरोग्य व शिक्षणक्षेत्रांमध्ये त्यांनी कमालीचे यश संपादन केले आहे. त्यांची उद्दिष्टये कोणतीही असोत, त्यांनी दुर्लक्षित, उपेक्षित व अनेक योजने जगाच्या मागे असणाऱ्या दलितांच्या व आदिवासींच्या वस्त्यांमध्ये जाऊन केलेले कार्य खचितच प्रेरक आणि गौरवास्पर आहे. स्वतंत्र भारतात या वर्गाकडे विशेष लक्ष दिले जाते ते मिशनऱ्यांनी सुरु केलेल्या कार्याचे फळ म्हणावे लागेल. त्याचप्रमाणे मिशनऱ्यांनी हिंदू धर्मावर केलेल्या टिकेमुळेही या धर्माच्या पुरस्कर्त्यांना स्वधर्माचा पुनर्विचार करण्याची निकड जाणवली ही सुध्दा वस्तुस्थिती नाकारता येणार नाही.

**राजकीय वारस :**

धार्मिक व सामाजिक क्षेत्रात विकसित झालेलया या चैतन्यामधूनच या देशात नव्या राजकीय आकांक्षांचे अंकुर फुटले. या खंडप्राय देशाच्या इतिहासात अनेक कारणांमुळे पहिल्यांदाच राष्ट्रीय अस्मितेचा उदय झाला. ब्रिटिश राज्यकर्त्यांनी देशव्यापक, सर्वत्र समान अशी प्रशासन यंत्रणा उभारल्यामुळे केंद्रनियंत्रित रेल्वेच्या जाळयामुळे व प्रांतांना जोडणाऱ्या पक्क्या सडकांमुळे संबंध देश एका एकछत्री अंमलाखाली आला. पोस्ट, टेलिग्राफ, टेलिफोन इत्यादी त्वरीत व सुलभ संपर्कसाधनांनी देवाण–घेवाण सुकर झाली. समान शिक्षण, समान माध्यम, समान आदर्श, समान प्रेरणा यांतुन बौध्दिक संपर्काची जोड वरील भौतिक संपर्काला मिळाली. समान कायदे व न्यायालयीन प्रशासन व संबंध देशाची समान अर्थव्यवस्था– अशा असंख्य, सामाजिक, आर्थक व राजकीय शक्तिप्रवाहांनी संकलितपणे एका एकसंध राष्ट्राची उभारणी या प्रदेशात केली. धार्मिक सुधारणेच्या प्रयत्नांनी या एकात्मतेला आध्यात्मिक अधिष्ठान प्राप्त करुन दिले. पाश्चात्य संस्कारातून नवी इतिहासलेखनप्रणाली इथे वाढली. आजपर्यंत कालक्रामने घटनांच्या केलेल्या नोंदी असे इथल्या इतिहासाचे स्वरुप होते. ते जाऊन आपल्या पूर्वसंचिताबद्दल अभिमान जागृत करणारा प्रेरक इतिहास नव्याने लिहिला जाऊ लागला. महादेव गोविंद रानडे यांचा 'राइज ऑफ मराठा पॉवर'हा ग्रंथ किंवा पं.जवाहरलाल नेहरुंचा 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया' हा ग्रंथ ही अशा 'राष्ट्रीय' इतिहासाची उदाहरणे म्हणून सांगता येतील. या अनेक घडामोंडीमधुन भारताची राष्ट्रीयचळवळ उभी राहिली होती. आणि या चळवळीने भारताच्या राजकीय पध्दतीवर महत्त्वाचा असा कायमचा ठसा उमटविलेला आपल्याला आजही दिसतो. पण चळवळीच्या त्या वारशाचा विचार आपण नंतर करु.

आपण एका समर्थ, सुविहित आणि ज्याला आपल्या उद्दिष्टांची स्पष्ट कल्पना आहे अशा शासनाचे प्रजाजन आहोत ही भावना इंग्रज राज्यकर्त्यांनी भारतीयांच्या मनात बिंबविली. वासाहतिक राजवटी नेहमीच समष्टी आणि व्यष्टी अशा दोन्ही पातळ्यावर स्वतःविषयी अशी अनुकूलता निर्माण करुन घेतली असेल. स्वतःचे अस्तित्व समष्ठीच्या स्तरावर सिध्द करणे त्यांना सापेक्षतः सोपे असते. पण व्यष्टीच्या स्तरावर हे प्रत्ययकारी करणे परिणामांच्या दृष्टीने त्यांना अधिक निकडीचे वाटते. त्यासाठी त्या राजवटी एका बाजूने वसाहतपूर्वकालीन राजकीय सत्तेची प्रतीके निकालात काढतात आणि दुऱ्या बाजूने स्वतःकडे अधिकृत शासनसत्तेचा दर्जा ओढून घेतात. ब्रिटिश राजवटीने भारतात हेच केले. बहादुरशहा जफर यांच्यावर त्यांच्याच राजवाडयात खटला चालवून त्यांचे प्रतीकभंजन ब्रिटिशांनी केले. त्याचबरोबर त्यांच्या तळपातळीपर्यंतच्या अधिसत्तेची उतरंडही त्यांनी मोडीत काढली. पंचम जॉर्जच्या गौरवगीतांचे सामुदायिक गायन यासारख्या

गोष्टींतून त्यांनी वासाहतिक सत्ततेला अनुकूल जनमानस आणि राजकीय संस्कृती निर्माण केली. साम्राज्यसत्तेचा आव व दबदबा जनसामान्यांपर्यंत पोहचावा यादृष्टीने कोटींच्या कामाकाचा दरबारी थाट कलेक्टर कचेऱ्यांचा सरंजामशाही डामडौल, जिल्हा पोलीसप्रमुखाचे कार्यालय, लष्करी छावण्यांमधील कवायत मैदाने या सर्वांची जाणीवपूर्वक रचना केली गेली. (सव्यसाची भट्टाचार्यः 'कलोनियल पॉवर ऑफ मायक्रो सोशल इंटरॅक्शन–नाईन्टीथ सेंच्यूरी इंडिया, इकॉनॅमिक अॅड पोलिटिकल वीकली, १–८ लजून, १९९१, १३९९–१४००'). पूर्वीच्या राज्यकर्त्यांपेक्षा या राज्यकर्त्यांचे वेगळेपण लोकांना जाणवले. पेंढारी, दरोडेखोर यांचा बंदोबस्त करुन लोकांना त्यांनी अराजकातून सोडविल्यामुळे, मानवी जीवन त्यांनी सुरक्षित केल्यामुळे, वारंवार होणारी युध्दे थांबवून सापेक्षतः शांतता (Pax britanica) प्रस्थापित केल्यामूळे व संपर्काची साधने पुरविल्यामुळे पूर्वीच्या राज्यकर्त्यांपेक्षा या राज्यकर्त्याबदद्ल जनमानसात आदराची भावना निर्माण झाली. अशा शासनाची आवश्यकता लोकांना पटली, ग्रामीण भागात सरकारी तलाठी, पटवाऱ्यांच्या रुपाने व शहरी भागात अनेक सरकारी कार्यालयांच्या स्वरुपात शासनाचेअस्तित्व लोकांना जाणवू लागले. हे शासन परक्याचे आहे अशी काही अंशी धारणा शहरी भागात असली तरी एकंदरीत शासकीय अधिकाऱ्यांना व नोकरांना समजाकडून सन्मान मिळत होता. आपल्या गरजांच्या पूर्तीसाटी शासनाकडे पाहाण्याची सवय जडत होती. १९४७ साली आलेल्या नव्या सरकारला हा वारसा पुढे चालविण्याक्षेरीज गत्यंतरच नव्हते. नव्या सरकारात साम्राज्यशाहीची जरब कमी झाली. नोकरशाहीचा प्रभावही पूर्वीपेक्षा कमी झाला. शासनाचे स्वरुप अधिक प्रत्यक्ष व व्यापक झाले. शासनाचे कार्यक्षेत्र प्रचंड प्रमाणावर विस्तारले. समाजवादी, लोककल्याणकारी शासनप्रणालीचा स्वीकार केल्यामुळे अनेक नव्या क्षेत्रांत शासनाच्या पुढाकाराने नवे कार्यक्रम हाती घेतले गेले. आर्थिक, औद्योगिक व सामाजिक क्षेत्रांतही शासनावर असलेले जनतेचे अवलंबन वाढले. ग्रामीण व शेतकी विकासाच्या नवीन योजना शासनाने हाती घेतल्या. अशा अनेक मार्गांनी परकीय राज्यकर्त्यांचा वारसा अनेक पटींनी वृध्दिंगत होऊन पुढे चालू राहिला. शासनाचे महत्व, त्याच्या स्थैर्याची व सामर्थ्याची निकड, शासनावलंबन भारतात खूप मोठया प्रमाणावर दिसून येते. स्थैर्य–सामर्थ्यांच्या या निकडीमुळेच येथील घटनेत प्रमाणबध्द प्रतिनिधित्व टाळण्यात आले आहे. याचप्रमाणे प्रतिबंधक स्थानबध्दता, आणीबाणीच्या तरतुदी, मुलभूत हक्कांवरील तपशीलवार मर्यादा इत्यादीसंबंधी घटना समितीत झालेल्या चर्चांमधूनही घटनाकारांची ही मनःस्थिती व्यक्त झाली आहे.

शासनाच्या, कार्यक्षेत्राप्रमाणेच भारताची शासनयंत्रणासुध्दा इंग्रजी राजवटीचा महत्वाचा वारसा म्हणता येईल. भारताने अमेरिकेच्या धर्तीची संघराज्यात्मक रचना स्विकारुन तिचा मेळ इंग्लंडच्या धर्तीच्या संसदीच रचनेशी घालण्याचा प्रयत्न घटनेत केला आहे. खरे तर असे करण्यावाचून घटनाकारांना अन्य मार्गच नव्हता. भारताचा खंडप्राय विस्तार, परमावधीची भाषिक, सांस्कृतिक व प्रादेशिक विविधता, प्रश्नांचे प्रांतविशिष्ट

स्वरुप, या सर्व आणि इतरही अनेक घटकांमुळे येथे केंद्रीभूत, एकात्म शासन जवळपास अशक्यच होते. तसेच इंग्रजी राजवटीने स्वातंत्र्यपूर्व काळात जी प्रातिनिधक विधिमंडळे स्थापन केली होती त्यांची कार्यपध्दती व जबाबदारीचे तत्व यामुळे संसदीय लोकशाहीचे ठळक पायंडेही या देशात पडत आले होते. किंबहुना काँग्रेस पक्षांतर्गत रचना आणि कार्यपध्दती ही इंग्लंडच्या संसदीय तत्वानुरुपच होती. त्यामुळे येथे संसदीय लोकशाहीचा स्वीकार होणे ही एका प्रदीर्घ राजकीय प्रक्रियेची अपरिहार्य परिणती होती. अध्यक्षीय लोकशाही इथल्या संस्कारांच्या, सवयींच्या चौकटीत बसणे शक्यच नव्हते. म्हणजे भारतीय शासनाच्या या दोन ठळक रचना–वैशिष्ठयांच्या आकारणीचा प्रारंभ कळत नकळत इंग्रजी अमदानीतच झाला होता. संघराज्य रचनेचा कच्चा आराखडा १९३५ च्या कायदयात स्पष्टपणे मांडण्यात आला असला तरी ती रचना आकारण्याचा प्रारंभ बरीच वर्षे आधी झाला होता. इथे आल्यानंतर इंग्रजांनी ज्या वखारी मुंबइ, कलकत्ता व मद्रास या शहरांत स्थापन केल्या, त्या एकमेकांपासून स्वतत्र होत्या आणि त्या स्वतंत्रपणे ईस्ट इंडिया कंपनीच्या डायरेक्टर्सशी संलग्न होत्या, या वस्तुस्थितीत काही लोक संघराज्य रचनेचा उगम शोधतात. कंपनीकडून इंग्लंडच्या संसदेकडे कारभारत गेल्यावरही येथील संस्थानिकांच्या अनेक राज्यांना बरीच स्वायत्ता उपभोगता येत होती. यामुळे पुढील काळात झालेल्या संघराज्य रचनेच्या विकासाला फारशी बाधा आली नाही. १८६१ साली प्रांतांना आपले विधि अधिकार परत मिळाले. प्रांत व केंद्र यांच्यात विचारविनिमयाची असलेली तरतूदही या संदर्भात महत्वाची ठरली. प्रांतांना अधिकाधिक स्वायत्त व स्वयंपूर्ण करणे व प्रांतसरकारे प्रांतातील जनतेला जबाबदार करणे या दोन्ही परस्परपूरक प्रक्रिया इथून सुरु झल्या. १९१७ च्या मॉटेग्यू घोषणेमध्ये व १९१९ च्या मॉटफर्ड सुधारणांमध्ये हे सपष्ट स्वरुपात व्क्त झाले. भारतात द्विदल राज्यपध्दतीची (Diarchy) आरंभ या कायदयामुळे झाला. त्या अन्वये अधिकारांचे वर्गीकरण 'हस्तांतरीत' व 'राखीव' असे करण्यात येऊन हस्तांतरीत अधिकार जनतेला जबाबदार असलेल्या मंत्र्यांच्या, व राखीव अधिकार शासकीय अधिकाऱ्यांच्या हाती सोपविण्यात आले. स्वाभाविकच केंद्राची प्रांतावरील पकड जितकी सैल होईल तितकी या द्विदल राज्यपध्दतीच्या यशाची शक्यता अधिक होती. या रचनेला संघराज्यात्मक म्हणता येत नसले तरी ती विकेंद्रकरणापेक्षा निराळी व अधिक व्यापक निश्चितच होती, असा निर्वाळा मॉरिस जोन्सने दिलेला आहे. केंद्र व प्रांत यांच्यातील अधिकार, महसूल साधने इत्यांदीची विभागणी त्यात करण्यात आली होती. नोकरशाहीची पकड पूर्वीहून शिथिल केली होती. म्हणून संघराज्याच्या दिशेने पडलेले हे पुढचे पाऊलच म्हणता येईल.

अनेकविध प्रयत्न, चळवळी, वाटाघाटी इत्यांदीमधून हे संक्रमण घेत होते. माँटफर्ड सुधारणांच्या नंतरच्या काळात संघराज्याची कल्पना वारंवार मांडली जाऊ लागली. प्रांतांच्या व प्रांतातील हस्तांतरीत अधिकारांच्या कक्षा विस्तारण्याच्या मागण्या होत राहिल्या. संघराज्याच्या या वाटचालीत सुमारे सहाशे स्वायत्त

संस्थाानिकांचा प्रश्न हा सर्वात मोठा अडसर होता. मोगल राजवटीनंतरच्या अराजकातून निर्माण झालेली ही संस्थाने ब्रिटिशांनी विलीन नकरता तशीच ठेवली. संक्रमणकाळातील स्थित्यंतरानांच त्यांनी स्थैर्य देऊन टाकले, आणि वरुन त्यांच्या कारभारात हस्तक्षेप न करण्याचे त्यांना वचनही दिले. त्यांनी केवळ शांततापूर्ण राज्य चालवावे एवढीच फक्त अट घातली. संस्थानिकांची अस्मिता यातून जोपासली गेली. आणि पुढे भारताच्या व्यापक अस्तित्वात स्वेच्छेने विसर्जित होणे त्यांना मानवले नाही. संघराज्याचा या देशातील या काळातील विचार देशाचा हा निम्मा भाग नरजेआड ठेवूनच केला जात असे. १९३५ च्या कायदयाने मात्र हा प्रश्न लक्षात घेऊन त्यासाठी तरतूदही केली होती. सदर कायदयानुसार प्रांताचे संघराज्य स्थापन करुन, ज्या संस्थानिकांना संघराज्याशी संलग्न व्हायचे असेल त्यांना 'संलग्नीकरणाच्या दस्तऐवजावर (Instrument of accesion)' सही करुन तसे करता येत असे. परिणामी अस्तित्वात आलेल्या संघराज्याचे स्वरुप अत्यंत विचित्र झाले. त्यातील घटकराज्यांची संख्या मोठी होती. त्यांच्या रचनांमध्ये व केंद्राशी त्यांच्या असलेल्या संबंधामध्ये विभिन्नता होती. संस्थानिकांनी पुरसो प्रतिसाद न दिल्याने हा कायदा संपूर्ण संघराज्य निर्माण करु शकत नाही. मात्र प्रांतामध्ये प्रातिनिधिक व जबाबदार शासनाच्या हाती पूर्ण सत्ता व केंद्रापासून स्वायत्ततेचे निश्चित असे क्षेत्र या कायदयाने दिले, तसेच संघराज्यातील न्यायालयाचे स्वरुपही त्याने निर्धारित केले. यामुळेही घटनाकारांनी संघराज्यरचनेसाठी या कायदयाकडे धाव घेतली आणि अगदीच किरकोळ फेरफाळ करुन ती रचना स्वातंत्र्योत्तर काळासाठी स्वीकारली.

भारतासाठी पाश्चात्य राज्यकर्त्यांनी निर्मिलेल्या व कॉंग्रेसने आग्रहाने मागितलेल्या संसदीय संस्थांनी स्वातंत्र्योत्तर काळातील संसदीय लोकशाहीची पायाभरणी ब्रिटिश राजवटीतच झाली होती या काळातील विधिमंडळाच्या कार्याच्या वारशाचा तपशील याच प्रकरणात पुढे करण्यात आला आहे. प्रौढ मतदानाच्या आधारे झालेल्या निवडणुका, प्रातिनिधिक शासन, कार्यकारी मंडळाचे विधिमंडळास उत्तरदायित्व, चर्चा आणि वादसंवाद यांमधुन निर्णय घेण्याची रीत, व्यक्तींच्या अधिकारांना इतर व्यक्तीपासून नव्हते तर शासनापासूनही दिले जाणारे संरक्षण, वर्ग–जाति–निरपेक्ष, समान वर्तणूक देणारी स्वतंत्र न्यायव्यवस्था इ. परंपरामध्ये एकंदरीत अभावानेच आढळणाऱ्या नवीन व्यवस्था पुरवून सरकारने इथल्या राज्यपध्दतीला संसदीयच लोकशाहीच्या दिशेने प्रवृत्त केले. वरच्या स्तरांवर हे पूर्णपणे होऊ शकले नाही. राज्यकर्त्यांचे वांशिकि आणि साम्राज्यशाही हितसंबंध त्याच्या आड आले. पण खालच्या स्तरांवर मात्र भरपूर प्रमाणात या व्यवस्था प्रत्यक्षात उतरल्या आणि जनतेला त्याचप्रमाणो प्रतिनिधींनाही लोकशाही शिक्षण त्यातूतन प्राप्त झाले.घटनाकारांनी इंग्लंडच्या संसदीय लोकशाहीचे जवळजवळ सगळेच लिखित–अलिखित संकेत भारतीय शासनव्यवस्थेत स्वीकारले आहेत.[१६]

**समस्यांचा आणि आव्हानांचा वारसा :**

हजारो वर्षापासून गतिरुध्द झालेली उतरंडवजा सामाजिक संरचना बदलण्याचे सर्वात मोठे आव्हान समोर होते. परकीय राज्यकर्त्यांनी काही सामाजिक सुधारणा केल्या असल्या तरी एकंदरीत त्यांचे धोरण सामाजिक बाबतीत हस्तक्षेप न करण्याचे होते. भारतीय समाज विषमतांनी विभक्त असणे आणि येथील सगळ्या भाषिक, धार्मिक, प्रादेशिकि विविधतांमध्ये सतत रस्सीखेच सुरु असणे त्यांच्या पथ्यावरच पडणार होते. स्वातंत्र्योत्तर काळात मात्र या विविधतांना एकात्मतेच्या सुत्राने सांभाळणे गरजेचे होते. निरक्षरतेचे प्रचंड प्रमाण हा सामाजिक सुधारणेच्या आणि अभिसरणाच्या वाटेतील मोठाच अडसर होता. बहुभाषिक, बहुवांशिक व पृथगात्म अशा या पारंपरिक समाजात आधुनिक राष्ट्रबांधणीची सुरुवात करायची होती. लोकांच्या अपेक्षा स्वातंत्र्यामुळे प्रचंड उंचावलेल्या होत्या.

मागास अर्थव्यवस्था, लोकांचे अठराविश्वे दारिद्रय, बेरोजगारी, विकासाचा रुतून पडलेला गाडा येथील धनाची व संसाधनांची साम्राज्यशाहीने केलेली लूट आणि कारखानदारीने मोडून पडलेले ग्रामोद्योग व हस्तकला, शेतजमिनीची नापिकी आणि शेतमजुरीत झालेली घट, आणि आर्थिक विकासातील प्रादेशिक असमतो अशी अनेक अरिष्टे या नवस्वतंत्र देशाला भेडसावत होती.

राष्ट्रीय चळवळीत जनतेला दिलेल्या आश्वासनांचा, ती पूर्ण करण्याआड येणाऱ्या अडचणींचा व न सुटणाऱ्या अनेक समस्यांचाही वारसा नव्या राज्यकर्त्यांकडे चालत आला आहे. गरिबी हटविण्याचे आश्वासन राष्ट्रीय मोहिमेतही दिले गेले होते. आर्थिक विकसनाच्या विचाराला सर्वश्री दादाभाई नवरोजी, रोमेश दत्त, रानडे, गोखले इत्यादिकांनी चालना दिली होती. समाजवादी उद्‌दिष्टांच्या दिशेने योजना आखतांना १९३१ च्या कराची अधिवेशनात याचा स्पष्ट उल्लेख केला गेला होता. चळवळीने कॉंग्रेसला आर्थिक स्वातंत्र्यासाठी, स्वावलंबनासाठी वचनबध्द केले होते. नियोजन यंत्रणा आकार घेत होती. उद्योगधंदे, जमीनसुधारणा, ग्रामीण अर्थव्यवस्था, ग्रमोद्योग अशा अनेक क्षेत्रांतून आव्हाने उभी राहिली होती. दुसरीकडे, संघराज्याच्या दिशेने घटनांचा ओघ जात होता, पण केंद्र–राज्ये यांच्यातील संबंध ठरायचे होते. अल्पसंख्याकांच्या हितसंबंध संरक्षणाचे प्रश्न होते, संस्थानिकांचा प्रश्न होता, प्रांतांच्या सीमा भाषावार तत्वांच्या आधारे आखण्याचे आश्वासन दिले गेले होते. त्याचीही पूर्तता करायची होती. या सर्व प्रश्नांना देशाच्या फाळणीने एक वेगळेच वळण मिळाले होते. फाळणीने ज्यांना विस्थापित केले होते त्यांच्यासाठी स्वातंत्र्य ही एक अमूर्त गोष्ट होती. फाळणीमुळे निर्माण झालेल्या समस्या मात्र मुर्त स्वरुपात दिसत होत्या. फाळणीने भारताचे राजकारण आणि समाज इतिहासाच्या सर्वसाधारण क्रमापासून दूर गेला. संविधाननिर्मितीच्या प्रक्रियेत फाळणी या एका घटिताने

संघराज्यरचना, अल्पसंख्याकांचे हक्क व संरक्षणे, मुलभूत हक्कांवरील मर्यादा अशा अनेक पैलूंना प्रभावित केले. अनेक आव्हानांना सामोरे जायचे होते. संविधानाचा सगळाच तपशील ठरायचा होता. गांधीजींची घटनाविषयक आदर्श कल्पना संसदीय– संघराज्यात्मक चौकटीत कशी बसवावी हा प्रश्न होता. हे आणि असे कित्येक प्रश्ना सत्तांतराच्या वेळी नव्या राज्यकर्त्यांनी सत्तेबरोबरच स्वीकारले आणि ते सोडविण्याच्या प्रयत्नांतूनच स्वतंत्र भारताची राज्यपध्दती आपला आकार सावकाशपणे घेऊ लागली.

अशाप्रकारे १८२ वर्षांचे ब्रिटिश साम्राज्य संपुष्टात येऊन एका महत्त्वाच्या व चिरस्मरणीय कालखंडाची इतिश्री झाली. बिस्मार्क म्हणाला होता, 'इथल्या ब्रिटिश साम्राज्याचा जर अंत व्हायचा असेल तर त्याचे भारतातील कार्य हे एक चिरंतन स्मारक ठरेल' ते खरे ठरले आहे. जोपर्यंत भारत देश आहे, तोपर्यंत ब्रिटिशांच्या बऱ्यावाईक प्रभावखुणा मिटणे अशक्य आहे. [१७]

## १.५ भारतीय संविधानाची जडणघडण :

भारतीय संविधानाच्या शिल्पकारांनी कोणते महत्त्वाचे निर्णय घेतले? ते घेण्यास त्यांना कोणत्या घटकांनी प्रवृत्त केले? साम्राज्यशाहीचा वारसा, प्रभाव आणि राजकीय संरचना यांचा भारतीय संविधानाच्या रचनेत किती वाटा आहे? भारतीयांच्या स्वातंत्र्यलढयाच्या प्रेरणा, तत्वे आणि उद्दिष्टे यांनी ते कितपत प्रभावित झाले आहे? नवस्वतंत्र जनतेच्या आशा आकांक्षांची परिपूर्तता करण्याचे जाणीवपूर्वक प्रयत्न संविधानकारांनी केले आहेत काय? या आणि अशा प्रश्नांची उत्तरे शोधायची आहेत.

भारताची घटना ही जगातील प्रदीर्घतम घटना असून अवघ्या तीन वर्षांच्या कालावधीत ती तयार करण्यात आली आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताच्या जमेच्या बाजूला ज्या गोष्टींचा समावेश करावा लागेल, त्यात घटनानिर्मिती ही एक ठळक बाब असेल. हे कार्य अत्यंत अवघड होते. आव्हान देणारे होते. देशाचा नुसता खंडप्राय आकारच नव्हे, तर इथल्या प्रश्नांची विविधता आणि गुंतागुंत, अतिशय तणावपूर्ण असलेली भोवतालची परिस्थिती, राष्ट्र ऐक्य आणि स्थैर्य यांची निकड इत्यादी असंख्य कारणांमुळे घटना समितीचे कार्य हे अधिकच अवघड झाले होते. जी लोकशाहीबरोबरच सामाजिक न्यायाचीही हमी देऊ शकेल; जी सामाजिक परिवर्तनासाठी व राष्ट्रात नवे चैतन्य आणण्यासाठी आवश्यक असलेले स्थैर्य व ऐक्य निर्माण करु शकेल; अल्पसंख्याकांच्या हितसंबंधाना जी संरक्षण देऊ शकेल– अशी घटना तयार करणे हे घटनाकारासमोरील उद्दिष्ट होते. आदर्शवाद आणि व्यवहारी दृष्टी यांचा अतिमनोहर समन्वय भारतीय घटनेच्या कलमांमधून झालेला आढळतो. मार्गदर्शक तत्वे, मूलभूत हक्क वा न्यायालयीन व्यवस्था, इत्यादी

तरतूदींमधून जो आदर्शवाद डोकावतो तो स्वातंत्र्य चळवळीला असलेल्या व्यापक सामाजिक संदर्भातून अपरिहार्यपणे आलेला आहे. जर प्रशासनाच्या कार्यक्षमतेच्या दृष्टीने किंवा आणीबाणीच्या परिस्थितीच्या दृष्टीने; किंवा संघराज्या कामकाजाच्या दृष्टीने करण्यात आलेलया (आणि अन्यही कित्येक) तरतुदींमधील घटनाकारांची व्यवहारी दृष्टी दिसून येते. समिती सदस्यांच्या प्रदीर्घ अनुभवाने त्यांना दिलेली ही दृष्टी होती. देशांतर्गत परिस्थिती आणि जागतिक घडमोडींचा परिणामही घटनानिर्मितीवर पडल्यावाचून राहिला नाही. घटना समितीची घटना निर्मिती व विधिमंडळ अशी दुहेरी भूमिका घटनाकांराना वस्तुस्थितीपासून दूर जाऊ देत नव्हती. अन्नतुटवडा, साम्यवाद्यांचे उठाव, जातीय जणाव इत्यादी प्रश्नांचा परिणाम घटनेच्या कलमांवर पडणे अपरिहार्यच होते.

संसदीय लोकशाहीसंबंधी, संघराज्य–रचनेसंबंधी, विधिमंडळ– रचनेसंबंधी व अशा अनेक बाबींसंबंधी जगातील इतर राष्ट्रांचे अनुभव घटनाकारांच्या समोर होते. त्यांनी सढळ हातांनी बाहेरऱ्या घटनांकडून उसनवारी केलेली आढळते. १९३५ च्या कायद्याशी भारतीय संघटनेचे बरेच साधर्म्य आहेच. पण अमेरिका, राष्ट्रकुलातील इतर देश, आयर्लंड आणि सोविएट देषांच्याही घटनांमधून काही कल्पना विशेषतः सामाजिक बाबीसंबंधी उचलून त्यांचा समावेश भारताच्या घटनेत करण्यात आला आहे. अर्थात ही सगळी सामग्री घटनाकारांनी भारतीय परिस्थितीनुसार व गरजांच्या अनुषंगाने घटनेत वापरली आहे हे निर्विवाद, त्याचप्रमाणे इकडून थेडे, तिकडून थोडे उचलून घिसाडघाईने कशीबशी उभी केलेली ही घटना नाही, किंवा केवळ परकिय घटनातज्ज्ञांच्या पुस्तकी स्ल्लावरही ती आधारलेली नाही. तर घटना समितीने केलेल्या दीर्घ विचारमिर्षातून व सांगोपांग चर्चामधून ती आकाराला आली आहे. ती भारताच्या परिस्थितीतून उद्‌भवलेली आहे. तिचा भारतीय परिस्थितीशी असलेला हा संदर्भ लक्षात घेऊन तिच्या उत्पत्तीसंबंधी चर्चा करणे हा प्रस्तुत प्रकरणाचा हेतू आहे. ही केवळ प्रसंगाची कालक्रमाने दिलेली जंत्री नाही किंवा घटनाविकासाचा अतिवैधानिक स्वरुपात इतिहासही नाही. असलाच तर हा घटनेचा राजकीय इतिहास आहे. भूतकाळ, वर्तमानकाळ, अंतिम हेतू व तात्कालिक प्रश्नप्रसंग इत्यादिकांचा घटनानिर्मिती, घटनेच्या कलमांवर व आशयावर, घटनेत अंतर्भूत राजकीय रचनांवर कसा प्रभाव पडला आहे; घटनाकारांनी घेतलेल्या काही निर्णयाचा कार्यकारणभाव काय; देशाच्या फाळणीमुळे घटनाकारांना आपल्या अनेक निर्णयांमध्ये कोणते फेरबदल करावे लागले, इत्यादी प्रश्नांना वेध घेण्याचा हा प्रयत्न आहे. [१८]

## १.६ प्रतिनिधिक शासनाचा विकास :

## घटना निर्मिती–

सहा डिसेंबर १९४६ रोजी सुरुवातीच्या घटना समितीच्या पहिल्या अधिवेशनात पं. नेहरुंनी जो 'उद्दिष्टांचा ठराव' (Objectives Resolution) मांडला होता त्यात घटना समितीसमोर उभ्या असलेल्या कार्याचा व कार्यक्रमाचा कच्चा आराखडाच व्यक्त झाला होता. भारताला स्वतंत्र सार्वभौम गणराज्य म्हणून जाहीर करणे, संघराज्याची आखणी करणे, सर्व सत्ता जनतेच्या हाती देणे ही नेहमीची कामे तर घटना समितीला पार पाडाची होतीच, पण त्याबरोबरच सर्व जनतेस सामाजिक, आर्थिक व राजकीय न्यायाची हमी देणे, कायद्याच्या दृष्टीने व संधीच्याही बाबतीत समता प्रस्थापित करणे, मूलभूत स्वातंत्र्याला संरक्षण देणे, जे अल्पसंख्य आहेत, मागास आहे त्यांच्या विकासासाठी खास तरतुदी करणे, इत्यादींचा उल्लेख करुन या ठरावात शेवटी म्हटले आहे की, या प्राचीन देशाला जगात आपले योग्य व सन्मानाचे स्थान प्राप्त होऊ शकेल आणि तो जागतिक शांततेकरिता व मानवी कल्याणकरिता हातभार लावू शकेल असे प्रयत्न करणे हे घटना समितीसमोरील उद्दिष्ट असेल.

सामाजिक क्रांतीचे व्यापक चित्रच यात मांडण्यात आले असून, त्यासंबंधी मतभेद संपवू शकत नव्हते. समितीने भारताला अशी घटना द्यायची होती की, जिच्याद्वारे नागरिकांच्या किमान गरजांची पूर्ती होईल, प्रत्येकाचा त्याच्या त्याच्या कुवतीनुसार विकास साध्य होईल, धर्माच्या व रुढींच्या जाचक बंधनातून समाज सुटू शकेल, त्याला आधुनिकीकरणाचा आधार असेल. तो आधार कायद्याचा, व्यक्तिगुणांचा व सेक्युलर शिक्षणाचा असेल, अंधश्रध्दांचा, जन्मनिष्ठ विषमतेचा व धर्माधतेचा नव्हे. आर्थिकदृष्टया जुनी ग्रामीण अर्थव्यवस्था बदलून तिच्या जागी नवी नियोजनप्रधान अर्थव्यवस्था यावी असे सगळे सामाजिक, आर्थिक परिवर्तन घडवून आणता न आल्यास घटना समितीचे कार्य व्यर्थ ठरले अशी सदस्यांची पक्की धारणा होती. हे परिवर्तन तेव्हाच शक्य होईल जेव्हा राष्ट्राचे ऐक्य अबाधित असेल, शासनात स्थैर्य असेल आणि जास्तीत जास्त लोकांचा शासनाला पाठिंबा असेल, या तिन्ही गोष्टी साध्य करायच्या तर घटनेचे स्वरुप कसे असावे? एककेंद्री की संघराज्यात्मक; पाश्चात्य परंपरवर आधारलेले की भारतीय परंपरावर? संसदीय की अध्यक्षीय? अशा प्रश्नांना सर्वप्रथम उत्तरे घटना समितीला द्यायची होती. [१९]

**संसदीय कार्यपालिका :**

भारताची लोकशाही अमेरिकेप्रमाणे अध्यक्षीय असावी की इंग्लंडप्रमाणे संसदीय, की स्वित्झर्लंडप्रमाणे असावी, या प्रश्नावर जनप्रतिनिधींचा कौल घेण्याच्या हेतूने घटना सल्लागारांनी एक प्रश्नपत्रिका केंद्र व प्रांत सरकारांमधील विधिमंडळ सदस्यांना देऊन त्यांची मते मागितली असता, एक सोडून सर्व सदस्यांनी ब्रिटिश धर्तीच्या संसदीय पध्दतीला पाठिंबा व्यक्त केला होत. घटनाकारांना ही निवड करीत असताना, भूतकाल, वर्तमानकाल तसाच भविष्यकालाचाही विचार करणे भाग होते. लोकांना व त्यांच्या प्रतिनिधींनाही संसदीय संस्था राबविण्याचा सराव झाला होता हे भूतकालच्या दृष्टीने संसदीय रचना स्विकारायला लावणारे कारण होते. त्याचबरोबर वर्तमान व भविष्याचीही तीच गरज होती. मोठया प्रमाणावर औद्योगिक, शेतकी व सामाजिक विकासाला प्रारंभ करायचा होता. एवढया प्रचंड लोकसंख्येला कार्यक्षमपणे व न्याय्यपणे नियंत्रित करायचे होते. कार्यपालिका व विधिमंडळ यांना एकजिनसीपणे कार्य करता येण्याची नितान्त आवश्यकता होती. या व अशा अनेक कारणासाठी घटना समितीने संसदीय पध्दतीचा निर्णय घेतला. काळाच्या जबाबदाऱ्या पेलू शकणाऱ्या समर्थ, प्रभावी व चपळ असून लोकशाही असणाऱ्या शासनाच्या निर्मितीचा तोच एक र्मा होता.

अलादी कृष्णस्वामी अय्यर म्हणाले होते त्याप्रमाणे भारतासारख्या बाल्यावस्थेतील लोकशाहीला अध्यक्षीय पध्दतीचा भार पेलवला नसता. विधिमंडळ व कार्यपालिका यांच्यात निरंतर तणाव निर्माण होण्याचा त्या पध्दतीत फार मोठा धोका होता. अध्यक्षीय पध्दतीचा स्वीकार केल्यास राज्यांमध्ये तर अतिशयच अनवस्था परिस्थिती निर्माण होईल, असा इशाराही त्यांनी केला होता. असाही एक विचार घटना समितीसमोर मांडण्यात आला होता की, भारतातील पक्ष व राजकीय समूह हे राजकीय विचरसरणीपेक्षा धर्मविचारांवर व श्रध्दांवर अधिष्ठित आहेत. अशा स्थितीत इथे ब्रिटिश पध्दतीपेक्षा स्वित्झर्लंडप्रमाणे मंत्रिमंडळाच्या निर्वाचनाची पध्दत अधिक अनुरुप ठरेल. कारण धार्मिक समूहांसाठी व गटांच्या हितसबंधांसाठी तिचे औचित्य सिध्द झाले आहे. काहींनी दुसराच एक पर्याय सूचविला होता. संसदेत जे गट असतील त्या सर्वांना मंत्रिमंडळावर प्रतिनिधत्व दिले जावे. हे प्रतिनिधत्व त्यांच्या संसदेतील सदस्यत्वाच्या प्रमाणात असावे. असे झाले म्हणजे मंत्रिमंडळ व संसद परस्परांना अधिक चांगल्या प्रकारे समजावून घेऊ शकतील, असे हे मत मांडणारांचे म्हणणे होते. अर्थात हे दोन्ही पर्याय घटना समितीस मान्य होणे शक्यच नव्हते. कारण त्यांचा अवलंब केल्यामुळे देशाचे राजकीय जीवन दुभंगेल, एकजिनसीपणाला तडे जातील अशी रास्त भीती घटनाकारांना वाटत होती. नेहरु तर म्हणाले होते की, दुर्बल मंत्रिमंडळे व दुर्बल शासने निर्माण करण्याचा प्रमाणबध्द प्रतिनिधत्वाधारे मंत्रिमंडळे निवडण्याइतका हमखास असा दुसरा मार्गच नाही. तो जातीयवादाला मागच्या दरवाजाने प्रवेश देण्याचा ठरेल.

बहुपक्षीय कार्यपालिकेची शोकांतिका अंतरिम शासनात घडताना त्यांनी आपल्या डोळ्यांनी पाहिली होती. म्हणून स्थैर्य, सामर्थ्य व कार्यक्षमता या दृष्टींनी इतर प्रकारांपेक्षा ब्रिटिश कॅबिनेट पध्दतीच भारताला योग्य ठरेल, असे मत घटना समितीचे पडले. के.टी. शहांच्या शब्दात सांगायचे तर 'गेल्या शंभर वर्षात भारताचे सार्वजनिक जीवन इंग्लंडच्या घटनात्मक कायदयाच्या परंपरांनी संचलीत होत आले आहे. आमच्या पैकी अनेकांनी ब्रिटिश शासनप्रणालीला सर्वोत्तम मानले आहे आणि गेल्या तीस–चाळीस वर्षापासून तर या देशात अंशतः जबाबदार शासनाचा क्रमशः प्रारंभही झाला आहे. आमच्या घटनात्मक परंपरा संसदीय झाल्या आहेत. आज भारत सरकार एक संपूर्णपणे संसदीय सरकार म्हणून कार्यान्वित आहे. इतक्या प्रदीर्घ अनुभवानंतर या परंपरा नष्ट करुन आम्ही नवा प्रयोग कशासाठी करावा?'

प्रतिनिधत्वाधारे मंत्रिमंडळे निवडण्याइतका हमखास असा दुसरा मार्गच नाही. तो जातीयवादाला मागच्या दरवाजाने प्रवेश देण्याचा ठरेल. बहुपक्षीय कार्यपालिकेची शोकांतिका अंतरिम शासनात घडताना त्यांनी आपल्या डोळ्यांनी पाहिली होती. म्हणून स्थैर्य, सामर्थ्य व कार्यक्षमता या दृष्टींनी इतर प्रकारांपेक्षा ब्रिटिश कॅबिनेट पध्दतीच भारताला योग्य ठरेल, असे मत घटना समितीचे पडले. के.टी. शहांच्या शब्दात सांगायचे तर 'गेल्या शंभर वर्षात भारताचे सार्वजनिक जीवन इंग्लंडच्या घटनात्मक कायदयाच्या परंपरांनी संचलीत होत आले आहे. आमच्या पैकी अनेकांनी ब्रिटिश शासनप्रणालीला सर्वोत्तम मानले आहे आणि गेल्या तीस–चाळीस वर्षापासून तर या देषात अंशतः जबाबदार शासनाचा क्रमशः प्रारंभही झाला आहे. आमच्या घटनात्मक परंपरा संसदीय झाल्या आहेत. आज भारत सरकार एक संपूर्णपणे संसदीय सरकार म्हणून कार्यान्वित आहे. इतक्या प्रदीर्घ अनुभवानंतर या परंपरा नष्ट करुन आम्ही नवा प्रयोग कशासाठी करावा?'[२०]

**भारतात प्रातिनिधक शासनाचा विकास होत असताना कारणीभूत ठरलेले कायदे–**

**१–** १७७३ – नियामक कायदा

२– १७८१ – संशोधनात्मक कायदा

३– १७८४ – पिटचा भारत कायदा

४– १७८६ – चा कायदा

५– १७९३ – चार्टर कायदा

६– १८१३ – चार्टर कायदा

७– १८३३ – चार्टर कायदा

८– १८५३ – चार्टर कायदा

९– १८५८ – भारताला चांगले शासन देण्याचा कायदा

१०– १८६१ – भारतीय कौन्सिल कायदा

११– १८९२ – भारतीय कौन्सिल कायदा

१२– १९०९ – मोर्ले–मिंटो सुधारणा कायदा

१३– १९१९ – मॉटेग्यु चेम्सफोर्ड सुधारणा कायदा

१४– १९३५ – भारत सरकार कायदा

## १.७ लोकसभेची विश्लेषणात्मक माहिती :

**लोकसभा :**

लोकसभा हे भारतीय संसदीय शासन प्रणालीमधील कनिष्ठ सभागृह आहे. लोकांचे थेट प्रतिनिधीत्व करणारे सभागृह म्हणून ओळखले जाते. त्यामुळेच लोकसभेस व्यापक व प्रभावी अधिकार देण्यात आले आहेत.

**सदस्य संख्या :**

५५२ – कमाल सदस्य संख्या

५३० – घटकराज्याचे प्रतिनिधी

२० – केंद्र शासित प्रदेशाचे प्रतिनिधी

२ – अंग्लो इंडियन समुदायाचे प्रतिनिधी नियुत करता येतात.

सद्य:स्थितीत एकूण ५४५ सदस्य संख्या असून तिचे वितरण पुढीलप्रमाणे : [२१]



**लोकसभा निवडणुका :**

लोकसभा सदस्याची निवडणूक ही प्रत्यक्ष लोकांकडून प्रादेशिक मतदारसंघाच्या माध्यमातून घेतली जाते. साधारणतः लोकसभा सदस्य हे पाच वर्षाच्या कालावधीसाठी निवडले जातात. राष्ट्रीय आणीबाणीच्या काळात त्याचा कालावधी एक वर्ष किंवा त्याच्यापेक्षा अधिक वेळा वाढवला जाऊ शकतो.

**लोकसभा – राज्यनिहाय प्रतिनिधित्व :**

**तक्ता क्र.१.३**

| **अ.क्र.** | **राज्य** | **प्रतिनिधी** |
|---|---|---|
| १. | उत्तर प्रदेश | ८० |
| २. | महाराष्ट्र | ४८ |
| ३. | आंध्र | २५ |
| ४. | पश्चिम बंगाल | ४२ |
| ५. | तेलंगणा | १७ |
| ६. | बिहार | ४० |
| ७. | तामिळनाडू | ३९ |
| ८. | मध्यप्रदेश | २९ |
| ९. | गुजरात | २६ |
| १०. | राजस्थान | २५ |
| ११. | ओडिशा | २१ |
| १२. | कर्नाटक | २८ |
| १३. | पंजाब | १३ |
| १४. | केरळ | २० |
| १५. | छत्तीसगड | ११ |
| १६. | झारखंड | १४ |
| १७. | आसाम | १४ |

| | | |
|---|---|---|
| १८. | दिल्ली | ७ |
| १९. | उत्तरांचल | ५ |
| २०. | जम्मू काश्मिर | ६ |
| २१. | मणिपूर | २ |
| २२. | मेघालय | २ |
| २३. | त्रिपुरा | २ |
| २४. | अरुणाचल प्रदेश | २ |
| २५. | गोवा | २ |
| २६. | पाँडेचरी | १ |

**लोकसभा – राज्यनिहाय प्रतिनिधित्व :** [२२]

**लोकसभेतील महिलांचे प्रतिनिधित्व –**

१९५२ – २४

संसदेतील महिला लोकप्रतिनिधी चा विविध देशांमधील घेतलेल्या आढावानुसार भारतातील महिला लोकप्रतिनिधीबाबतची वस्तस्थिती ही अधोरेखित होते. महिला लोकप्रतिनिधीचे प्रमाण जगभर वाढते असले तरी प्रगत देशातील हे प्रमाण अपेक्षेपेक्षा खूपच कमी आहे. त्यामानाने अप्रगत देशात हे प्रमाण नजरेत भरणारे दिसते.

जगातील सर्वाधिक महिला प्रतिनिधी रवांडा या अत्यंत छोट्या देशात आहेत. या देशातील महिला प्रतिनिधीचे प्रमाण ५० टक्याहूनही जास्त म्हणजे ६१% आहे.

**जागतिक महिला प्रतिनिधीत्व टक्केवारी –**

**तक्ता क्र.१.४**

| | | |
|---|---|---|
| १. | रवांडा | ६१% |
| २. | बोलर्व्हिया | ५३% |
| ३. | क्युबा | ४९% |
| ४. | फ्रान्स | ३९% |

| | | |
|---|---|---|
| ५. | जर्मनी | ३७% |
| ६. | ब्रिटन | ३२% |
| ७. | चीन | २४% |
| ८. | अमेरिका | १९% |

सर्वात मोठी लोकशाही व महिला आरक्षण, महिला सबलीकरणाची चर्चा मोठ्या प्रमाणात होणाऱ्या भारतात मात्र महिला लोकप्रतिनिधींची संसदेतील संख्या अवधी १२% आहे. ही आकडेवारी पाहिली की महिला प्रतिनिधीत्वाबद्दल भारतात 'बोलाचीच कढी नी बोलाचाच भात' असा प्रकार आहे असे दिसते. भारतात होणाऱ्या निवडणुका, त्यातील महिला उमेदवारांची तसेच विजयी महिला उमेदवारांची आकडेवारी पाहिली तर महिला प्रतिनिधीत्वाबद्दलची उदासिनता स्पष्ट दिसते.

भारतातील संसद, विधीमंडळ यामध्ये महिलांना अधिकाधिक प्रतिनिधित्व देण्याची भाषा केली जाते. संसदेत महिलांना ५०% आरक्षण देण्याची चर्चाही होते. परंतु महिला आरक्षणाचे विधेयक गेले १० वर्षे संसदेत लटकले आहे. महिला लोकप्रतिनिधीची संख्याही प्रत्यक्षात डोळ्यात भरावी अशी मुळीच नाही.

**भारतीय लोकसभेतील महिला खासदार**

**तक्ता क्र.१.५**

| | | |
|---|---|---|
| पहिली | १९५२ | २० |
| दुसरी | १९५७ | २२ |
| तिसरी | १९६२ | ३१ |
| चौथी | १९६७ | २० |
| पाचवी | १९७१ | २१ |
| सहावी | १९७७ | १९ |
| सातवी | १९८० | २८ |
| आठवी | १९८४ | ४२ |
| नववी | १९८९ | २९ |

| | | |
|---|---|---|
| दहावी | १९९१ | ३७ |
| अकरावी | १९९६ | ३७ |
| बारावी | १९९८ | ४३ |
| तेरावी | १९९९ | ४९ |
| चौदावी | २००४ | ४५ |
| पंधरावी | २००९ | ५८ |
| सोळावी | २०१४ | ६३ |

भारतात लोकसभेतील महिला प्रतिनिधींच्या संख्येत प्रगती होत आहे, हे जरी खरे असले तरी हा वेग अगदीच अल्प आहे, असे म्हणावयास हवे. सन, १९५२ च्या पहिल्या निवडणुकीत लोकसभेत २० महिला खासदास होत्या आताच्या सोळाव्या लोकसभेतही संख्या ६३ वर पोहोचली आहे. म्हणजेच ६६ वर्षात तिप्पटच वाढ झाली. महिला खासदाराच्या विजयाची गती कमी असली तरी महिला उमेदवाराची संख्या चांगली वाढलेली दिसते. पहिल्या निवडणूकीत ४५ महिलांनी मतदारांना कौल लावला होता. तर सोळाव्या लोकसभेसाठी महिला उमेदवाराची संख्या ६३१ वर पोहोचली. विशेष म्हणजे त्यातील एक तृतीयांश महिला या अपक्ष म्हणून उभ्या ठाकल्या होत्या. विद्यमान लोकसभेत असलेली महिला खासदारांची ६३ ही संख्या आजवरची सर्वात जास्त संख्या आहे. पण ती ५०% नव्हे तर १२–१३ टक्केच आहे. हे लक्षात घ्यायला हवे. त्यात सत्ताधारी भाजपच्या ३१ महिला खासदार आहेत. मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रावर मतदाराच्या ज्या रांगा लागतात त्या महिला मतदारांचे प्रमाण जास्त दिसते. पण प्रत्यक्षात अंतिम विजयात दिसणारे महिलांचे प्रमाणा अधिक दिसत नाही. असे एक निरिक्षण आहे. सन २००९ मध्ये झालेल्या १५ व्या लोकसभा निवडणुकीत ५८ महिला खासदार जरुर विजयी झाल्या, पण याच १५ व्या लोकसभेत सभापती (मीरा कुमार) सत्ताधारी युपीए आघाडीच्या अध्यक्षा (सोनिया गांधी) आणि विरोधी पक्षनेत्या (सुषमा स्वराज) ही तिन्ही महत्त्वाची पदे महिलांनी भूषविली हे विशेष. महिलांना जास्त प्रतिनिधित्व दिले की भ्रष्टाचाराला आळा बसेल असे एक प्रतिपादन केले जात होते पण तसे काही झालेले दिसत नाही. भ्रष्टाचाराला काही उतार पडलेला दिसत नाही. स्थानिक पातळीवरील निवणुकांत बऱ्याचदा आरक्षण मिळाल्याने पुरुष नेत्यांनी आपल्याच घरातील महिलांना पुढे करुन पडद्यामागून सुत्रे सांभाळल्याची उदाहरणे आहेत. त्यामुळे बऱ्याच ठिकाणी महिलांना प्रतिनिधित्व देण्याचा मूळ हेतूच सङ्क ल झाला नाही. मुलायमसिंह यादव, लालू प्रसाद यादव यांच्यासारखे मोजके प्रादेशिक पक्षाचे नेते सोडले तर

संसदेतील ५०% महिला आरक्षणाला विरोध करीत नाहीत परंतु सन २००८ पासून संसदेत रखडलेले संबंधित विधेयक मंजूरही करण्याची इच्छाशक्ती दाखवत नाहीत.

भारतीय लोकशाहीचे मंदिर असलेल्या संसदेत गेल्या ६६ वर्षात ८१८ महिला खासदा निवडून आल्या आहेत. यामध्ये लोकसभेच्या ६३२ तर राज्यसभेच्या १८६ महिला खासदारांचा समावेश आहे. राज्यसभेत गेल्या ६६ वर्षात २१ महिला खासदारांना राष्ट्रपतींनी नामनिर्देशित केले आहे.

सन १९५२ पासून आजतागायत देशात १० हजार ९७० खासदार निवडलेले आहेत. यामध्ये लोकसभेत निवडून गेलेल्या खासदारांची संख्या ही ८८५५ इतकी आहे तर २११५ खासदा राज्यसभेवर निवडून गेले आहेत.

**सर्वाधिक महिला खासदार :**

१) उत्तर प्रदेश – १२१

२) पश्चिम बंगाल – ६५

३) मध्य प्रदेश – १२१

४) बिहार – ५९

५) महाराष्ट्र – १२१

६) आंध्र प्रदेश – ४५

७) राजस्थान – ३०

८) गुजरात – २७

९) पंजाब – २४

१०) तामिळनाडू – २३

११) ओडिशा – १६

१२) कर्नाटक – १५

१३) आसाम – १५

**१४)** दिल्ली – १३

**एकविसाव्या शतकांतील महिलांचा राजकीय सहभाग :**

विसाव्या शतकाच्या शेवटी स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये अनेक स्थित्यंतरे घडून आली. ७३ व ७४ वी घटनादुरुस्ती घडून आल्या. स्थानिक संस्थामध्ये महिलासाठी राखीव जागा निर्माण झाल्यामुळे महिलांचा राजकीय सहभाग वाढला व सत्तादेखील मिळाली. देशपातळीवर मात्र महिलांचा राजकीय सहभाग हा परिघावरच राहिला. १९९१ ते २०१४ पर्यंत केवळ ३३५ महिला निवडून आल्या होत्या. त्यापैकी २००४ मध्ये ४५, २००९ मध्ये ५९ तर २०१४ मध्ये ६२ महिला निवडून आल्या होत्या.

## १.८ नेतृत्वाचे संकल्पनात्मक विश्लेषण :

नेतृत्व म्हणजे विशिष्ट ध्येय प्राप्त करण्याच्या प्रयत्नांचे संघटन व दिग्दर्शन करण्याच्या हेतुने प्रेरित झालेले वर्तन होय.

हे वर्तन, उद्दिष्ट राजकीय असेल तर ते नेतृत्व राजकीय नेतृत्व ठरते. हे वर्तन परिस्थितीसापेक्ष असते. नेतृत्वाचे स्वरुप नेता अनुयायी उद्दिष्ट व ते गाठण्याचे मार्ग यावर अवलंबुन असते. नेत्याच्या क्षमतेवर व अधिमान्यतेवर अनुयायी नेतृत्व स्विकारतील की नाही हे अवलंबुन असते. नेत्याची अधिमान्यता तो अधिकार पदावर आहे की नाही यावर किंवा यावर किंवा त्याच्या व्यक्तिगत गुणांवर व वैशिष्टयांवरदेखील अवलंबून असते. नेत्याची सामाजिक पार्श्वभूमी (त्याचा वर्ग, जात, लिंग, शिक्षण इ) समाजाची राजकी संस्कृती, विशिष्ट कालावधीमध्ये राजकीय परिस्थिती राजकीय व्यवस्थेचा प्रकार आणि राजकीय विकासाची पातळी इत्यादी घटकांमुळे नेतृत्वाचा प्रकार यशापयश व वैशिष्टये ठरतात. [२३]

काहीजण नेतृत्वाला एक वलय किंवा किमया समजतात तर काहीजण त्या व्यक्तीला अधिकारामुळे मिळणारे महत्त्व मानतात. नेतृत्व सिध्दात आणि या विषयावर संशोधन करणाऱ्या राल्फ एम स्टॉग डील यांच्या मते, जगभरात जितक्या व्यक्तींनी आजपर्यंत आपल्या नेतृत्वाची चमक दाखवली आहे, तितक्या नेतृत्वाच्या व्याख्या असू षकतात. थोडक्यात नेतृत्व म्हणजे ठराविक वेळेत एखादे काम इतरांकडून कौशल्य करुन घोणे. नेत्याकडे अधिकार आणि सत्ता याचे एक अजब मिश्रण असते त्यामुळे लोक प्रभावित होतात आणि त्यांनी दिलेल्या सूचनाचं पालन करतात.

**नेतृत्वाची व्याख्या –**

१) जॉन मॅक्सवेल – यांनी आपल्या '२१ Irregutable Laws of leadership' मध्ये व्याख्या दिली आहे.

"Leadership is influence – nothing more nothing less'
नेतृत्व म्हणजे एक प्रभाव आहे – नाही जास्त, नाही कमी.

२) पीटर ड्रकर – यांनी आपल्या "The leader of the future' मध्ये व्याख्या दिली आहे.

"The only definition of a leader is someone who has followers'
'एका नेतृत्वाची व्याख्या अषी आहे की ज्याचे कोणी अनुयायी आहेत'

३) वॉरेन बोन्निस– 'Leadership is a function of knowing yourself having a vision that is well & communicated, building trust among colleagues and taking effective action to realize your own leadership potential'

'नेतृत्व म्हणजे स्वतःला ओळखण्याचे एक कार्य आहे, एक स्वप्न जे तुम्हांला सत्य करायचे आहे. सहकाऱ्यामध्ये विश्वास निर्माण करणे आणि प्रभावी कार्य करण्यासाठी स्वतःच्या नेतृत्वाची जाणीव होणे.'[२४]

नेतृत्व ही संकल्पना जरी आपल्या नित्य परिचयाची असली तरी वास्तवात तिचे विश्लेषण करणे कठीण जाते. नेतृत्वाचे विशेष म्हणजे नेत्याची प्रेरणा, प्रोत्साहन देण्याची क्षमता असणे होय, तसेच सिध्दांतानुसार मानवी कार्यशक्ती ही प्रोत्साहन, प्रेरणेवरच कार्यरत असते.

स्माजाचे नेतृत्व करणे हे नेत्यांचे आणि नेत्यांकडुन मार्गदर्शनाची अपेक्षा करणे हे अनुयायांचे कार्य आहे. प्रभाव पाडणारी व्यक्ती म्हणजेच नेता किंवा पुढारी होय आणि प्रभावित झालेले लोक म्हणजेच अनुयायी होत. परिस्थितीनुसार नेता व अनुयायी यांच्या बदल होत असतो. पारंपारिक नेतृत्व प्रामुख्याने जात वर्ग किंवा विशिष्ट समूह यांच्या सदस्यत्वामुळे निर्माण झाले होते. परंतु आधुनिक काळात लोकशाही आणि जनतेचे सार्वभौमत्व या संकल्पनेचा स्विकार आणि प्रसार झाला आणि त्या विचारसरणीतून नेतृत्व उदयास आलेले दिसते.

लोकशाही राजकीय व्यवस्थेत निवडणुकांना फार महत्व असते. निवडणुकांमुळे राजकीय नेतृत्वांमध्ये बदल होत असताना दिसतो. त्यामुळे कधी कधी तळाशी असलेले नेतृत्व शिखरांपर्यंत पोहचते तर कधी शिखरावर असणारे नेतृत्व भूईसपाट होते.

कोणत्याही व्यक्तीला आपल्या इच्छेनुसार राजकीय सत्ता स्थापन करता येत नाही. त्याचप्रमाणे कोणतेही राजकीय पद हे व्यक्तीला त्याच्या जन्मानुसार ही प्राप्त होत नसते. राष्ट्रातील लोकांची इच्छा व आकांक्षा पूर्ण करणारे नेतृत्व हे अधिमान्य राजकीय नेतृत्व समजण्यात येते. निवडणुका व नेमणुका या आधारावरील राजकीय नेतृत्व अधिमान्य नेतृत्व असते. त्यालाच लोकांचा पुढारी आणि राष्ट्रीय नेता असे मानण्यात येत. निर्णय घेण्याची क्षमता, निर्णयाची अंमलबजावणी करण्याची सक्ती आणि कृती यावर नेत्याची अधिमान्यता अवलंबून असते.

नेतृत्व ही समूहाचे उद्दिष्ट प्राप्त करण्याकरिता अनुयायी म्हणविल्या जाणाऱ्या लोकांना एकात्मेने वागण्यास उत्तेजन देणारी एक वागण्याची पध्दती आहे. नेतृत्वावर व्यक्तीचे गुणदोष, तिचे स्थान व त्यानुरुप घेतलेली भूमिका यांचा परिणाम होत असला तरी ते सामान्यतः परिस्थितीनिर्मिती असते. नेतृत्वाच्या परंपरागत विचारात शूरत्व किंवा मर्दुमकी हे व यासारखे सार्वत्रिक गुणविशेष महत्त्वाचे ठरतात, पण नेतृत्वाचा विचार करताना परिस्थितीचाही विचार महत्त्वाचा असतो. सुप्त कृतक तसेच वास्तविक अशा नेतृत्वातील तंत्र व भूमिका यांतील भेद, नेतृत्वाची प्रक्षेपित प्रतिमा व अनुयायांचे स्वभाव आणि प्रतिसाद यांचाही अभ्यास आवश्यक ठरतो.

समान हितसंबंध किंवा ध्येय असणाऱ्या समूहाचे व व्यक्तीचे परस्परसंबंध नेतृत्वाद्वारे दिग्दर्शित होतात, असे काही लोक मानतात. नेतृत्वाच्या समाजशास्त्रीय व्याख्येतून सामान्यतः आनुवंशिक हक्क, रुढी व साहित्य कलादी क्षेत्रांतील यश यांच्या आधारे अग्रेसर स्थान मिळविणाऱ्या लोकांना वगळण्यात येते. मॅकिआव्हेली, कार्लाइल यांसारख्या विद्वानांनी एकोणिसाव्या शतकात लिहिलेल्या नेतृत्वावरील प्रबंधात नेतृत्वाच्या कल्पित क्षमतेवर व गुणविशेषांवर भर दिलेला आढळतो. पारंपरिक दृष्टिकोनाचा प्रभाव सैनिकी क्षेत्रात अजूनही टिकून असल्याचे दिसते. तथापित आधुनिक मानसशास्त्रीय व समाजशास्त्रीय अभ्यासात नेतृत्वातील व्यक्तींच्या परिस्थितीच्या परस्परसंबंधावर भर देण्यात येतो. नेतृत्वाच्या अभ्यासात चार गोष्टींचा विचार सामन्यपणे करण्यात येतो : (१) नेता त्याची योग्यता, व्यक्तिमत्त्व व अधिकार, (२) अनुयायी त्यांची योग्यता व अधिकार, (३) परिस्थिती जिच्या संदर्भात नेता व अनुयायीसंबंधी निर्माण होतात आणि (४) गटाचे उद्दिष्ट किंवा कार्य

सामूहिक उद्दिष्ट व सामूहिक जीवनाच्या दृष्टीने नेतृत्वाची भूमिका महत्त्वाची आहे. समूहात एकजूट राखणे, तो सुस्थिर ठेवणे, समूहाच्या प्रयोजनास पोषक अशी कार्यविभागणी करणे,

सर्व व्यक्तींमध्ये सुसंवाद साधरणे व सर्वांचे समाधान करणे यांची जबाबदारी नेतृत्वावर असते. समूहावर बिकट प्रसंग आला असता त्यातून निभावून जाण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना आखणे, व्यक्तींना मार्गदर्शन करणे, त्यांच्या शक्ती कार्यान्वित करणे, व्यक्तींच्या आकांक्षांचा समूहाच्या मूलभूत प्रयोजनांशी मेळ घालून समूहाच्या रचनाबंधामध्ये समयोजनात्मक परिवर्तन घडवू आणण्यास हातभार लावणे इत्यांदीसाठीही नेतृत्वाची आवश्यकता असते. हीच गोष्ट व्यापक समाजानाही लागू आहे. रुढी व परंपरा यामुळे काही समाजाची रचना सुबध्द व सुस्थिर असते. अषा समाजांमध्ये व्यवसाय, धार्मिक श्रध्दा व समजुती तसेच आचार, नैतिक मूल्ये, भाषा इ. बाबतीत पोटसमाजद (सब– सोसायटीज) असतात. त्यांचे संबंध सलोख्याचे, परस्परांनी हितकारक व एकंदर समाजाच्या एकात्मतेस पोषक राहतील, हे पाहण्याचे कार्य समाजात मान्यता पावलेला वर्ग किंवा त्या वर्गाचे प्रतिनिधी करीत असतात. ज्या वेळी पुर्वापार रचना असमाधानकारक ठरु पाहते, त्या वेळी तर लोकांच्या अभिवृत्तीत व वर्तनात बदलत्या परिस्थितीस अनुरुप असे परिवर्तन घडवून समाज अभंग राखण्यासाठी नेतृत्वाची आवश्यकता असते.

नेता या पदाची व्याख्या अनेक प्रकारे करण्यात येते. 'नेता म्हणजे जिचा इतरांवर प्रभाव पडतो ती व्यक्ती'. अशी एक व्याख्या करण्यात आली आहे. परंतु नेता व अनुयायी यांच्यामध्ये एकतर्फी अन्योन्यक्रिया चालत नसून अनुयायांचाही प्रभाव नेत्यावर पडत असतो. हे लक्षात घेता, वरील व्याख्या असमाधानकारक ठरते, 'समूहातील लोकप्रिय व्यक्ती म्हणजे त्या समूहाचा नेता' ही व्याख्यादेखील समर्पक म्हणता येत नाही. कारण केवळ लोकप्रियता हे नेतृत्वाचे व्यवच्देदक लक्षण पुरेसे नाही. लोकप्रिय असलेली व्यक्ती लोकमान्य असतेच असे नाही. 'समूहावर जिचे वर्चस्व असते ती व्यक्ती म्हणजे नेता', ही व्याख्याही समर्पक म्हणता येत नाही. कारण एखादया व्यक्तीचे समूहावरील वर्चस्व त्याच्या लादलेले असू षकते किंवा समूहातील व्यक्तींच्या भीतीवर व लाचारीवर अधिष्ठित असू शकते. नेत्याचे वर्चस्व हे लोकांनी स्वच्छेने स्वीकारलेले असते व त्याचे आदेश स्वीकार्य मानले जात असतात.

नेतृत्वाची व्याख्या अशा रीतीने केली पाहिजे की, तिच्या आधारे विशिष्ट समूहाचा (समाजाचा) खराखुरा नेता कोण आहे, ते निश्चित करता येईल. अशा प्रकारची व्याख्या करावयाची झाल्यास प्रत्येक समूहाच्या मुळाशी काही एक प्रयोजन व प्रयोजने असतात; त्यांवर समूहाचा रचनाबंध अवलंबून असतो आणि त्या प्रयोजनांच्या पूर्तीसाठी समूहाचे विविधांगी कार्य चालू असते, या गोष्टींवर

भर दिला पाहिजे. समूहाकडे पाहण्याचा हा गतिप्रक्रियात्मक दृष्टिकोन स्वीकारुन आर.बी.कॅटेल याने नेत्याची जी व्याख्या सुचवली आहे, ती कोणत्याही समूहाच्या तसेच सामाजिक जीवनाच्या कोणत्याही क्षेत्रातील नेत्याला लागू पडेंल, अशी आहे. ती व्याख्या अशी : 'एकूण समूहाच्या कार्यावर ज्या व्यक्तीचा निर्विवाद प्रभाव असतो, जी समूहामध्ये परिवर्तन घडवून आणू शकते, जिच्यामुळे समूहाचे मनोबल व एकंदर समूहशक्ती टिकून राहते आणि जी समूहाच्या अभिवृत्तीमध्ये (व परिणामी वर्तनात) बदल घडवून आणू शकते, ती व्यक्ती म्हणजे त्या समूहाचा नेता होय' . या व्याख्येशी पुढील व्याख्याही जुळती आहेः 'नेता म्हणजे समूहास त्याच्या उद्‌दिष्टांप्रत व उत्कर्षाप्रत नेणारी, त्यासाठी मार्गदर्शन करणारी, मार्गातील अडचणींचे निराकरण करु शकणारी व समूहाकडून योग्य ते कार्य करुन घेऊ शकणारी श्रेष्ठ दर्जाची व्यक्ती'.

**नेतृत्वाचे प्रकारः**

सुप्रसिध्द जर्मन समाजशास्त्रज्ञ माक्स वेबर याने नेतृत्वाचे तीन प्रकार वर्णन केले आहे : (१) पारंपरिक रीत्या चालत आलेले, (२)विभूतिरुप वा दैवी गुणमूलक आणि (३) कायदयावर अधिष्ठित असलेले. अखंड व अबाधित अशी परंपरा असलेल्या समाजात वय, लिंग, वर्ग किंवा जात, व्यवसाय, सामाजिक वा राजकी स्थान इत्यांदींनुसार काही व्यक्तींकडे नेतृत्व सोपविले जात असते. अशा व्यक्तींच्या ठिकाणी नेतृत्वास आवश्यक असलेले गुण मूलतः नसले, तरी नेतृत्व करता करता काही गुण ते संपादन करु शकतात. हया परंपरासिध्द नेतृत्वास लोक मान तुकवतात खरे ; परंतु हे नेतृत्व पूर्णपणे सक्षम असतेच असे नाही. बदलत्या परिस्थितीत तर त्याची अकार्यक्षमता विशेषच उघड होते. जेव्हा समाजजीवन अस्थिर होत असते किंवा अत्यंत कठिण प्रसंग निर्माण झालेले असतात, अशा वेळी जे नेतृत्व उदयास येते, ते समाजाची स्थिती सावरीत असते. अषा नेतृत्वाच्या ठिकाणी सामन्यजनांना अलौकिकत्व व दिव्यत्वाचे दर्शन होते व त्यांची गणना ईश्वरी अवतार किंवा प्रेषित म्हणून होऊ लागते. या प्रकारच्या नेतृत्वास वेबरने 'दैविक नेतृत्व' ही संज्ञा दिली. हे नेतृत्व चिरकाल नसते व सातत्याने टिकणारे नसते. याउलट लोकांनी सुबुध्दपणे स्वीकारलेले व व्यक्तींच्या गुणांवर तसेच कायदयावर आधारलेले नेतृत्व समाजास सातत्याने उपलब्ध होऊ शकते.

मार्टिन कॉनवे याने नेतृत्वाचे वर्गीकरण पुढील प्रकारे केले आहे. (१) लोकांच्या आकांक्षा समजून घेऊन त्यांना वाचा फोडणारे नेतृत्व, (२) समूहाचे प्रतिनिधी म्हणून कार्य करणारे नेतृत्व, (३)समूहाच्या इच्छांबरोबरच समुहाच्या हिताचा विचार करणो आणि त्या दृष्टीने कार्यक्रम आखणारे

समूह संघटक नेतृत्व व (४) नवीन विचार प्रसृत करुन त्यास अनुसरणारा समूह निर्माण करणारे नेतृत्व.

नेत्यांच्या संभाव्य उदि्ष्टांना अनुलक्षून (१) आहे तीच समाजव्यवस्था टिकवून धरु पाहणारे व (२)समाजव्यवस्थेत बदल घडवून आणू पाहणारे, असेही नेतृत्वाचे वर्गीकरण काहींनी केले आहे.

काही मानसशास्त्रज्ञांनी अनेक दृष्टिकोन एकत्र करुन नेतृत्वाचे पुढील प्रकार सुचविले आहेत. (१) परंपरा निर्धारित नेतृत्व, (२) दैवी गुणांनी वा विभूतिमत्वाने युक्त वाटणारे नेतृत्व, (३) समूहाचे केवळ एक प्रतीक म्हणून अत्युच्च स्थान भूषविणारे परंतु साक्षात सत्ता नसलेले नेतृत्व, (४) विशिष्ट क्षेत्रातील तज्ञ, (५) स्वतःच्या बुध्दीने व विचारांनी समाजास प्रभावित करणारे व (६) समूहाच्या कार्याचे नियमन करणारे प्रशासक नेतृत्व.

सक्रिय समाजसुधारणा करणाऱ्या रीतीस किंवा शैलीस अनुलक्षून नेतृत्वाचे मुख्यत्वे दोन प्रकार करता येतात. (१) हुकूमशाही नेतृत्व व (२) लोकशाही नेतृत्व. हुकूमशाही नेतृत्वाचा विशेष म्हणजे नेत्याकडे सर्वकष सत्ता असते व ती स्वतःकडेच ठेवण्याचा व स्वतःचे सर्वश्रेष्ठ स्थान ठिकवण्याचा प्रयत्न तो हरतऱ्हेने करीत असतो. हुकूमशाहाच धोरणे ठरवितो, योजना आखतो, समूहासाठी आणि ठरविलेला संपूर्ण कार्यक्रम तो सर्वस्वी उघड करीत नाही व स्वतःच्या बेतांची कल्पना इतरांना देत नाही. त्यांच्याकडून व्यक्तिपूजेस प्रच्छन्नपणे व उघडपणे प्रोत्साहन मिळते. समूहातील महत्त्वाच्या व्यक्तींषी तो स्वतंत्रपणे संबंध ठेवतो आणि त्यांचे एकमेकांशी असलेले संबंध स्वतःच्या स्थानास धोकादायक ठरणार नाहीत, याविषयी तो दक्ष असतो. स्वतःचे महत्त्व अबाधित राहावे म्हणून तो अन्य कुणालाही फार काळपर्यंत महत्त्व लाभू देत नाही. अनुयायांमध्ये मोकळेपणाने मिसळत नाही. धर्म, पक्ष, पथ, राष्ट्र इ. विषयींच्या लोकांच्या भावनांना आवाहन करुन स्वतःचे नेतृत्व टिकवण्याचे प्रयत्नही त्याच्याकडून होतात.

लोकशाही नेतृत्वाची शैली निराळ्या प्रकारची अते. नेता स्वतःच्या हाती सर्व सत्ता केंद्रीत करुन न ठेवता सत्तेचे वितरण करतो. अधिकाधिक लोकाभिमुख होऊन तो स्वतःचे नेतृत्व टिकवितो. लोकांचे प्रेम व आदर हे लोकशाही नेत्याच्या प्रतिष्ठेचे अधिकष्ठान असते. लोकशाही वृत्तीचा नेता समूहाशी वा त्यातील महत्वाच्या व्यक्तींशी विचारविमय करुन व समूहाच्या इच्छा– आकांक्षाचा आदर करुन उदि्दष्टे, धोरणे व कार्यक्रम ठरवतो तसेच एकंदर कार्यक्रमाची स्पष्ट व पूर्ण कल्पना

लोकांना देतो. धाकदपटशा व भीती या तंत्रास लोकशाही नेतृत्वात स्थान नसते. व्यक्तिमाहात्म्यासही प्रोत्साहन दिले जात नाही. समूहातील विविध घटकांत सहकार्याची भावना वाढीव लावली जाते व प्रत्येकाच्या कर्तत्वास अवसर दिला जातो. समूहातील व्यक्तींना स्वतःचे विचार व भावना व्यक्ती करण्यास मुभा असते.

**नेतृत्वाचे कार्यः**

समूहाचे प्रयोजन व स्वरुप, समूहातील लोकांचे व्यक्तिमत्व आणि त्या त्या वेळचा प्रसंग या तीन गोष्टींवर नेतृत्वाला कराव्या लागणाऱ्या विशिष्ट भूमिका अवलंबून असतात, तरीपण सर्वसाधारण परिस्थितीत नेतृत्वाला जे कार्य करावे लागते, त्याचे स्वरुप पुढीलप्रमाणे असते : (१) संयोजन : समूहाच्या तात्कालिक गरजा व उपलब्ध साधने, दूरवरची उद्दिष्टे व त्यांची साधने, या सर्वांचा विचार करुन योजना आखणे, (२) धोरणे ठरविणे, (३) धोरणांची अंमलबजावणी व त्यासाठी कार्यविभागणी करणे, (४) तज्ञ या नात्याने साहाय्य करणे, (५) समूहाचे प्रतिनिधत्व करणे, (६) समूहातील व्यक्तिव्यक्तींतील किंवा समूहांतर्गत गटागटांतील संबंधावर व त्यांच्या वर्तनावर आवष्यक त्या उपायांचा अवलंब करुन नियंत्रण ठेवणे, (७) स्वतःचे वर्तन नमुनेदार ठेवून समूहापुढे आदर्श ठेवणे व (८) समूहाचा रक्षणकर्ता म्हणून एक प्रकारे पित्याची भूमिका सांभाळणे. कधी कधी लोकांच्या वैफल्याचे आणि असंतोषाचे खापर नेतृत्वाच्या माथी फोडले जाते व त्यासाठी नेत्यास बळी दिले जाते. अशा वेळी मानसिक समतोल राखून समूहाचे फाटाफुटीपासून संरक्षण करण्याचे काम नेतृत्वाला करावे लागते.

**नेतृत्व व व्यक्तिमत्वगुण :**

लष्करातील तसेच कारखान्यांमधील अधिकाऱ्यांची निवड करता यावी म्हणून आधुनिक मानसशास्त्रज्ञांनी नेतृत्वगुणांचा विचार केला आहे. नेतृत्वासाठी अनिवार्य असे काही गुण निश्चित करता येतील काय, हा प्रश्न पुढे ठेवून मानसशास्त्रज्ञांनी राजकीय, लष्करी तसेच औद्योगिक क्षेत्रातील यशस्वी नेते, मुलांच्या गटांतील नेते, विद्यार्थी नेते इत्यांदिकांच्या व्यक्तिमत्त्व गुणांची नोंद केली आहे. त्यातून जे गुण एका क्षेत्रातील नेत्यांच्या ठिकाणी असतात, ते अन्य क्षेत्रातील नेत्यांच्या ठिकाणी असतातच असे नाही, असे आढळून आले आहे. उदा. उंची, मजबूर शरीरयष्टी, देखणेपण, वर्चस्ववृत्ती इ. यशस्वी लष्करी नेत्यांमध्ये आढळणारे गुण प्रभावी राजकीय व

सामाजिक पुढाऱ्यांच्या व्यक्तिमत्त्वात असतातच असे नाही. उंची, वनज, सुदृढ शारीर, बुध्दिमत्ता हया गुणांचे महत्त्व प्रसंगासापेक्ष असते, असेच म्हटले पाहिजे.

तथापि नेतृत्वाच्या ठिकाणी बहुतांशी पुढील गुणधर्म असतात, असे संशोधनावरुन दिसून आले आहे. सर्वसामान्यपेक्षा अधिक बुध्दिमत्ता, मर्मग्राही दृष्टी, उपक्रमशीलता, बहिर्मुखवृत्ती, दृढनिश्चय, आत्मविश्वास, समायोजन–कुशलता, विश्वासपात्रता, सहाभागी होण्याची क्षेमता, जोमदार प्रतिक्रियाक्षमता, चिवटपणा व चिकाटी, इतरांच्या भावनांची कदर करण्याची वृत्ती, संघटनाकौशल्य, योजकता, स्वतःजवळ अमाप शक्ती व युक्ती आहे असे भासवणारा संयम, वक्तृत्व, विनोदबुध्दी इत्यादी.

परंतु वरील गुण असले, की मनुष्य नेता होतोच असे नाही आणि त्यांपैकी काही गुण नसतील तर नेता होऊ शकत नाही असेही नाही. नेतृत्वाच्या संबंधात नेर्तत्व गुणांबरोबरच प्रसंगाचे स्वरुपही महत्त्वाचे असते. नेता ही अद्‌वितीय विभूती असते व केवळ स्वतःच्या गुणांमुळे नेतृत्व प्राप्त करुन घेऊन कोणत्याही प्रसंगी नेतृत्व करण्यास समर्थ असते, ही विभूतिवादी कल्पना काय किंवा केवळ गुणवादी सिध्दांत काय, हे दोन्हीही वास्तवास धरुन नाहीत. नेतृत्वासाठी आवश्यक असलेले गुण असूनही काल व परिस्थिती अनुकूल नसल्यामुळे किंवा त्या त्या प्रसंगी विशेषत्वाने आवश्यक असणारे गुण अंगी नसल्याने नेतृत्वपदास पोहोचल्या नाहीत, अशा कितीतरी व्यक्ती इतिहासात आढळतील. नेतृत्व हे प्रसंगसापेक्ष असते, ही गोष्ट संशोधनातून स्पष्ट झाली आहे. एखाद्‌या समस्येच्या चर्चेत नेतृत्व करु शकणारी व्यक्ती निर्णयाच्या प्रत्यक्ष कार्यवाहीत नेतृत्व करु शकेलच असे नाही. युध्द प्रसंगी जो नेतृत्व देऊ शकतो, तो शांतताकालातही यशस्वी नेता ठरेलच असे नाही.

काही प्रसंग उदा– परकीय आक्रमणाचा धोका, समूहांतर्गत अशांतता, मतभेद, बेकारी, सामाजिक अन्यायाची संतापयुक्त जाणीव इ. नेतृत्वाच्या उदयास विशेष अनुकूल ठरतात. यावरुनही नेतृत्व हे प्रसंगसापेक्ष असते व त्या त्या प्रसंगातून समूहास यशस्वीपणे बाहेर काढण्याची क्षमता अंगी असलेल्या व्यक्तींकडेच नेतृत्व जाते.

**यशस्वी नेतृत्वः**

यशस्वी नेतृत्वाबाबत जी अनेक संशोधने झाली आहेत, त्यांचे काही निष्कर्ष नियमरुपाने सांगता येणे शक्य आहे. (१) समूहाला असे वाटले पाहिजे, की नेता हा आपल्यापैकीच एक आहे,

बाहेरचा नाही, त्यासाठी नेत्याची मूल्य व अभिवृत्ती आणि समूहाची मूल्ये व अभिवृत्ती यांमध्ये फार तफावत नसावी. असल्यास नेतृत्वास ओहोटी लागते. म्हणूनच यशस्वी नेते समूहात मिसळतात व त्यांच्या जीवनात सहभागी होत असल्याचे दाखवीत असतात, (२) पण त्याबरोबरच अनुयायांना असेही वाटले पाहिजे की, आपल्याला इष्ट वाटणारे गुण नेतृत्व करणाऱ्याच्या ठिकाणी अधिक प्रमाणात आहेत. (३) आपल्यापैकीच एक, पण बुध्दी, ज्ञान, कर्तबगारी, इ. बाबतीत आपल्यापैकी उत्तम व्यक्ती, असे नेत्याविषयी अनुयायांना वाटले पाहिजे. त्याबरोबरच त्याचे गुण व चारित्र्य आपल्या अनुकरणाच्या आवाक्यातील आहे, असेही त्यांना वाटले पाहिजे; अन्यथा त्यांच्या अतिश्रेष्ठत्वामुळे त्याला देव्हाऱ्यात बसवून अनुयायी मोकळे होतात व नावापुरतेच अनुयायी राहतात. (४) नेतृत्वाने समूहाच्या गरजा व अपेक्षा लक्षात घेऊन वागले पाहिजे. नेत्याकडून, अपेक्षित असलेली कार्ये, कार्यपध्दती तसेच व्यक्तिमत्वगुण व चारित्र्यगुण यांच्या बाबतींत समूहाचा अपेक्षाभंग झाल्यास त्याचे नेतृत्व ओहोटीस लागते. 'मी त्यांचा नेता आहे ना, मग मला त्यांना अनुसरुन चालले पाहिजे' हे एका राजकीय नेत्याचे उद्गार या दृष्टीने मार्मिक होत.

**एकतंत्री व लोकतंत्री नेतृत्व ः**

काही निश्चित उद्दिष्टांकडे समूहास नेणे हे नेतृत्वाचे प्रयोजन असते, ही गोष्ट लक्षात घेता समूहाच्या कार्यक्षमतेस व प्रत्यक्ष कार्यसिध्दीस पोषक ठरेल, अशा रीतीने नेतृत्व करणाऱ्यास आपली भूमिका पार पाडावी लागते. परंतु समूहाची कार्यक्षमता व प्रत्यक्ष कार्यसिध्दीचे प्रमाण या गोष्टी समूहातील व्यक्तिव्यक्तीचे संबंध, गटबाजी, सामूहिक कार्याविषयीची आस्था, समूहाचे मनोबल इ. गोष्टींवर अवलंबून असतात. थोडक्यात, त्या समूहांतर्गत मानसिक वातावरणावर अवलंबून असतात आणि त्या वातावरणाची निर्मिती नेतृत्वाच्या अवलंबून असतात. थोडक्यात, त्या समूहांतर्गत मानसिक वातावरणावर अलंबून असतात आणि त्या वातावरणाची निर्मिती नेतृत्वाच्या स्वरुपावर अवलंबून असते. समूहाच्या कार्यसिध्दीच्या दृष्टीने हुकूमशाही की लोकशाही इष्ट आहे, हा प्रश्न महत्वाचा ठरतो. सामान्य निरीक्षणावर आधारलेल्या निष्कर्शाची ग्राहयग्राहयता ठरविण्यासाठी कुर्ट ल्यूइन, आर्. एफ्. मेअर व इतर सामाजिक मानसशास्त्रज्ञांनी छोटेछोटे समूह घेऊन आणि त्यांना या दोन प्रकारच्या नेतृत्वाखाली आळीपाळीने कामे करावयास लावून, म्हणजे प्रयोगपूर्वक, निरीक्षण केले आहे. संस्था, संघटना, कारखाने, लष्कर इ. विविध क्षेत्रांत नेतृत्व करणाऱ्यांना मार्गदर्शन आणि नेतृत्वाचे प्रशिक्षण या दृष्टींनीही हया प्रायोगिक निरीक्षणास महत्व आहे. या प्रयोगांवरुन असे दिसून येते की एकतंत्री नेतृत्वाखाली काम करणाऱ्या व्यक्तींच्या ठिकाणी उत्साह आणि स्वतः होऊन काम

करण्याचे प्रेरणाबळ फार कमी असते. नेत्याच्या धाकाने आणि भीतीने काम करण्यात येते. एकंदर कार्याच्या नियोजनात त्यांचा सहभाग नसल्याने त्यांना त्या कार्याविषयी आत्मीयता वाटत नाही. अशा व्यक्ती मनातून असंतुष्ट असतात. त्याबरोबरच नेत्याचे लक्ष वेधून घेण्याची व त्याचा अनुनय करण्याची प्रतृत्ती त्यांच्यात आढळते.

खरीखुरी सहकार्याची भावना व प्रसंगी नेत्यांच्या अनुपस्थितीतही आत्मविश्वासाने काम करण्याची हिंमत यांचा अभाव आढळतो. नेत्यांच्या अभावी समूहात फुटीर वृत्तीसही वाव मिळतो. याउलट लोकशाही नेतृत्वाखालील व्यक्ती सामूहिक कार्यक्रम निश्चित करण्यात सहभागी असल्याने स्वयंनिर्णयाच्या जाणिवेने आत्मीयतापूर्वक कार्य करतात. पण त्याबरोबरच त्यांच्यात शिस्तीचे प्रमाण कमी आढळते. नाना विचारांचा गलबला होण्याचा आणि परिणामी कार्याची गती मंदावण्याचा फार संभव असतो.

कुर्ट ल्यूइन व त्याच्या सहकाऱ्यांनी प्रायोगिक अन्वेशषान्ती मांडलेले निष्कर्षही सामान्य निरीक्षणास दुजोरा देणारे आहेत. गटापासून एकंदरीने अलग राहणाऱ्या, गटाशी विचारविनिमय करण्याऐवजी स्वतःच धोरण ठरवून पदोपदी आदेश देणाऱ्या व स्वतःची वैयक्तिक पसंती नापसंती व्यक्ती करणाऱ्या, हुकूमशाही नेतृत्वाखालील व्यक्तींच्या ठिकाणी नेत्याला नमूद वागण्याची वृत्ती, मार्गदर्शनासाठी त्याच्यावर सर्वस्वी अवलंबून राहण्याची वृत्ती, परस्परांबाबत तक्रारखोरी आणि आक्रमक वृत्ती तसेच वैरभावाचा (वुई–फीलिंग) व परिणामी खऱ्या एकजुटीचा अभाव इ. गोष्टी दिसून आल्या. याउलट मित्रत्वाची वृत्ती ठेवणाऱ्या, विचारविनिमय व सामुदायिक निर्णयास प्रोत्साहन देणाऱ्या, प्रत्येकाच्या कर्तृत्वास आणि गुणास वाव देणाऱ्या लोकशाही नेतृत्वाखालील गटामध्ये स्वावलंबन, सर्जनशीलता, सहकार्यवृत्ती, वयंभाव, एकजूट व मनोबल यांचे प्रमाणे वरेच आढळते. म्हणून लोकशाही नेतृत्व हेच इष्ट होय. असा निष्कर्ष या संषोधकांनी काढला आहे. [२५]

**राजकीय नेतृत्त्वाचे सिद्धांत :**

जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात नेतृत्त्व हा मूलभूत स्वरुपाचा महत्त्वपूर्ण घटक असून त्याचे सर्वदूर व्यापक संबंध दिसून येतात. प्रत्येक क्षेत्रात प्रभावी व्यक्तिमत्त्व व त्यांना मानणारी दुय्यम व्यक्तिमत्त्व ह्यांच्या परस्पर संबंधावर विविध संस्था विकसित होत असताना दिसतात. विविध सामाजिक शास्त्राच्या आणि विशेषत: मानसशास्त्रांच्या विकासाबरोबर नेतृत्त्व या विषयाच्या अंगोपांगावर भरपूर प्रकाश पडत असून, त्यामधुन राजकीय नेतृत्वाचा अध्ययनाचे विशाल दालन खुले झाले आहे.

समाजातील अन्य अभ्यासकांप्रमाणे अनेक राज्यशास्त्रांनी, पुढाऱ्याचे अथवा अनेक प्रभावीप व्यक्तीचे राजकारणातील महत्त्व मान्य केले आहे. पण आश्चर्य असे की, (राज्यशास्त्र ही सामाजिक विज्ञानाची एक शाखा आहे हे गृहित धरुन) गेली शेकडो वर्षे 'राजकीय नेतृत्वाच्या' संकल्पनेवर अगदी काटेकोरपणे तथा चिकित्सक पद्धतीने प्रकाश टाकला गेला नाही हे तथ्य "The Scientific Study of political leadership' या ग्रंथाचे लेखक ग्लेन डी. पेण 'Leadership' या ग्रंथाचे लेखक जेम्स मॅग ग्रोगर बर्न्स यांनी मांडले आहे. अर्थात या अभावाबद्दल असा तर्क सादर केला जाऊ शकतो की, 'राजकीय' आणि 'नेतृत्त्व' या दोन्ही संज्ञाची व्याप्ती आणि महत्त्व सर्वमान्य असल्यामुळे ते स्वयंसिद्धच आहेत. अशा राजकीय नेतृत्वाचा सौद्धांतिक दृष्टीकोनातून अभ्यास करणे महत्त्वाचे आहे. त्यांचा आढावा पुढीलप्रमाणे :–

**राजकीय नेतृत्त्वाचे सिद्धांत पाच विभागात विभागले आहेत.**

१) विशेषता सिद्धांत शैली

२) वर्तणूक आणि कौशल्य सिद्धांत

३) परिस्थितीजन्य आणि आकस्मिक सिद्धांत

४) कार्यात्मक सिद्धांत

५) कृतीशील आणि रुपांतरित सिद्धांत

### १) विशेषता सिद्धांत :

विशेषत: सिद्धांत हा समाजातील विविध प्रकारच्या आणि प्रभावशाली व्यक्तिमत्त्वाच्या वर्तनाचे वर्णन करण्याचा प्रयत्न करतात. हा कदाचित पहिल्याच शैक्षणिक सिद्धांत आहे. थॉमस कार्ली यास विशेषत: सिद्धांताचा अग्रदूत मानले जाते. ज्या लोकांनी आपली प्रतिभा, कौशल्य आणि अंगभूत विशेष गुणांचा वापर करुन अधिकार प्राप्त केला आह, अशा लोकांचे वर्णन या सिद्धांतात केले जाते. रोनाल्ड हेफेटेज (१९९४) याने एकोणिसाव्या शतकातील पारंपारिक दृष्टीकोन बाजुला जाऊन सामाजिक इतिहास प्रतिभावंत व्यक्तिमत्त्वाला जोडण्याचा प्रयत्न केला आहे.

विशेषत: सिद्धांतानुसार काही निश्चिंत विशिष्ट निर्देशांनुसार प्रभावशाली नेतृत्त्व कायम टिकवून ठेवता येऊ शकते. शेली किर्कपॅट्रिक आणि एडविन एक लोके (१९९१) यांनी विशेषत: सिद्धांताची काही उदाहरणे दिली आहेत. त्यांच्यानुसार प्रमुख नेत्यांमध्ये काही विशिष्ट गुण अंतर्भूत असतात. ज्यामध्ये प्रेरणा, महत्त्वाकांक्षा, सत्ता, तपश्चर्या, सचोटी, प्रामाणिकपणा, अखंडता, आत्मविश्वास, व्यावहारिक ज्ञान इत्यादींचा समावेश होतो. त्याच्यानुसार मात्र करिश्मा, सर्जनशीलता आणि लवचिकतेबाबत कमी पुरावे सापडतात.

## २) वर्तणूक आणि शैली सिद्धांत

काही सिद्धांतकारांनी विशेषत: सिद्धांताचे टिकात्मक परिक्षण करुन यशस्वी नेत्याचे वर्तन अभ्यासत असताना त्यांच्या वर्तन कौशल्याचे आणि त्यांच्या नेतृत्त्वाची विस्तृत शैली ओळखुन नेतृत्त्वाचा विचार केला आहे. डेव्हीड टेम्पलेलँडन याने नेतृत्त्व केवळ सौद्धांतिक दृष्टीकोनातूनच पाहिले नाही तर एक प्रेरणास्त्रोत म्हणुन पाहिले आहे. त्यांच्या मते, यशस्वी नेत्याला अधिकार, सत्ता यांची गरज असते. पण ते अधिकार कमी प्रमाणात का असेना मात्र त्याची कार्यात्मकता ही उच्च प्रमाणात असावी.

कर्ट लेविन, रोनाल्ड लोपिट आणि राल्फ व्हाइट यांनी १९३९ मध्ये नेतृत्त्व कौशल्य आणि नेतृत्वाची कामगिरी यांच्यावर काम केले. यासाठी त्यांनी अकरा वर्षाच्या मुलाचे वेगवेगळे गट केले आणि त्यानुसार मुल्यांकन केले. प्रत्येक महान नेत्यांचा प्रभाव, त्याचे निर्णय, त्यांचे प्रोत्साहन, त्यांचे टीकात्मक परिक्षण हे गट कार्याच्या व्यवस्थापनामध्ये अभ्यासले गेले.

अशा या व्यवस्थापन प्रकल्पामध्ये :–

१. सत्ताधीश / सत्तावादी

२. लोकशाहीवादी

३. अहस्तक्षेपवादी.

सत्तावादी लोक नेहमी एकटे निर्णय घेतात. त्यांचया आदेशाचे सक्तीने पालन व्हावे अशी त्यांची अपेक्षा असते. प्रत्येक नेत्याची प्रत्येक कामात सहभाग असावा हे आवश्यक असते. परंतु सहसा तसे घडत असताना दिसत नाही. साधारणत: सत्तावादी लोक कधी स्तुतीसाठी तर कधी टीकेसाठी पात्र ठरत असतात.

लोकशाहीवादी मध्ये सामुहिक निर्णयाला महत्त्व दिले जाते. नेत्याकडुन केवळ मदतीची अपेक्षा केली जाते. एखाद्या कार्याची पूर्तता होण्यासाठी नेत्याकडून समुहाला केवळ तांत्रिक सल्ला दिला जातो. समुहातील लोकांकडून नेत्याला अनुसरुनच योग्य निर्णय घेतले जातात. मात्र योग्य निर्णयाची निवड करताना कधी कौतुकाचा तर कधी टीकेला सामोरे जावे लागते.

अहस्तक्षेपवादी मध्ये नेत्यांच्या कोणत्याही सहभागाविना सामुहिक निर्णयाला महत्त्व दिले गेले आहे. शक्यतो नेत्याचा कोणत्याच कार्यात सहभाग असत नाही. मात्र त्यांना सहभागी होण्यासाठी पाचारण केले असता ते सहभागी होऊ शकतात. अशामुळे ते फार कमी कौतुकास पात्र ठरतात. या सर्व कारणांमुळे लोकशाहीवादी शैलीला अधिक प्राधान्य देण्यात येते.

व्यवस्थापकीय प्रकल्प नमुना देखील वर्तणूक सिद्धांतावर आधारित आहे. हे नमुने १९६४ मध्ये याच भिन्न नेतृत्त्व शैलीच्या सूचनेनुसार रॉबर्ट ब्लॅक आणि जेन माऊंटन यांनी तयार केले होते. हे नेत्यांकडे दुर्लक्ष करण्याच्या हेतुने आणि ध्येय साध्य करण्यासाठी त्याचा होणारा व्यत्यय या आधारावर तयार करण्यात आले आहेत.

### ३) परिस्थितीजन्य आणि आकस्मिक सिद्धांत :

परिस्थितीजन्य सिद्धांताचा देखील नेतृत्त्वावर प्रभाव पडत असताना दिसतो. कार्लेलने सुचवले आहे की सामाजिक शास्त्रज्ञांच्यानुसार महान पुरुषांच्या हस्तक्षेपामुळेच इतिहास घडलेला आहे. तसेच हर्बट स्पेन्सर म्हणतो की, प्रत्येक व्यक्ती ही वेळेनुसार, परिस्थितीनुसार घडत असते. तो जसे प्रतिपादन करतो की, वेगवेगळ्या परिस्थितीत त्या परिस्थितीनुसार गोष्टी घडत असतात. परिस्थितीजन्य सिद्धांतामध्ये नेत्याबाबत असा कोणताही विशिष्ट मानसशास्त्रीयदृष्ट्या आराखडा सांगता येत नाही. म्हणजेच या सिद्धांतानुसार एखादी व्यक्ती नेता म्हणून कार्यरत असताना तिच्या समोर असणाऱ्या परिस्थितीनुसार ती कार्यरत असते.

काही सिद्धांतकारांनी परिस्थितीजन्य सिद्धांताची वैशिष्ट्ये आणि दृष्टीकोन यांच्यावर कार्य करण्यास सुरुवात केली. लेविन अट ऑल म्हणतात की, शिक्षण तज्ञांनी नेतृत्त्वाला त्यांच्या विश्लेषणात्मक स्वरुपावरुन साधारण स्वरुप देण्याचा प्रयत्न केला आहे. यासाठी त्यांनी तीन नेतृत्व शैलीचा आधार घेऊन स्पष्टीकरण केले आहे. परिस्थितीजन्य सिद्धांतानुसार सत्तावादी नेतृत्त्व शैली ही परिस्थितीनुसार निर्णय घेते. मात्र दैनंदिन, कामकाजामध्ये ते आपल्या अनुयांयींना जिंकू शकत नाहीत. लोकशाहीवादी नेतृत्त्व शैली मध्ये योग्य परिस्थितीत अधिक सर्वसमावेशकता पहावयास मिळते.

अहस्तक्षेप सिद्धांतामध्ये मिळालेल्या स्वातंत्र्याचे कौतुक केले जाते. कारण नेता त्यात भाग घेत नाही. त्यास दीर्घकालीन आणि संस्थात्मक समस्या मधील अपयश मानले जाते. यामुळे सैद्धांतिक नेत्यांनी नेतृत्त्व शैलीला परिस्थितीजन्य आकस्मिकता संबोधले आले. त्यामुळे आकस्मिक गोष्टींचा विचार केला जातो.

सद्यस्थितीत आकस्मिक नेतृत्व यामध्ये चार सिद्धांत दिसून येतात.

१) फिडलर आकस्मिकता

२) व्हेरम–हेटान आकस्मिकता

३) मार्ग– लक्ष्य सिद्धांत

४) हर्सो–ब्लॅन्कार्ड आकस्मिकता

**व्हिक्टर व्हूम** याने फिलिप यॉटन (१९७३) आणि आर्थर जागो (१९८८) यांच्या मदतीने नेतृत्व प्रवृत्तीचे वर्णन करण्यासाठी वर्गीकरण केले, हा मानक निर्णय सिध्दान्तामध्ये घेण्यात आला, ज्या ठिकाणी नेतृत्त्व शैलीच्या घटकांशी संबंधित आहे आणि कोणत्या परिस्थितीत प्रस्ताव उपयुक्त आहे. हा प्रस्ताव अद्वितीय असण्याचे कारण म्हणजे की, हा सर्व व्यवस्थापकिय व्यक्तींच्या विचारांशी सहमत होता. ज्यांनी–ज्यांनी वेगवेगळे प्रकारचे विभाग तसेच त्यांचे विचार आणि परिस्थिती यावर विश्वास ठेवला. नंतर त्या सिद्धांताला आकस्मिक सिध्दांत अथवा आणीबाणी सिद्धांत किंवा बिकट परिस्थितीत हाताळणारा सिध्दांत म्हटले गेले.

**पाथ–ध्येय सिद्धांत** रॉबर्ट हाऊस (१९७१) याच्या विचारानूसार विकसित केला. हा सिद्धांत व्हिक्टर व्हूमच्या अनुमानित सिद्धांतांवर आधारित होता आणि ह्या सिद्धांतामध्ये पर्यावरण घटक आणि अनुयायी वैशिष्ट्ये घटकांशी संबंधित आहेत. फिडेलर आकस्मिक सिद्धांतानुसार, पाथ–ध्येय सिद्धांतात विपरीत चार नेतृत्व वर्तन परिस्थिती आणि गरजेनुसार कोणत्याही सिद्धांताचे अनुसरण करू शकतात. पाथ–ध्येय सिद्धांत एक सापेक्ष सिद्धांत आणि व्यावहारिक नेतृत्व सिद्धांत म्हणून ओळखला जाईल कारण ते परिस्थिति आणि अनुयायांच्या परस्पर व्यवहारांवर जोर देते.

हर्सी आणि ब्लॅन्कार्ड यांनी चार नेतृत्व नमुना शैली आणि चार अनुयायी–विकासस्तर प्रस्तावित केले. प्रभावीतेसाठी, नमुना निश्चित करणे, विकासाच्या नेतृत्वाखालील नेतृत्व शैली पूर्णतः जुळली पाहिजे. या नमुनामध्ये नेतृत्व वर्तन केवळ नेतृत्व करणाऱ्या व्यक्तीची वैशिष्ट्येच नाही तर अनुयायांची वैशिष्ट्ये देखील गृहीत धरले आहेत.

**कार्यात्मक सिद्धांत**

(हॅकमन आणि वॉल्टन, मॅकग्राथ, १९६२) यांच्या मते हा एक विशेष आणि उपयुक्त सिद्धांत आहे, जो विशिष्ट नेतृत्वाच्या वर्तनासाठी उपयुक्त आहे जे की, संस्थात्मक किंवा सांघिक प्रभावीपणे योगदान देतात. ह्या सिद्धांतामध्ये असा युक्तिवाद आहे की, समूहाचे मुख्य काम म्हणजे समूहांच्या गरजा आवश्यक असलेल्या गोष्टींचा काळजी घेणे, म्हणून नेतृत्व करणाऱ्या सदस्याने प्रभावीपणे आणि एकजुटीसाठी नेहमीच चांगले काम केले पाहिजे.

(फ्लेशमन एट अल, १९९१, हॅकमन आणि वेगमॅन, २००५; हॅकमन आणि वॉल्टन, १९८६). यांच्या मते जरी कार्यकारी नेतृत्व सिद्धांत बहुतेकवेळा टीम लीडरशिप (जक्कारो, रत्मानम आणि मार्क्स, २००१) यांना लागू केले गेले असले तरी ते प्रभावीपणे तसेच व्यापक संस्थात्मक नेतृत्व (झकारो, २००१) लागू आहे.

**कार्यात्मक नेतृत्वावरील सारांश** (कोझलोव्स्की इट अल.) (१९९६), झकारोतो इट अल. (२००१), हॅकमन अँड वॉल्टन (१९८६, हॅकमन आणि वेगमॅन (२००५), मॉर्गेसन (२००५), क्लेन, जेइगेटेट, नाइट आणि जिओ (२००६) यांच्या मते संघटनेच्या कामगिरीमध्ये नेता पाच प्रकारे व्यापक कार्य प्रभावीपणे करतो. (१) पर्यावरण निरीक्षण, (२) संस्थेचे कार्य वाटून घेणे (३) अंडरग्रॅज्युएटससाठी शिक्षण आणि प्रशिक्षण देणे (४) इतरांना प्रेरणा देणे आणि (५) गटवर्गात सक्रिय सहभाग.

वेगवेगळ्या नेतृत्वाची वर्तणूक हे व्यवस्थतीत काम करण्याचे प्रतिक दर्शवते. सुरुवातीच्या कार्यात नेत्याने वर्तनास ओळखले की, फेयशमन, (१९५३) गृहीत धरून कर्मचाऱ्यांच्या पर्यवेक्षकांचे वर्तन दोन मोठ्या श्रेणींमध्ये आणि संरचनेच्या सुरवातीस मानले. त्यामध्ये त्याचे प्रभावी वर्तनाचे विचार देखील गृहीत धरले आहेत. अशा प्रकारचे वर्तनाबद्दल इतरांकडे लक्ष देण्याची गरज आहे. किंवा इतरांच्या मदतीसाठी कार्य करीत आहेत. आरंभीच्या संरचनेत, नेतृत्वाची कार्यवाही आणि विशेषतः कामाची परिपूर्ती केंद्रीत आहे. यात स्पष्टीकरण, कामगिरीबद्दल समाधान आणि त्या कामाबद्दल कार्यक्षमता यांचा समावेश असू शकतो.

### ऑपरेशन आणि रुपांतरण सिद्धांत

मुख्यलेख: व्यवहार्य नेतृत्व आणि परिवर्तनशील नेतृत्व

ॲक्शन लीडर (बर्न्स, १९७८) यांच्या मते यामध्ये इतके सारे अधिकार आहेत की एक विशेष कार्ये करणाऱ्या व्यक्तीस बक्षीस देऊ शकतो किंवा त्याच्या कार्यसंघासाठी दंड देऊ शकतो. मॅनेजरने आपल्या गटाचे नेतृत्व करावे अशी संधी त्याला दिली जाते आणि त्याच्या गटाने त्याच्या नेतृत्वाचे पालन करावे जेणेकरून एक विशिष्ट ध्येय पूर्ण होऊ शकेल आणि त्या बदल्यात त्यांना काही मोबदला मिळेल. जेव्हा उत्पादकता अपेक्षित पातळीपेक्षा कमी असते तेव्हा नेतृत्व करणाऱ्याने आपल्या कामगारांना चांगले काम करण्याचे प्रशिक्षित द्यावे आणि उत्तेजनार्थ पारितोषिके द्यावीत.

**बदलते नेतृत्व**: (बर्न्स, २००८) यांच्या मते आपण कार्यसंघास प्रभावी आणि प्रभावी होण्यासाठी प्रेरित करावे. ध्येये साध्य करेपर्यंत त्यांच्याशी संवाद साधने हा खूप महत्वाचा भाग आहे अशा प्रकारचे नेतृत्व अधिकतर दिसून येत असते आणि काम पूर्ण करण्यासाठी एकामागे एक अशा ओळीने अनेक प्रकारची युक्ती वापरतात. बदलणारे नेतृत्व हे मोठमोठ्या गोष्टींवर लक्ष केंद्रित करत असते, जे त्यांच्या ग्रुप मधील लोकांची काळजी घेतात. लिडर्स हे नेहमी अशा उपायांची पाहणी करतात की, जी कंपनीचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी कंपनीला मदत करू शकतात.

**नेतृत्व आणि भावना**

नेतृत्व ही भावनेची संपूर्ण प्रक्रिया आहे, जी भावनांच्या भावनांसह सामाजिक प्रभावाची प्रक्रिया जाणवून घेते. संस्थेमध्ये, लीडरच्या मनाचा गटावर काही प्रभाव पडतो. या प्रभावांमध्ये तीन स्तरांचे वर्णन केले जाऊ शकते:

१. **वैयक्तिक गटाच्या सदस्यांचा परतावा.** समूहातील सदस्यांना लीडरच्या चांगल्या मनःस्थिती जाणीव असते आणि चांगली अपेक्षाही असते याची तुलना नकारात्मक मनःस्थिती असणाऱ्या लीडरशी केली जाते. लीडर हा त्यांचा मूड त्यांच्या भावनांची कदर करून बदल घडवू शकतो. चॅटनोपॅथी ही एक मनोवैज्ञानिक यंत्रणा आहे. ज्याद्वारे लीडर हे त्यांच्या अनुयायांना प्रभावित करतात.

२. **गटातील मजबूत सकारात्मकता.** ग्रुपमध्ये प्रेरीत वाणीने समूहांच्या समतुल्य किंवा एकसंध उत्तेजित प्रतिक्रियेच एक प्रतिक दर्शवितो. समूहाला चांगल्या वाणीने प्रेरणा मिळते आणि संपूर्ण गट समूहाचे विश्लेषण करते. ज्या गटांच्या नेत्यांकडे सकारात्मक आवाजाचे विचार असतील तो नकारात्मक मूड ग्रुपच्या नेत्यांपेक्षा अधिक प्रभावी असतात.

३. **ग्रुप प्रक्रिया** हि एक प्रकारची आपआपसात समन्वय साधण्याची, प्रयत्न करण्याची आणि कार्य करण्याची योजना आहे. सार्वजनिक अभिव्यक्तीचा मूड आणि इतर गटसदस्य कसे विचार करतात आणि काय करतात. जेव्हा लोक काही चिटवती अनुभवतात तेव्हा ते इतरांना जाणीव करून देतात. लीडर हे त्यांचा मूड त्यांची मनःस्थिती, त्यांचा हेतू, आणि वर्तनांद्वारे व्यक्त करू शकतात. जसे की, उदाहरणार्थ, लीडर चा सकारात्मक विचार असा दर्शवितो की तो चांगल्या कामासाठी लक्ष्य प्राप्त करीत आहे. समूहातील सदस्य हे त्याचा संदेश सकारात्मक आणि व्यावसायिकपणे घेऊन समूह प्रक्रियेत त्याचे परिणाम दिसून येतात.

ग्राहक सेवेच्या संशोधनात असे आढळून आले की नेत्याचे सकारात्मक मूड मुळे गटाचे कार्यप्रदर्शन सुधारते. दुसऱ्या दर्शनी भागात आढळून आले की,

लीडरच्या मूड व्यतिरिक्त त्याचे वागणे इतर कर्मचाऱ्यांसाठी सकारात्मक आणि नकारात्मक भावनांचा स्त्रोत आहे. लीडर हा परिस्थितीची जाणीव करून कार्यक्रमाची आखणी तयार करतो. जी भावनात्मक प्रतिक्रियेस कारणीभूत ठरतात. घटनांच्या दरम्यान त्यांच्या नेतृत्वासह काही नेत्यांचे वर्तन प्रदर्शित करणे हे त्याच्या प्रभावी घटनांचे परिणाम दर्शवते. नेतृत्व हे प्रेरणा आणि आकार देते. उदाहरणार्थ – अभिप्राय द्या, कार्य पूर्ण करा, स्त्रोत वितरित करा. कारण त्याचा भावनात्मक स्थितीचा कर्मचारी वर्तनावर आणि उत्पादनक्षमतेवर थेट परिणाम होत असतो, म्हणून त्याची भावनात्मक स्थिती जाणून घेणे महत्वाचे आहे. त्याची

भावनिक बुद्धिमत्ता, समजून घेण्याची क्षमता, स्वतःची आणि इतरांची मनःस्थिती आणि भावना स्थापित करणे, प्रभावी नेतृत्व प्रस्थापित करणे. अशा प्रकारची जबाबदारी स्विकारणे म्हणजे एक प्रकारचे **कुशल नेतृत्व (लीडरशिप)** आहे.[२६]

## महिला नेतृत्व –

नेतृत्व हे व्यवस्थापनाच्या अनेक तत्वापैकी एक महत्त्वाचे तत्व आहे. कोणत्याही कार्याच्या अंमलबजावणीत नेतृत्वाची अत्यंत गरज असते. एका नियोजित ध्येयपूर्तीकडे घेऊन जाण्यासाठी आणि कार्याचे नियंत्रण व मार्गदर्शन करण्यासाठी अनेकदा योग्य नेतृत्वाची गरज असते. मुळात यांचा अर्थच असा होतो की, संघटनेच्या ध्येयपूर्तीसाठी विविध व्यक्तीच्या क्रिया–प्रक्रियांचे संचालन, मार्गदर्शन, नियंत्रण व समन्वय करणे होय.

राजकीय व्यवस्र्तेत समाजातील कोणत्याही एका वर्गाची पूर्णपणे उपेक्षा केली जात नाही. मात्र राजकीय सहभागामध्ये असंतुलन दिसून येते. त्यामुहे किती सहभाग मिळाला यावरुन नेतृत्व ठरत असते. नेतृत्वाकडून सातत्याने प्रतिनिधत्वाचा दावा केला जातो. तेव्हा या दाव्यामध्ये इतरांच्या वतीने प्रतिनिधित्व करण्याचा दावा नसतो. अशा वेळी प्रतिनिधीत्व केले जाते, परंतु राजकीय सहभाग मात्र नाकारली जातो. म्हणजेच पुरुषांनी महिलांचे प्रतिनिधीत्व केले जाते, परंतु राजकीय सहभाग (भागीदारी) मात्र नाकारली जाते.

असे असताना देखील महिलांचे नेतृत्व हे जागतिक, राष्ट्रीय, राज्यस्तरावर व स्थानिक शासन व्यवस्थेत लक्षणीय असताना दिसते. महिला नेतृत्व त्यांच्या सहभागामध्ये वाढ होताना दिसते.

जागतिक स्तरावर महिला नेतृत्वाचा विचार करत असताना अनेक महिलांचा यात समावेश करण्यात येतो. २००५ पासून यशस्वीपणे नेतृत्व करणाऱ्या, चौथ्यांदा निवडणुक लढवून आपली सेवा बजावत असणाऱ्या जर्मनीतील पहिल्या महिला चांसेलर अर्जेला मर्केल यांच नाव घ्याव लागेल.

त्याचबरोबर ब्रिटनच्या पंतप्रधान म्हणून कार्यरत असणाऱ्या घेरेसा मे यांचा उल्लेख करावा लागेल. २०१६ च्या निवडणुकीत अमेरिकेला जगातील काही आघाडीच्या लोकशाही पैकी एक संबोधले जाते अशा ठिकाणी देशाचे नेतृत्व हिलरी क्लिंटन ही एक महिला करु पहात होती. जरी २०१६ च्या निवडणुकीत राष्ट्राध्यक्ष पदासाठी त्यांचा पराभव झाला असला तरी भविष्यातील पुन्हा त्या पदासाठी दावेदार असतील.

अशा रितीने जाने.२०१९ पर्यंत जागतिक स्तरावर अकरा महिला या देशाच्या प्रमुख (राष्ट्रपती, राष्ट्राध्यक्ष) म्हणुन कार्यरत आहेत. तर दहा देशात महिला शासन प्रमुख (पंतप्रधान) म्हणुन कार्यरत आहेत.

जागतिक स्तरावरील काही नेतृत्वांचा उल्लेख करावा लागेल. जसे त्सु–इंग–वेन–तैवानच्या राष्ट्राध्यक्ष आहेत. कोलिंडार गुजर लिटरोव्हिक या क्रोएशियाच्या राष्ट्राध्यक्ष आहेत. मिशेल बॅचेल या चिलीच्या

राष्ट्राध्यक्ष आहेत. तसेच शासनप्रमुख (पंतप्रधान) म्हणुन शेख हसीना वाजेद (बांग्ला देश), बटा मारिया – रइझालो (पोलंड), अनी सालबर्ग (नार्वे), जॅकिडा ओर्डर्न (न्युझीलंड) यांचा उल्लेख करावा लागेल.

याचबरोबर निकोला स्टर्जनन या स्कॉटलंडच्या पहिल्या मंत्री आहेत. तसेच म्यानमारच्या राज्य सल्लागार म्हणुन आंगसान स्थू की यांचा उल्लेख करावा लागेल.

जागतिक पातळीबरोबरच भारतातही महिला नेतृत्वाची एक समृध्द परंपरा आहे. स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळात महिलांनी देशाचे स्वातंत्र्य आणि विकासासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. १८५७ साली झाशीची राणी लक्ष्मीबाई यांनी इंग्रजांविरुध्द उठाव करुन देशासाठी बलिदान दिले. त्यापूर्वी १८२४ मध्ये धारवाडजवळील किच्यूर या सवतंत्र राज्याची राणी चैन्नम्मा इंग्रजांविरुध्द पेटून उठली होती. बेगम हजरत महल, राणी दुर्गावती यासारख्या वीरांगणांनी या लढ्यात उडी मारली.

पुढे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या नेतृत्वातील स्वातंत्र्य लढ्यात स्त्रिया मोठ्या संख्येत सहभागी झाल्या होत्या. सरोजिनी नायडू, अरुणा असफअली, विजयालक्ष्मी पंडित, सूचिता कृपलानी या महिला नेत्यांनी देशला पारतंत्र्यातून मुक्त करण्यासाठी जीवाची बाजी लावली. महात्मा गांधी आणि जवाहरलाल नेहरु यांनी संख्याबळाने त्या राष्ट्राकार्याला मोठा हातभार लावतील, महिला नेतृत्वाने त्यांचा तो विश्वास सार्थ करुन दाखवला. इंदिरा गांधी यांच्या रुपात देशात पहिली महिला पंतप्रधान लाभली. स्वातंत्र्योत्तर काळात अनेक दिग्गज महिला नेत्यांनी राजकारण आणि सत्ताकारणातही उत्कृष्ट कामगिरी बजावली.

प्रामुख्याने २००७ नंतरचा काळ तर महिला नेतृत्वाखाली सुवर्णयुगच म्हणावे लागेल. देशाच्या इतिहासात प्रथमच सर्वोच्च पदावर एवढ्या मोठ्या संख्येत महिला शक्ती आरुढ झाली. राष्ट्रपती पदी प्रथमच प्रतिभाताई पाटील यांच्या रुपात एक महिला विराजमान झाल्या. केंद्रात बरेच वर्ष ज्या संयुक्त पुरोगामी आघाडीची सत्ता होती त्या आघाडीचे नेतृत्व महिलाच करत होती. संयुक्त पुरोगामी आघाडीच्या अध्यक्ष सोनिया गांधी यांनी सलग चौदा वर्ष कॉंग्रेस पक्षाचे अध्यक्षपद भूषवून संघटनेच्या सव्वाशे वर्षाच्या इतिहासात विक्रम नोंदवला आहे. लोकसभा अध्यक्षपदाची जबाबदारी मीरा कुमार यांनी सांभाळली तर आता, सुमित्रा महाजन या सांभाळत आहेत. लोकसभेतील अत्यंत महत्वाचे विरोधी पक्ष नेतेपद सुषम स्वराज यांच्याकडे होते. आता त्या सध्या महत्वाच्या कॅबिनेट मंत्रीपदावर विराजमान आहेत. पश्चिम बंगाल मध्ये ममता बॅनर्जी, तामिळनाडु मध्ये स्व.ने.जयललिता आणि राजधानी दिल्ली शिला दिक्षित यांनी राज्याची सुत्रे सांभाळली. देशातील सर्वात मोठे राज्य उत्तर प्रदेशात मायावती यांनी सत्ता गाजविली. चार वेळा त्यांनी या राज्याचा कारभार सांभाळला. याशिवाय केंद्र आणि राज्या सरकारमध्ये अनेक महिला नेत्या मंत्रिमंडळात सहभागी आहेत. या महिला सत्ताकारण व राजकारणात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवित आहेत. विज्ञान, साहित्य,

समाजकारण त्यासारख्या विविध क्षेत्रात आभाळाएवढ्या उंचीचे कर्तृत्व गाजवणाऱ्या महिला राजकारणातही यशस्वी आगेकूच करत असताना दिसत आहेत. [२७]

**संदर्भ सूची**


१) कवी माधवी, महिला कल्याण आणि विकास, विद्या प्रकाशन, नागपूर पान नं.६

२) तत्रैव, पान नं.८.

३) तत्रैव, पान नं. ११, १२.

४) तत्रैव, पान नं. २०.

५) गाठाळ एस.एस. २०१७, आधुनिक भारताचा इतिहास महाराष्ट्राच्या विशेष संदर्भात, कैलाश प्रकाशन, औरंगाबाद, पान नं.३४०, ३४१, ३४२, ३४३.

६) आपटे ज.श.रोडे पुष्पा. भारतातील महिला विकासाची वाटचाल, डायमंड पब्लिकेशन, पुणे. पान नं. ३०–३५.

७) पवार प्रकाश, २०१० सार्वजनिक धोरण संकल्पना, सिध्दांत आणि भारतीय सार्वजनिक धोरणाचा आढावा प्रतिमा प्रकाशन, पुणे. पान नं.११७.

८) कोळंबे रंजन, भारतीय अर्थव्यवस्था, भगिरथ प्रकाशन, पुणे.

९) तत्रैव, पान नं. १२१.

१०) कोळंबे रंजन, मानव संसाधन विकास आणि मानवाधिकार, २०१७. भगिरथ प्रकाशन, पुणे. पान नं. १६८, १६९.

११) देसले किरण, २०१६, आर्थिक व सामाजिक विकास, दिपस्तंभ प्रकाशन, जळगाव.

१२) शिंदे ज.रा., अमृतकर प्रशांत. समकालीन जागतिक राजकारणातील प्रमुख समस्या, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, पान नं. १३० – १३७.

१३) शिंदे ज.रा.अमृतकर प्रशांत, समकालीन जागतिक राजकारणातील प्रमुख समस्या, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, पान नं. १४२, १४३, १४५.

१४) शिंदे ज.रा.अमृतकर प्रशांत, समकालीन जागतिक राजकारणातील प्रमुख समस्या, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद पान नं. १५५, १५६.

१५) शिंदे ज.रा. अमृमतकर प्रशांत, समकालीन जागतिक राजकारणातील प्रमुख्या समस्या, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, पान नं. १६४ – १६६.

१६) भोळे भास्कर लक्ष्मण, २००३ भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण, पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स, नागपूर, पान नं. १ ते ११.

१७) भोळे भास्कर लक्ष्मण, २००३ भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण, पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स, नागपूर, पान नं. १८, १९.

१८) भोळे भास्कर लक्ष्मण, २००३ भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण, पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स, नागपूर, पान नं. २०, २१

१९) भोळे भास्कर लक्ष्मण, २००३ भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण, पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स, नागपूर, पान नं. २६, २७.

२०) भोळे भास्कर लक्ष्मण, २००३ भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण, पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स, नागपूर, पान नं. ३२, ३३

२१) जाधव तुकाराम, शिरापूरकर महेश, २०१२, भारतीय संविधान व भारतीय राजकारण (महाराष्ट्राच्या विशेष संदर्भासह) आणि अधिनियम, द युनिक अॅकडमी प्रकाशन, पुणे. पान नं. १३४.

२२) M.Laxmikanth, 2012, Indian Polity, Tata MC Graw Hill Publication, New Delhi, Page No. 22 – 42.

२३) व्होरा राजेंद्र, पळशीकर सुहास, १९८७ राज्यशास्त्र कोश, दास्ताने रामचंद्र आणि कंपनी पुणे, पान नं. १४०, १४१.

२४) गुरव आरती, लीडरशीप + टीमवर्क = सक्सेश बजींग स्टीक पब्लिसिंग हाऊस, मुंबई. पान नं. १, ४, ५, ६.

२५) अकोललकर व.वि. नेतृत्व – मराठी विश्वकोश : खंड ८. महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई.

संदर्भ– १. Cartwright D : Zander, A.F. Group Dynamics : Research & Theroty, Row, 1960. २. Krench, David & others, Undividual in Society : A Textbook of social Psychology, New York, 1962.

२६) नेतृत्व सिध्दांत – https : //him.wikipedia.org.

२७) देव हरकरे सविता, २०१३, इंदिरा ते ममता – भारतीय महिला राजकीय नेतृत्व, नचिकेत प्रकाशन, नागपूर, पान नं. ४.

# प्रकरण दुसरे

# संदर्भ साहित्याचा आढावा

## २.१ प्रस्तावना :

'लोकसभेतील महिला नेतृत्वाचा एक अभ्यास' (२००४–२०१४) या विषयावर राज्यशास्त्र विषयामध्ये संशोधनात्मक अभ्यास झालेला नाही. महिला प्रतिनिधीत्वाचा स्थानिक स्वराज्य संस्था, विधानसभा, नेतृत्वाच्या संदर्भात अभ्यास झालेला आहे. त्यासाठी महिला सबलीकरण राज्यघटना, विधानसभा, महिला नेतृत्व या विषयासंदर्भात मराठी, हिंदी व इंग्रजी लिहिलेल्या ग्रंथाचा संदर्भ घेतला आहे त्यांचा संदर्भ पुढीलप्रमाणे –

## २.२ संबंधीत साहित्याचा आढावा :

**१) डॉ. भास्कर लक्ष्मण गोळे 'भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण', पिंपळापुरे अँड. कंप. पब्लिशर्स, नागपूर, जून २००३.**

आपल्या देशाची अनन्य सामाजिक चौकट, वासाहतिक राजवटीने येथे सोडलेल्या अनेक पदरी बरावाईट वारसा, येथील स्वातंत्र्यलढ्याचे जगावेगळे स्वरुप आणि त्याने निर्माण केलेल तत्त्वादर्श व उंचावलेल्या आशा–आकांक्षा, येथील अभिजन वर्गाची सामाजिक–सांस्कृतिक पाळेमुळे या सर्वच संदर्भासह भारतीय राजकारणाचा उहापोह या प्रस्तुत ग्रंथात केलेला आहे.

भारतात संविधानाने स्थापन केलेल्या उदारमतवादी लोकशाहीची व्यवच्छेदक लक्षणे काय आहेत तिला आधारभूत तत्त्ववैचारिक चौकट कशी आहे. कायदेनिर्मिती, कायद्यांची अंमलबजावणी आणि निर्वाचन या तिन्ही जबाबदाऱ्या पार पडणाऱ्या केंद्रिय व राज्यस्तरीय यंत्रणाची रचना व कार्ये कोणती आहेत या नेहमीच्या विषयाप्रमाणेच येथील पक्षोपपक्ष, दबावगट, नोकरनाशी वगैरेबद्दलचीही चर्चा अर्थातच या ग्रंथात आहे. पण त्याचबरोबर येथील समाजात खोल रुजलेल्या जातीय, धार्मिक, प्रादेशिक, भाविक वगैरे निष्ठांमुळे या गणराज्यातील प्रत्येक राजकीय प्रक्रिया कसे वेगळे वळण घेते, किंवा संसदीय–संघराज्यात्म राज्य प्रणालींची पाश्चिमात्य प्रतिमाने येथे त्या निष्ठांच्या प्रभावाखाली कसे वेगळेच स्वरुप धारण करतात हे स्पष्ट करण्याचाही येथे प्रयत्न केला आहे.

नव्वद नंतरच्या दशकात भारतीय राज्यव्यवस्थेचे झपाट्याने झालेले प्रादेशिकरण आणि प्रादेशिक पक्ष व नेतृत्व यांना राष्ट्रीय राजकारणात प्राप्त झालेले प्राधान्य त्यातून केंद्र–राज्य संबंधात सुरु झालेले नवे सहयोगपर्व सत्तेच्या विकेंद्रीकरणाच्या संकल्पनेला मिळालेली चालना आणि लाभलेले नवे आयाम, पंचायत

राज्याच्या प्रयोगात प्रथमच प्रत्ययास येऊ लागलेले तळपातळीवरील सशक्त राजकीय प्रवाह, अनुसूचित जाती जनजातीच्या व स्त्रियांच्या आरक्षणामुळे स्थानिक स्वराज्य क्षेत्रात घडून आलेले स्वागतार्ह बदल यांचीही आस्थेवाईक दखल ग्रंथकाराने घेतली आहे.

**२) ज. श. आपटे, पुष्पा रोडे 'भारतातील महिला विकासाची वाटचाल' डायमंड पब्लिकेशन, पुणे २०१२.**

प्रस्तुत पुस्तकात भारत स्वतंत्र झाल्यापासून देशाने सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्रात बऱ्याच प्रमाणात प्रगती केली आहे. या सर्व विकास प्रक्रियेत वर्षानुवर्षे दुर्लक्षित उपेक्षित राहिलेला महिला वर्ग, प्रगतीची, उत्कर्षाची, सुधारणांची फळे चाखू लागला आहे तो आता लाभार्थीही झाला आहे असे वर्णन केले आहे.

तसेच माहिलांची प्रगती, त्यांची विकासाची वाटचाल कशी, कोणत्या दिशेने, किती झाली हे देखील सांगितले आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महिला विकासासाठी कायदा मंत्री या नात्याने केलेली कामगिरी उल्लेखली आहे. १९७० च्या नंतर आंतरराष्ट्रीय महिला वर्ष, महिला दशक यामुळे जगभर महिलांसाठी कार्यक्रमांना गती मिळाली, दिशा मिळाली. पहिल्या योजनेपासून सुरू झालेल्या कुटुंब नियोजन कार्यक्रमाचा आढावा तपशीलवार घेतला आहे. स्त्रीगर्थ हत्या, घरगुती हिंसा, लैंगिक छळवणूक आदी समस्यांचाही परामर्श घेतला आहे.

महिला विकासासाठी पाश्चिमात्य देशांत व भारतात महिला संस्थांनी पुढाकार घेतला. वैचारिक तात्विक पार्श्वभूमी, वातावरण, अधिष्ठान देण्यासाठी प्रयत्न केले. त्याचे चिकित्सक विवेचल केले आहे. शासकीय स्वयंसेवी पातळीवरील महिला विकासासाठी महिला कल्याण, महिला सक्षमीकरणाचे कार्यक्रम राबविले गेले त्या कार्यक्रमामागे एक तात्विक भूमिका होती हे समजून सांगितले आहे.

**३) प्रा. माधवी कवी ''महिला कल्याण आणि विकास'' विद्या प्रकाशन नागपूर, आक्टोबर १९९९.**

प्रस्तुत पुस्तकात माधवी कवी यांनी प्राचीन काळापासूनचे अगदी सखोल वर्णन केलेले आहे. वैदिक काळापासून स्त्रियांची स्थिती कशी बदलत गेली यांचे विवेचन केले आहे. वैदिक काळात स्त्रियांना समाजात मानाचे स्थान होते. त्यांना सन्मानपूर्वक वागवले जात होते मात्र उत्तर वैदिक काळापासून स्त्रियांना दुय्यम स्थान दिले जाऊ लागले. पुढे ब्रिटिश आगमनामुळे व भारतीय समाजसुधारकाच्या प्रयत्नामुळे समाजातील स्त्रियांचा दर्जा सुधारण्यास मदत झाली. स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय शासनाने केलेले विविध कायदे, महिलांच्या चळवळी, विविध संघटना आणि महिला कल्याणासाठी आखलेल्या विविध योजना, स्त्री साक्षरतेचा प्रसार ग्रामीण व शहरी भागातील महिलांच्या समस्या आणि उपाययोजना, घरगुती हिंसाचाराची कारणे व परिणाम आणि त्यावरील उपाय यासंबंधी सविस्तर चर्चा या प्रस्तुत पुस्तकातून केली आहे.

प्रस्तुत पुस्तक सर्वच सामाजिक कार्यकर्त्यांना उपयोगी पडेल असे लिहिलेले आहे. या पुस्तकात वैदिक काळापासून ते विसाव्या शतकांपर्यंत महिलांचे स्थान, महिला विकासाच्या शासनाच्या विविध योजना, सामाजिक परिवर्तन कायदे, विज्ञान व तंत्रज्ञान, विद्येचा स्त्री जीवनावरील झालेला परिणाम व प्रभाव, समाजसुधारकांचे विचार, स्त्री मुक्ती इ. विषय सदर पुस्तकात हाताळले आहेत.

**४) अंजली मुळे, गीताली वि. म. ''स्त्री चळवळ आणि राजकारण–समतेसाठी सत्तासंघर्ष'' लोकवाङ्मयगृह मुंबई एप्रिल –२००१.**

प्रस्तुत ग्रंथात अंजली मुळे व गीताली वि. म. यांनी स्त्री चळवळ आणि स्त्री अभ्यास यांची सांगड घालून विचारविविश केले आहे. स्त्रियांनी करावयाच्या मुल्याधिष्ठित राजकारणासाठी या पुस्तकांतील लेख, मुलाखती यांचा उपयोग झाला आहे. पुरुषप्रधान व्यवस्थेत राजकारण ही बाब फक्त पुरुषांचीच नसते. त्यावर त्यांचीच मक्तेदारी नसते. ही भूमिका स्त्री मुक्ती चळवळीने स्त्रियांना समान दर्जा देऊन खोडून काढलेली आहे. स्वार्थी व संधीसाधू राज्यकर्त्यावर अंकूश ठेवण्यासाठी चांगले विचार लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी राजकीय सत्ता वापरली जावी यासाठी स्त्री–पुरुष या दोहोंनी सजग व कार्यरत रहाणे गरजेचे आहे. जसे प्रतिपादन सदर पुस्तकात केले आहे.

स्त्रियांवरील अन्याय व अत्याचार थांबविण्यासाठी आरक्षणाबरोबरच स्त्रियांमध्ये राजकीय जागरुकता निर्माण होणे गरजेचे आहे. यासाठी सर्व स्तरावरील स्त्रियांना संघटित करणे गरजेचे आहे. संघटित स्त्रियाच राजकारणावर अंकुश ठेवू शकतील असं प्रतिपादन सदर पुस्तकातून केले आहे.

**५) डॉ. नारायण रा. खोकाळे – 'राजकीय नेतृत्त्व' श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, १९९९.**

प्रस्तुत लेखकाने Ph.D. साठी नेतृत्त्वावर संशोधनात्मक प्रबंध लिहिण्यासाठी अनेक वर्षे या विषयाचे अध्ययन केले.

प्रस्तुत पुस्तकात 'नेतृत्व' विषयाच्या सौद्धान्तिक बाजूबरोबरच त्याच्या ऐतिहासिक विकासापचा तथा काळानुसार थोडक्यात आढावा घेतला आहे व शेवटी त्याचे समालोचन करण्याचा प्रयत्न केला आहे.

'नेतृत्व' हा शब्द सामन्यतः सर्व लोक वापरतात. पण शब्दाचा अर्थ व व्याप्ती संबंधी पुरेसे ज्ञान नसते. त्यामुळे राजकीय घटनाचे कार्य कारण समजून घेण्यास फार मोठी अडचण जाते. म्हणून 'नेतृत्व' या शब्दाचा अर्थ शक्य तेवढ्या सोप्या भाषेत विशद करण्याचा प्रयत्न केला आहे. सामान्य वाचकाला सहज आकलन व्हावे यासाठी अनेक उदाहरणे व दृष्टान्त दिले आहेत.

'नेतृत्व' या विषयावर पाश्चात्य विद्यापीठांमध्ये विसाव्या शतकात मोठ्या प्रमाणात अध्ययनाला गती प्राप्त झाली असली तरी यापूर्वीच्या काळात 'नेतृत्व' नव्हते असा त्याचा अर्थ नाही तसेच नेतृत्वासंबंधी

विचार बोलले जात नव्हते. असेही नाही. नेतृत्वाच्या पाश्चात्य व प्राचीन भारतीय अर्थामध्ये थोडा बहुत फरक असली तरी त्याचा सामान्य अर्थ प्रत्येकाला सारखाच अभिप्रेत आहे. त्याची चर्चा आवश्यकतेनुसार केली आहे.

**६) डॉ. प्रकाश पवार – भारतीय राजकारण आणि नेतृत्वाची वाटचाल – राजकारण धुरीणत्व – वर्चस्व.**

'नेतृत्व' हा विषय विभूतिपूजा किंवा महान माणूस या पद्धतीने मांडला जातो. त्यामध्ये व्यक्तिगत वैशिष्ट्यांवर अतिरिक्त भर दिला जातो. या पुस्तकामध्ये या मुद्दाला वळसा घालून पुढे जाण्याचा प्रयत्न केला आहे. भारतामध्ये पक्षांची स्थापना होण्यापासूनच्या, म्हणजे १८८५ पासूनच्या नेतृत्वामधील विविध संकल्पनांचा वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे. १८८५ ते समकालीन काळातील नेतृत्वाच्या संकल्पना इथे एकत्रित स्वरुपात मांडल्या आहेत. हे पुस्तक नेतृत्वाच्या उत्क्रांतीचेक चित्तवेधक विश्लेषण करते. राजकीय विषयावर विश्लेषण करताना या पुस्तकाची रुपरेषा तयार झाली आहे. राजकारणात कोणामुळे फेरबदल होतात, हा एक मध्यवर्ती प्रश्न आहे. आर्थिक घटकांमधील फेरबदलांमुळे राजकीय बदल होतो. हा मार्क्सचा सिद्धांत सुपरिचित आहे. मात्र भारतात फार मोठे आर्थिक फेरबदल न घडताही राजकीय बदल का झाला ? याचा अर्थ आर्थिक शक्ती आणि सामाजिक शक्ती अशा दोन्ही शक्तीमध्ये राजकीय फेरबदलांसाठी संघर्ष सुरु होता. या दोन्ही घटकांना नेतृत्वाकडून हाताळले जाते. त्यामुळे आर्थिक शक्ती, सामाजिक ताकद आणि नेतृत्व अशा तीन घटकांचे विश्लेषण इथे केले आहे. यामध्ये राजकीय वंचितता, वर्जनवाद, राजकीय भागिदारी, राजकीय प्रतिनिधित्व, राजकीय वर्चस्व, राजकीय धुरीणत्व या संकल्पनात्मक चौकटीमध्ये त्या पुस्तकाची मांडणी केली आहे.

भारतातल्या नेतृत्वाचा विकास राजकीय वंचिततेपासून राजकीय भागीदारीपर्यंत झालेला दिसतो. राजकीय नेतृत्व वंचितता, प्रतिनिधित्व, धुरीणत्व, वर्चस्व अशा सौद्धान्तिक चौकटीमध्ये विकसित होत जाते. विकासाच्या प्रक्रियेतल्या या लक्षवेधक संकल्पना हाच या पुस्तकाचा मध्यवर्ती आशय आहे. त्यामुळे या पुस्तकात भारतीय नेतृत्वाची संपूर्ण संकल्पना सध्या केवळ 'विभूतीपूजा' किंवा 'तुच्छतादर्शक विशेषणे' अशा दोन मनोरंजक चौकटीमध्ये बंदिस्त झाली आहे.

थोडक्यात, नेतृत्व संकल्पनेच्या अशा सर्व समावेशकतेमुळे राजशास्त्राचे अभ्यासक आणि विद्यार्थ्यांसाठी हे पुस्तक उपयुक्त आहेच, पण 'राजकारण' या विषयात रस असणाऱ्या प्रत्येकासाठीही 'नेतृत्व' संकल्पनेची व्यापक ओळख करुन देण्यासाठी हे पुस्तक अनिवार्य ठरते.

**७) डॉ. वैशाली पवार – महिलांच्या सत्तासंघर्षाचा आलेख, डायमंड पब्लिकेशन, पुणे २०१२.**

प्रस्तुत पुस्तकात १९६० ते २००९ पर्यंतच्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांमधील महिलांच्या राजकीय सहभागाचे विश्लेषण केले आहे.

राजकीय समावेशन (Political Inclusion) राजकीय वगळण्याची प्रक्रिया (Political Exclusion) लिंगभाव व पितृसत्ताकता (Gender and Patriarchy) या संकल्पनात्मक चौकटीमध्ये महिलांच्या राजकीय सहभागाचे चिकित्सक विश्लेषण या ठिकाणी केलेले आहे.

'महिला सक्षमीकरण धोरण' हे आधुनिक उदारमतवादाचा विकास व विस्तार करणारे धोरण कसे आहे याचेही सविस्तर विवेचन या पुस्तकाद्वारे केले गेले आहे.

रमाबाई रानडे व शारदाबाई पवार यांनी कौटुंबिक चौकट मोडित न काढता सार्वजनिक व व्यक्तिगत जीवनामध्ये उदारमतवादाचा वापर कसा केला, याचे स्पष्टीकरण येथे केले आहे.

त्याचप्रमाणे स्थानिक व राज्य पातळीवरील सत्तेमध्ये महिलांना किती प्रमाणात वाटा मिळाला याचेही संख्याशास्त्रीय माहितीच्या आधारे अभ्यासपूर्वक विश्लेषण केलेले आहे.

**८) डॉ. भारती पाटील – 'स्त्रियांचा सत्तेतील सहभाग – सबलीकरणाच्या प्रक्रियेतील महत्त्वाचा टप्पा' समाजवादी प्रबोधिनी, इचलकरंजी, १९९८.**

प्रस्तुत पुस्तकात लेखिकेने स्त्रियांचे सबलीकरण हे स्त्री–पुरुषांनी दोघांनी मान्य करायला हवे. महिला सबलीकरणासाठी स्त्री–पुरुषांनी आपआपल्या समजुतीत बदल करायला हवा. द्वी अबला नसून सबला आहे. हे मान्य करायला हवे. स्त्रियांना संधी मिळाली तर, त्या चांगले राजकारण करु शकतात. सौंदर्याची कल्पना नाजुकपणाशी, अशक्तपणाशी व दुबळेपणाशी जोडून स्त्रीला दुय्यम लेखली जाते. स्त्री शारीरिकदुष्ट्या कमजोर आहे. परंतु श्रमजीवी स्त्रिया सक्षम आहेत. मातृत्वाची क्षमता स्त्रीला पुरुषापेक्षा स्नेह असल्याचे दाखवून देते.

प्रस्तुत ग्रंथांत भारती पाटील यांनी स्त्री–पुरुष समानतेसंबंधी घटनात्मक तरतुदी ७३ वी घटनादुरुस्ती आणि महिला सबलीकरण, स्त्रीवादी चळवळ, स्त्रियांमधील राजकीय जागृती, महिला ग्रामपंचायतीला आदर्श राजकीय पक्ष आणि स्त्रियांचा सहभाग इत्यादीबाबत विवेचन केले आहे.

**९) सुधाराणी श्रीवास्तव – ''भारत महिलाओंकी वैधानिक स्थिती'' कॉमन वेल्थ पब्लिशर्स, नवी दिल्ली, २००६.**

स्वातंत्र्यानंतर महिलाचे अधिकार कायद्याच्या स्वरुपात पुढे आले. हे कायदे सुधारणात्मक, विकासात्मक, सुरक्षात्मक आणि निषेधात्मक स्वरुपात पुढे आले व मंजूर झाले. प्रस्तुत पुस्तकात महिलांना कुटुंबात, कामाच्या ठिकाणी स्वातंत्र्य मिळाले पाहिजे. त्यांना शिक्षण, प्रशिक्षण कायद्याचे ज्ञान देऊन त्यांच्यात जागृती निर्माण करणे.

प्रस्तुत पुस्तकात महिलांच्या अधिकाराचे समीक्षात्मक वर्णन केले आहे. तसेच कायद्याच्या बाबतीत न्यायालयीन निर्णय व संशोधनाची गरज असल्याचे स्पष्ट केले आहे.

मोघलांच्या राजवटीनंतर भारतात महिलांच्या सुरक्षिततेच्या बाबतीत अनेक वाईट प्रथांनी जन्म घेतला त्यामध्ये पडदा पद्धत, बालविवाह, बहुपत्नीत्व इत्यादी वाईट प्रथा सुरू झाल्या. हिंदु स्त्रियांच्या बाबतीत कायदे थोडे लवचित होते. परंतु मुस्लिम स्त्रियांसंबंधी कायदे इतके परखड आहेत की, आज २१ व्या शतकातही त्यामध्ये सुधारणा करणे गुन्हा मानला जातो. ब्रिटिश काळात हिंदूच्या जाचक कायद्यात काही सुधारणा करण्यात आल्या आहेत.

सदर पुस्तकात लेखिकेने महिलांच्या अधिकाराचे चार भागात विभाजन केले आहे. त्यामध्ये सुधारणात्मक कायदे, सुरक्षात्मक कायदे विकासात्मक कायदे आणि निषेधात्मक कायदे यांचा समावेश आहे.

### 10) M. R. Biju 'Womens Empowerment Politics and Policies' Mittal Publications, New Delhi, 2006.

प्रस्तुत पुस्तकात असे स्पष्ट केले आहे की, मानवी हक्क आयोगाने जागतिक मानवी हक्क जाहिरनाम्यात असे म्हटले आहे की, प्रत्येकाला आपल्या देशाच्या राज्यकारभारात भाग घेण्याचा अधिकार आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या सामाजिक व आर्थिक परिषदेने स्त्रियांना निर्णयप्रकियेत सर्व स्तरावर ३०% प्रतिनिधित्व दिले पाहिजे असे १९९५ मध्ये मान्य केले आहे. याचा परिणाम असा झाला की आज जागतिक लोकसंख्येच्या १० टक्के स्त्रिया कायदेमंडळात आल्या.

स्वातंत्र्यानंतर भारतातील स्त्रियांचा दर्जा सुधारण्याकरिता अनेक सकारात्मक पावले उचचली गेली. आपल्या हक्काबद्दल महिला जागरुक झाल्या आहेत हीन सामाजिक प्रथा परंपराविरुद्ध आवाज उठवत आहेत महिला साक्षर झाल्यामुळे त्यांच्यात जाणीव जागृती निर्माण झाली आहे. ७३ वी व ७४ वी घटनादुरुस्ती ही स्त्रियांच्या सबलीकरणाच्या दृष्टीने महत्त्वाची बाब आहे. या घटनादुरुस्तीने महिलांना पंचायतराज व्यवस्थेत ३३ टक्के जागा आरक्षित ठेवण्यात आल्या.

प्रस्तुत पुस्तकात स्त्रियांचा सामाजिक, राजकीय व आर्थिक दर्जा उंचविण्यासाठी विचारवंतांनी व तज्ञांनी विविध बाजूंनी मांडलेल्या घटकांचा विचार करुन लिहिलेल्या सोळा लेखांचे संकलन केले आहे त्यामध्ये भारतातील महिला आरक्षणाचे राजकारण, महिला आरक्षण विधेयक हाताळण्याचे यशस्वी तंत्र, महिला आणि ग्रामीण राजकारण, महिला आणि पंचायत राज संस्था, क्षमता विकास आणि राजकीय सक्षमीकरण, सार्कमधील महिलांचा सहभाग, विमुक्त जमातीतील स्त्री–पुरुष समानतेचा प्रश्न, विमुक्त जमातीतील महिलांचे सामाजिक व आर्थिक सबलीकरण आणि कायदा, स्वयंसहायता बचत गट आणि महिला सबलीकरण

इस्लाम आणि स्त्री–पुरुष समानता, संगणक आधारित स्त्री–पुरुष समानता, शिक्षण मानवी हक्कांच्या आधारे महिला सबलीकरण, आंतरराष्ट्रीय दर्जा व भारतीय कायदा, ग्रामीण प्रशासनातील महिलांचा सहभाग, विकेंद्रित प्रशासनात महिलांची भूमिका इ. विषयाच्या अभ्यासपूर्ण लेखांचा समावेश प्रस्तुत पुस्तकात लेखकाने केला आहे.

**11) R. L. Panigrah / Dasarathi Bhuyan, "Women Empowerment" Discovery Publishing House, New Delhi, Edition 2006.**

प्रस्तुत ग्रंथात लेखकाने देशातील एकूण लोकसंख्येपैकी निम्मी लोकसंख्या महिलांची आहे असे सांगून महिलांचा विकास झाल्याखेरीज देशाचा विकास अशक्य आहे हे स्पष्ट केले आहे. गेल्या कित्येक शतकांपासून भारतीय महिलांचा स्त्री–पुरुष भेदभाव, पिळवणूक व इतर अनेक कारणांनी छख केला जात होता. आत महिलांचा समाजातील सामाजिक व आर्थिक दर्जा सुधारावयाचा असेल तर त्यांच्यातील क्षमतेचा विकास करायला हवा त्यांना स्वयंपूर्ण बनवायला हवे. त्याचबरोबर त्यांच्या सबलीकरणासंबंधी आवश्यक कृतीकार्यक्रमांचे आयोजन केल्यास महिलांचा समाजातील दर्जा उंचावण्यास मदत होईल.

सदर पुस्तकाचा उद्देश देशाला महिला सबलीकरणाकरिता उत्साहवर्धक व कार्यप्रणव बनवणे हा आहे. महिला सबलीकरणाच्या प्रक्रियेला आधार मिळावा असा उद्देश सदर ग्रंथाचा आहे.

या पुस्तकातील ओरिसातील महिला सबलीकरण, भारतातील महिला सबलीकरण, २१ व्या शतकासाठी आव्हान, महिला सबलीकरण ऐतिहासिक संदर्भ, जागतिकीकरणाचा महिला सबलीकरणावरील प्रभाव, भारतीय राजकारणातील महिलांची भूमिका, महिला सबलीकरणासाठी कायदेशीर तरतुदी, भटक्या विमुक्त महिलांचे सबलीकरण, महिला सबलीकरण धोरण आणि राजकारण इत्यादी शोधनिबंध प्रस्तुत ग्रंथात समाविष्ट केले आहेत ते अभ्यासकांना अत्यंत उपयुक्त आहेत.

**१२)विकास समर्पित मासिक – 'योजना' – सप्टेंबर २०१६, भारत सरकार 'महिला सबलीकरण'**

विकास साध्य करण्यासाठी महिलांच्या सबलीकरणाइतके दुसरे प्रभावी साधन नाही. असे 'नारीशक्तीचे महत्त्व' म्हणून संपादकीय लेखात म्हटले आहे तसेच स्वतंत्र भारताच्या इतिहासात पहिल्यांदाच २०१५ साली प्रजासत्ताक दिनी लष्करी हवाईदल आणि नौदल या तीनही संरक्षण दलातील फक्त महिलांचा समावेश असलेल्या विशेष पथकाने राजपथावर दिमाखदार संचलन केले. 'महिलांचा विकास' यांच्यापुढे जाऊन 'महिलांच्या नेतृत्वाखालील विकास' हे धोरणाचे प्रतिक ठरले.

लीना नायर यांनी महिला सक्षमीकरण सरकारचा दृष्टिकोन या शिर्षकाखाली समीजात्मक लेखन केले आहे. त्यानुसार विविधांगी पण एकजिनसी लोकशाहीसाठी अनेक उपाययोजना केल्या आहेत त्यात पुरुषी

वर्चस्वाची मानसिकता बदलताना दिसत आहे. महिला सक्षमीकरण करण्यासाठी नवीन राष्ट्रीय महिला धोरण तयार केले जात आहे असे म्हटले आहे.

**मेरी इ जॉन यांनी विषम–लिंग–गुणोत्तर** :

'मानसिकता आणि शासकीय धोरण' असा वैचारिक लेख लिहिला आहे. यामध्ये लोकांची मानसिकता बदलण्यासाठी सर्वप्रथम जागरुकता निर्माण करण्याची आवश्यकता आहे असे म्हटले आहे.

'सेवा' – महिलांचे आर्थिक सबलीकरण या विषयी इला भट्ट यांनी लेखन केले आहे महिला सापेक्ष नेतृत्वाची आज खऱ्या अर्थाने सर्व जगालाच गरज आहे असे वर्तविले आहे. तर भारताच्या संदर्भात महिला सक्षमीकरण या विषयी कमला थसीन सक्षमीकरण ही गतिशील राजकीय प्रक्रिया असल्याचे म्हणतात. अरुणा असफ अली, सुचेता कृपलानी, कल्पना दत्ता, राणी गैदिनलिऊ, प्रीतिलता वड्डेदार अशा भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील रणरागिणीचाही उल्लेख केला गेला आहे.

'भारतीय स्वातंत्र्यलढ्यात स्त्रियांची भूमिका' असा डॉ. ज्योती अहवाल यांचा विशेष लेख प्रकाशित केला आहे. स्त्रियांच्या अनेकविध भूमिका यामधून देवकी जैन यांनी महिलाविषयक सामाजिक धोरणाची चर्चा केली आहे. त्याचबरोबर महिला सबलीकरण, विकास आणि उद्योजकता, महिलांचे हक्क आणि सबलीकरणाच्या योजना–उपाय यांचाही उल्लेख केलेला आहे. महाराष्ट्रातील महिला सबलीकरणाचाही मागोवा घेतला आहे.

**१३)मासिक – लोकराज्य, मार्च २०१७, महाराष्ट्र शासन.**

प्रस्तुत लोकराज्य अंक हा महिलाशक्ती विशेषांक म्हणून प्रकाशित केला आहे या अंकात कर्तृत्ववान महिलांच्या यशकथा, महिलांसाठीचे निर्णय, धोरण, उपयुक्त माहिती, बचतगट आदि माहितीचा समावेश केला आहे. सामर्थ्याची उमेद, आत्मविश्वासात वाढ, परिवर्तनासाठी सुसज्ज, सन्मान आणि समान वागणूक, प्रगतीची दशसूत्रे, स्वावलंबन आणि आत्मविश्वास, आम्ही सरस महिलांना खंबीर साथ, कर्तृत्वाचा ठसा अशा शीर्षकाखाली माहितीचे, अनुभवांचे विवेचन केले आहे.

## २.३ गत संशोधनाचा आढावा

**१) प्रा. पाटील उर्मिला बी. – ''स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय संसदेतील स्त्रियांचे प्रतिनिधित्व आणि भूमिका'' शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, १९९८.**

प्रा. उर्मिला पाटील यांनी एम. फील पदवीसाठी सादर केलेला हा अप्रकाशित शोधप्रबंध आहे. प्रस्तुत प्रबंधात त्यांनी भारतीय महिलांचा सामाजिक दर्जा, स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय स्त्रीचे संसदेतील प्रतिनिधित्व व भूमिका या दृष्टीने अभ्यास केला आहे.

**२) प्रा. उदगावे एस. ए. – ''आधुनिक महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणा चळवळीतील स्त्री–मुक्तीचा प्रश्न''. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, पीएच.डी. (राज्यशास्त्र) २००६.**

प्रा. उदगावे यांनी पीएच.डी.साठी सादर केलेला हा अप्रकाशित शोधप्रबंध आहे. प्रस्तुत शोधनिबंधात महाराष्ट्रातील स्त्रियांना सामाजिक चळवळी, महाराष्ट्राच्या राजकारणातील स्त्रियांचा सहभाग या दृष्टिकोनातून अभ्यास केला आहे.

वरील शोध प्रबंधाच्या अभ्यासाअंती असे दिसून येते की, 'लोकसभेतील महिला नेतृत्वाचा एक अभ्यास' या विषयाच्या संदर्भात वरील शोध प्रबंध व उपस्थित ग्रंथातून अभ्यास केल्याचे दिसून येत नाही. स्थानिक स्वराज्य संस्थेतील महिलांचा सहभाग त्यांचे प्रतिनिधित्व याचा सखोल अभ्यास झालेला दिसतो. तसेच विधानसभेच्या महिला प्रतिनिधीत्वाचा देखील अभ्यास झालेला दिसतो परंतु लोकसंभेच्या संदर्भात महिलांचे प्रतिनिधित्व अभ्यासलेले दिसत नाही.

## २.४ समारोप

प्रस्तुत संशोधनाशी संबंधीत असणाऱ्या संदर्भ साहित्याची माहिती व गत संशोधनाचा आढावा या प्रकरणात घेतला आहे. संशोधनाशी संबंधीत असणाऱ्या संकल्पना संदर्भ साहित्याचा आढवा घेतल्यामुळे स्पष्ट करता आल्या आहेत. मागिल झालेल्या संशोधनाची उद्दीष्टे व त्यातुन काढलेले निष्कर्ष या बाबतचा सविस्तर आढावा घेतल्यामुळे प्रस्तुत संशोधनातील वेगळेपण सिध्द करता आले आहे.

## संदर्भ सूची


१. भोळे भास्कर लक्ष्मण, जुन २००३, भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण पिपंळागुरे अँड कंपनी पब्लिशर्स, नागपूर.

२. आपटे ज. श., रोडे पुष्पा २०१२, 'भारतातील महिला विकासाची वाटचाल', डायमंड पब्लिकेशन, पुणे.

३. कवी माधवी १९९९ 'महिला कल्याण आणि विकास' विद्या प्रकाशन, नागपूर.

४. मुळे अंजली, गीताली वि. म. २००१ स्त्री चळवळ आणि राजकारण – समतेसाठी सत्तासंघर्ष, लोकवाङ्मय गृह, मुंबई.

५. खेकाळे नारायण रा., १९९९ 'राजकीय नेतृत्व' श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.

६. पवार प्रकाश, २०१४ भारतीय राजकारण आणि नेतृत्वाची वाटचाल राजकारण, धुरिणत्व वर्चस्व.

७. पवार वैशाली, २०१२ महिलांच्या सत्तासंघर्षाचा आलेख, डायमंड, पब्लिकेशन, पुणे.
८. पाटील भारती, १९९८ 'स्त्रियांचा सत्तेतील सहभाग – सबलीकरणाच्या प्रक्रियेतील महत्त्वाचा टप्पा, समाजप्रबोधिनी प्रकाशन इचलकरंजी.
९. सुधारणी श्रीवास्तव, २००६ भारत महिलाओंकी वैधानिक स्थिती, कॉमन वेल्थ पब्लिशर्स, नवी दिल्ली.
10. M. R. Biju 'Womens Empowerment Polities and Policies Mittal Pulications, New Delhi 2006
11. R. I. Panigrah / Dasarathi, Bhuyan, 2006 and 'Women Empowerment' Discovery Publising House, New Delhi.
१२. पाटील उर्मिला बी – १९९८ स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय संसदेतील स्त्रियांचे प्रतिनिधित्व आणि भूमिका शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
१३. विकास समर्पित मासिक – 'योजना' सप्टेंबर २०१६, भारत सरकार, 'सबलीकरण'.
१४. मासिक – लोकराज्य, मार्च २०१७, महाराष्ट्र शासन.
१५. उद्गावे एस. ए. – २००६, आधुनिक महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणा चळवळीतील स्त्री–मुक्तीचा प्रश्न शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर पी.एच.डी. (राज्यशास्त्र)

# प्रकरण तिसरे

# संशोधन कार्यपद्धती

## ३.१ प्रस्तावना :

भारतीय संस्कृतीमध्ये नारी शक्तीची संकल्पना पूरातन काळापासून अस्तित्वात आहे. भारतात अनादीकाळापासून देवीच्या विविध रुपांची उपासन करण्याची पद्धत आहे. पूर्व भारतात काली, म्हैसासूर मर्दिनी आणि केरळमध्ये भागवती यासारख्या विविध रुपात देशभरात देवीची उपासना करण्यात येते. शक्तीच रुप म्हणून देवीची उपासना आणि आराधना करण्यात येते.

परंतु ही नाण्याची एक बाजू आहे. दुसऱ्या बाजूला महिलांना त्यांच्या जीवनात आणि कुटुंबात मत व्यक्त करण्याच स्वातंत्र्यपण दिले जात नाही. त्याचं जीवन हे पुरुषांच्या अधीन असते. त्यांच्या आशा–आकांक्षा, इच्छांना महत्त्व दिले जात नाही. मुलगी पत्नी, आणि मातृत्वाची जबाबदारी निभावण्यातच महिलांचे आयुष्य संपते.[१]

त्याचप्रमाणे भारताच्या राजकारणात महिलांचे नेतृत्व, राजकीय सहभाग अल्पस्वरुपाचा राहिला आहे. १९७० नंतर महिलांचा हा राजकीय सहभाग वाढलेला दिसतो. लोकसभा, राज्यसभा, विधानसभा, विधान परिषद, स्थानिक शासन संस्था, महिला संघटन, महिला बचत गट, अशा विविध पातळ्यावर महिलांचा सहभाग आहे. सत्ता, संपत्ती, अधिकार प्रतिष्ठा मिळविण्यासाठी महिलावर्गाचे संघटन केले जाते.

भारतात एकूण लोकसंख्येच्या ५० टक्के महिला आहेत. महिलांच्या विकासाशिवाय देशाचा विकास अशक्य आहे. महिलांना सक्षम करण्यासाठी बहुपदरी योजनाची आवश्यकता तर आहेच मात्र महिलांचा राजकीय व्यवस्थेतील सहभाग हा तितकाच महत्त्वाचा आहे.

एकोणिसाव्या शतकामध्ये महिला राजकीय व्यवस्थेमध्ये सहभागी होत नव्हत्या. महात्मा फुले यांनी महिलांचे सार्वजनिक पातळीवरील राजकारण उभे केले. त्यानंतर अखिल भारतीय काँग्रेस पक्षामध्ये महिलांनी सहभाग घेतला. परंतु कार्यक्रमाची शोभा वाढविण्यापलिकडे कोणतेही कार्य महिलांकडे नव्हते. १८८९ च्या काँग्रेस अधिवेशनामध्ये केवळ १० महिला सहभागी होत्या. त्यानंतर रमाबाई रानडे यांनी सामाजिक परिषदेच्या माध्यमातून स्त्रियांची सर्वांगीण प्रगती व सामाजिक सुधारणा करण्याचा प्रयत्न केला. महिला सामाजिक कार्यात सहभागी होत्या परंतु राजकारणात मात्र सहभाग घेत नव्हत्या. महात्मा गांधीच्या काळात महिलाचा राजकीय सहभाग वाढला परंतु त्यांची राजकीय भूमिका दुय्यम होती. भारत स्वतंत्र झाल्यापासून आजपर्यंत महिलांचे स्वतंत्रपणे राजकारण उभे राहिलेले नाही. सध्यास्थितीत स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये महिलांना ५० टक्के आरक्षण दिल्यामुळे महिलांचा राजकीय प्रक्रियेतील सहभाग वाढत आहे मात्र तो केंद्र स्तरावर लोकसभेमध्ये वाढत असताना दिसत नाही. तो कितीपर्यंत आहे तसेच स्थानिक स्वराज्य

संस्थामधून घडलेले नेतृत्व लोकसभा पातळीवरती गेले की नाही याचा शोध संशोधनातून घेण्यात येणार आहे. तसेच महिलांचा राजकीय सहभाग वाढविण्यासाठी काही शिफारशी, उपाययोजना सांगितल्या आहे.

## ३.२ संशोधन प्रश्न :

७३ व ७४ च्या घटनादुरुस्तीनंतर महिलांचा देशपातळीवरील राजकारणातील सहभाग वाढला महिला या घटकाला राजकीय सत्तेमध्ये किती वाटा मिळाला हा प्रश्न निर्माण होतो. स्थानिक संस्थांमध्ये महिलांसाठी राखीव जागा असल्यामुळे महिलांचा सहभाग वाढला व सत्तादेखील मिळाली. या पातळीवर लोकशाहीचा विस्तार झाला. या घटनेचा परिणाम लोकसभा पातळीवर कोणता झाला या मुद्द्यांचा अभ्यास झाला नाही त्यामुळे लोकसभा पातळीवर महिला नेतृत्वाचा विकास झाला की नाही हे समजत नाही. तसेच लोकसभा पातळीवर राजकीय सत्ता महिला घटकाकडे सरकली की नाही हा मुद्दाही समजत नाही. ही मुख्य संशोधन समस्या किंवा प्रश्न आहे. या समस्येच्या पुढील प्रश्न उपस्थित होतात.

१. लोकसभा पातळीवरील महिला कोणत्या घटकाराज्यातून कोणत्याही मतदार संघातून निवडून येतात.
२. महिला निवडून आलेल्या मतदार संघावर त्यांचे नियंत्रण आहे की राजकीय पक्षाचे नियंत्रण आहे.
३. निवडून आलेल्या कोणत्याही सामाजिक व आर्थिक पार्श्वभूमी असलेल्या निवडून आल्या आहेत.
४. लोकसभा मतदार संघातून निवडून आलेल्या महिलांना राजकीय सत्तेत वाटा किती मिळाला या समस्येच्या संदर्भात या प्रकल्पात अभ्यास केला आहे.

## ३.३ संशोधन विषयाचे महत्त्व :

भारताच्या लोकसंख्येत साधारणतः निम्मी संख्या महिलांची आहे. गेल्या काही वर्षापासून सार्वजनिक जीवनात, कार्यालयात, आंतरराष्ट्रीय क्रीडा क्षेत्रात, सरकारी कार्यालयात, राजकारणात, आंतरराष्ट्रीय संस्थात आणि अशा अनेक ठिकाणी महिलांचा वावर वाढला आहे. हा बदल सकारात्मक असून आधीपेक्षा हा बदल आता झपाट्याने घडत आहे.

शालेय शिक्षणात मुलगा आणि मुलगी असा भेदभाव  ठेवता त्यात समानता आणण्यात भारताना यश मिळाले आहे. वैद्यकीय, विधी, माहिती तंत्रज्ञान, अभियांत्रिकी, व्यवस्थापन यासारख्या तंत्र–शिक्षण आणि व्यावसायिक शिक्षणातही महिला प्रतिनिधित्वात लक्षणीय वाढ दिसत आहे. महिला साक्षरतेतही वाढ झाली असून १९५१ मधल्या केवळ ९% महिला साक्षरतेवरुन २०११ मध्ये हे प्रमाण ६५% झाले आहे. परिस्थितीत बदल घडवून आणणारा हा मोठा घटक आहे.

भारतात कामाच्या ठिकाणी प्रत्येक चौथा कामगार एक महिला असते. अधिक तंत्रविषयक आणि गुंतागुंतीचे काम असेल तर तिथे आपल्याला महिलांची संख्या नक्कीच जास्त आढळेल. अभियंत्यापैकी एक

तृतीयांश महिला आहेत तर प्राथमिक स्तरावर काम करणाऱ्या आरोग्य सेवकांपैकी तीन चतुर्थांश महिला आहेत. वैद्यकिय संशोधक, बँक कर्मचारी, माहिती तंत्रज्ञान कर्मचारी, सनदी लेखापालांपैकी सुमारे एक तृतीयांश महिला राहतील असा अंदाज आहे. देशात उद्योजकतेला मोठा वाव मिळत असून सध्या प्रत्येक पाचवी महिला ही उद्योजक आहे.

राजकारणातही महिलांची आकडेवारी आधिपेक्षा नक्कीच उत्साहवर्धक आहे. पंचायत सदस्यापैकी सुमारे ४६% सदस्य लोकनियुक्त महिला प्रतिनिधी आहेत. याबरोबरच गाव पातळीवर १.३ दशलक्षपेक्षा जास्त महिला सत्ता स्थानी आहेत, गाव–खेड्यापासून आपल्या देशाचे चित्र बदलत आहे. उदा.१९५७ मध्ये, केवळ ४५ महिलांनी निवडणूक लढवली होती तर २०१४ च्या निवडणुकीत ६६८ महिला निवडणुकीच्या रिंगणात होत्या.

आरोग्याच्या आघाडीवरही सुधारणा दिसून येत आहे. १९५०–५१ मध्ये महिलांचे साधारणतः आयुष्यमान ३१.७ वर्षे असे. २०१६ मध्ये हे प्रमाण सुमारे ७० वर्षे झाले आहे. प्रसूतीसाठी घरी राहण्यापेक्षा रुग्णालयात दाखल होण्याकडे कल मोठ्या प्रमाणात वाढला असून २०१४–१५ मध्ये दवाखान्यात प्रसूतीसाठी दाखल होणाऱ्या महिलांचे प्रमाण ७९% असे आतापर्यंतचे सर्वोच्च होते. बालक आणि मातेच्या आरोग्याच्या दृष्टीने हे चांगले आहे. २००१–०३ ते २०११–१३ या काळात प्रसूती दरम्यान माता मृत्यूचे प्रमाण निम्म्याने कमी झाले. गेल्या काही वर्षात महिलांच्या वित्तीय समावेशकतेत लक्षणीय वाढ झाली आहे. स्वतःच्या बँक खात्याच्या व्यवहार स्वतःच करणाऱ्या बँक किंवा बचत खातेधारी महिलांच्या सख्येत वाढ झाली असून २००५–०६ मध्ये १५% नसणारी ही संख्या २०१५–१६ मध्ये ५३% वर पोहोचली होती.

ही सकारात्मक आकडेवारी असूनही आपल्या देशात दुर्दैवाने महिलांना जीविताला धोका असणाऱ्या परिस्थितीचा सामना करावा लागत आहे. महिलाप्रती हिंसाचाराच्या अनेक भयावह घटना आपण ऐकतो, त्याचवेळी अनेक मुली भावंडांचा सांभाळ करण्यासाठी शाळा सोडत आहेत अथवा लग्नामुळे शाळा सोडत आहेत. घरात आणि शेतात अशा दोन्ही ठिकाणी, मोबदला मिळत नाही अशा कामामध्ये महिलांचे अद्यापही मोठे प्रमाण आहे. आपल्या आर्थिक बाबीवर अधिक नियंत्रण असूनही घरात अथवा कार्यालयीन निर्णयात, त्यांना बरोबरीची संधी अनेकदा दिली जात नाही. अगदी आताच्या काळतही हे जीवनाचे प्रखर वास्तव आहे. भारतीय महिलांचे खरेखुरे सबलीकरण हवे असेल तर महिलांप्रती सुरु असलेला हा भेदभाव आणि हिंसाचाराची दखल घेऊन त्या संदर्भात कृतीही हवी.

महिलांच्या विकासासाठी सुरक्षित आणि प्रोत्साहनदायी वातावरणाबरोबरच त्यांना समान संधी मिळावी यासाठी सरकारने अनेक उपाययोजना केल्या आहेत. शिक्षण आणि कामाच्या ठिकाणी महिलांना प्रोत्साहन देण्यासाठी, त्यांचे शारीरिक आणि मानसिक आरोग्य राखण्यासाठी, सार्वजनिक आणि राजकीय

सहभागाला प्रोत्साहन देण्यासाठी, त्यांना कुटुंबात आणि इतरत्र समान वागणूक मिळावी. यासाठी अनेक कायदे संमत करण्यात आले असून अनेक योजनांची अंमलबजावणी करण्यात आली आहे.

समस्येच्या मुळावरच घाव घालण्यासाठी मानसिकतेशी निगडित गुंतागुंतीच्या समस्येशी निगडित सरकारने 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' अभियान सुरू केले आहे. महिला आणि मुलीप्रती, समाजाने आपली मानसिकता बदलली नाही तर महिला सबलीकरणाच्या इतर उपक्रमात शाश्वत यश पहायला मिळणार नाही.
या अभियानाबरोबरच २०१५ मध्ये सुकन्या समृद्धी योजना सुरू करण्यात आली. या योजनेअंतर्गत मूलींच्या बँक खात्यात अल्प रक्कम जमा करता येते, त्यावर उच्च व्याज दराचा लाभ मिळतो. मुलीला १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर ही रक्कम काढता येते. मुलीच्या उच्च शिक्षणासाठी किंवा इतर गुंतवणुकीसाठी याचा वापर करता येतो. १.३९ कोटी खाती आतापर्यंत उघडण्यात आली असून त्यात एकूण २५,९७९ कोटी रुपये रक्कम जमा आहे.

महिलांच्या सबलीकरणामध्ये आर्थिक सबलीकरण केंद्र स्थानी आहे आणि वित्तीय समावेशकता हा त्याचा महत्त्वाचा भाग आहे. काही वर्षापूर्वी बँक खाते उघडणे हे निरस काम होते. बँकिंग व्यवहाराशी आतापर्यंत जे लोक जोडले गेले नव्हते त्यांना सुकन्या समृद्धी योजना आणि पंतप्रधान जन धन योजनेमार्फत बँकिंग सेवा कक्षेत आणण्यात आले. जन धन योजनेअंतर्गत १६.४२ कोटी महिलांची खाती उघडण्यात आली. सर्वोच्च ४.४० बँकाकडून आणि प्रादेशिक ग्रामीण बँकाकडून प्राप्त आकडेवारीनुसार एकूण बचत खात्यातला महिलांचा वाटा वाढला असून २०१४ मध्ये हा वाटा २८% होता त्यात वाढ होऊन २०१७ मध्ये तो ४०% झाला आहे. महिलांच्या वित्तीय समावेशकतेची ही वाढ आहे.

महिला मनुष्य बळाच्या क्षमता वृद्धिंगत करण्यासाठी कौशल्य विकास हा आणखी एक महत्त्वाचा घटक आहे. प्रधानमंत्री कौशल्य विकास योजनेअंतर्गत उद्योग जगताशी संबंधित कौशल्य विकास प्रशिक्षण भारतीय युवकांनी मोठ्या प्रमाणात घेतले. आतापर्यंत देण्यात आलेल्या प्रमाणपत्रात निम्मी संख्या महिला प्रमाणपत्र धारकांची होती.

महिला कर्मचाऱ्यांनी कार्यालयीन काम सुरू ठेवावे यासाठी या महिला कर्मचाऱ्यांना प्रसूती पगारी रजा २६ आठवडयांपर्यंत करण्यासाठी प्रसूती लाभ कायद्यात सुधारणा करण्यात आली. प्रसूती काळामुळे नोकरी अथवा पगार गमवण्याची महिला कर्मचाऱ्यांची भिती नाहिशी होऊन बालकाला स्तनपान देण्यासाठी त्यांना वेळ मिळू लागला आहे.

असंघटित क्षेत्रातल्या गरोदर आणि स्तनदा मातांसाठीही प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेअंतर्गत रक्कम देण्यात येते. पगाराची अंशतः नुकसान भरपाई म्हणून महिलांना ६००० रुपये देण्यात येतात. यामुळे त्यांना प्रसूतीनंतर पुरेसा आराम मिळण्याबरोबरच बालकाला स्तनपान देता येते. या योजनेअंतर्गत ३८ लाख लाभार्थ्यांनी नोंदणी केली आहे.

संस्था महिलांसाठी अनुकूल राहव्यात या दृष्टीने पात्र महिलांची उच्च स्थानी नेमणूक करणे हे सकारात्मक पाऊल आहे. सर्व सार्वजनिक आणि खासगी कंपन्यात संचालक मंडळात आणि उच्च स्थानी महिला प्रतिनिधित्वाला प्रोत्साहन देण्यात येत आहे. कंपन्यामध्ये पाच लाखाहून अधिक महिला संचालकांची नियुक्ती करण्यात आली असून भारतातली ही आतापर्यंतची सर्वोच्च संख्या आहे.

ग्राम स्तरावर पंचायत महिला सदस्य आपल्या गावाच्या सक्षमतेमध्ये आघाडीची भूमिका बजावत आहेत. त्यांना पंचायत संबंधी आपली जबाबदारी आणि कर्तव्ये चोख बजावता यावीत या दृष्टीने आणि प्रक्रियेला मदत यासाठी महिला आणि बाल विकास मंत्रालयाने २०१७ या वर्षी १८,००० महिला सदस्यांसाठी प्रशिक्षण आयोजित केले होते. महिलांचे नेतृत्व गुण आणि व्यवस्थापकीय कौशल्य विकसित व्हावे य हेतुने २०१८ या वर्षी आणखी १३,००० महिलांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

महिलांनी कार्यालयीन कामकाजात सक्रिय रहावे यासाठी कार्यालयीन ठिकाणी महिला कर्मचाऱ्यांसाठी वातावरण पोषक असण्याची गरज आहे. यासाठी कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंधक मनाई आणि निवारण) कायदा, २०१३ या कायद्याची कडक अंमलबजावणी करण्यात येत आहे. त्यामुळे पूर्ण वेळ, अर्धवेळ, खासगी आणि सार्वजनिक क्षेत्र तसेच संघटित आणि असंघटित क्षेत्रातल्या आणि घरकामासाठीच्या महिला, विद्यार्थी, प्रशिक्षणार्थी आणि कार्यालयाला भेट देणाऱ्या अशा सर्व महिलांना सुरक्षित वातावरण मिळते.

कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळाच्या तक्रारी दाखल करण्यासाठी सध्यस्थितीत ऑनलाईन तक्रार यंत्रणा स्थापन केली आहे. यामुळे संबंधित महिलेला सुलभपणे तक्रार दाखल करता येते आणि त्या तक्रारी बाबतच्या कार्यवाहीचा मागोवाही घेता येतो.

महिला सबलीकरणातला महत्त्वाचा आणखी एक घटक म्हणजे सुरक्षितता. महिलांसाठी सुरक्षित वातावरण राहिल्यास त्या अर्थव्यवस्थेशी संबंधित कार्यात आणि सार्वजनिक जीवनात संपूर्णतः सहभागी होऊ शकतात. हे लक्षात घेऊन सरकारने ३१ राज्ये आणि केंद्र शासित प्रदेशात १८१ महिला हेल्प लाईनला मंजूरी दिली असून २०६ वन स्टॉप सेंटर कार्यान्वित करण्यात आली असून यांच्या मदतीने, अत्याचारग्रस्त महिलेला जलद आणि सुलभ मदत मिळू शकते. पोलीस दलात महिलांना ३३% आरक्षणाची अंमलबजावणीही करण्यात येत आहे. अडचणीत सापडलेल्या महिलांना तातडीने मदत पुरवण्याच्या दृष्टीने सर्व मोबाईल फोनमध्ये पॅनिक बटण लवकरच पुरवण्यात येणार आहे. देशातील आठ महत्त्वाची शहरे महिलांसाठी सुरक्षित राहण्याच्या दृष्टीने आणि लैंगिक अत्याचाराच्या प्रकरणात न्यायवैद्यक परिक्षण क्षमता वृद्धिंगत करण्यासाठी सर्वंकष आराखडा अंमलात आणण्यासाठी निर्भया निधीचा उपयोग केला जात आहे. या सर्व उपाय योजनांसह महिला सबलीकरणासाठी आणखीही इतर पाऊले उचलण्यात आली आहेत महिला सबलीकरणासाठी सरकार अनेक योजनाही राबवत आहे. मात्र दुर्गम आणि मागास भागातल्या लाभार्थीपर्यंत

या योजना नेहमीच पोहोचतात असे नाही. या समस्येवर मात करण्यासाठी आणि अशा महिलांपर्यंत पोहोचण्यासाठी महिला आणि बालविकास मंत्रालयाने नुकतीच महिला शक्ती केंद्र योजना सुरू केली आहे. या योजनेअंतर्गत ३ लाख विद्यार्थी स्वयंसेवक, महिला सबलीकरणासाठीच्या सरकारच्या योजना आणि सेवा घेऊन देशभरातल्या ग्राम स्तरातल्या या महिलांपर्यंत थेट पोहोचणार आहेत.

सबलीकरण म्हणजे केवळ महिलांचा विकास साध्य करायचा नसतो तर महिलांच्या नेतृत्वाखाली विकासाच्या मार्गाकडे मार्गक्रमण करायचे असते. महिलांच्या नेतृत्वाखालील विकास साध्य करणे हे सरकारचे ध्येय असावे. तसेच तोच सरकारच्या धोरणाचा पाया असावा. त्याद्वारे भारतीय महिलांचे अधिक उज्ज्वल भविष्य घडेल. सबलीकरणासाठी, प्रोत्साहनदायी आणि सुरक्षित वातावरणाची महिलांना आवश्यकता असते. त्यांना जीवनात भय मुक्त वातावरण मिळायला हवे तर त्यांना जखडून ठेवणारे बंधन नसावेत. याच महिलांना बाकी सर्वांबरोबर एका स्तरावर आणणाऱ्या सकारात्मक धोरणाला चालना देण्याची आवश्यकता आहे. योग्य संधी मिळाल्यास भारतीय स्त्रियांची अपार क्षमता दिसून येते. डेमोग्राफीक डिव्हीडंडचा भारत, लाभ घेऊ इच्छित आहे. अशा वेळी सक्षम महिलांची भूमिका अधिकच महत्त्वाची ठरते. शिक्षण आणि उत्पादक रोजगाराद्वारे, महिलांनी सार्वजनिक जीवनात अधिक सक्रिय व्हावे आणि राष्ट्र उभारणीच्या कार्यात अधिक योगदान द्यावे. त्यासाठी महिलांचे लोकसभेत प्रतिनिधित्व असणे गरजेचे आहे. [२]

प्रस्तुत अभ्यासामुळे महिलांचे राजकीय स्थान, महिलांचा सहभाग, महिलांचे लोकसभेतील प्रतिनिधीत्व, महिलांचा निर्णय निर्धारण प्रक्रियेतील सहभाग इ. गोष्टींचा उलगडा होणार आहे.

## ३.४ संशोधन विषयातील पारिभाषिक संज्ञा :

**लोकसभा** :

भारतीय संसदेचे एक सभागृह. एक प्रतिनिधी मतदार संघातून भौगोलिक प्रतिनिधीत्वाच्या तत्त्वानुसार सभासद पाच वर्षासाठी निवडले जातात. ५४५ सभासद निवडण्याची तरतूद आहे. (त्याखेरीज अंग्लो इंडियन समाजाचे दोन सभासद राष्ट्रपतींनी नियुक्त करण्याची तरतूद आहे.) किमान पंचवीस वर्षे वय असणाऱ्या व्यक्ती निवडून येण्यास पात्र असतात.

राज्यसभेच्या तुलनेत लोकसभेला काही प्रमाणात जास्त / महत्त्वाचे अधिकार आहेत. अर्थविधेयक प्रथम लोकसभेतच मांडावे लागते. राज्यसभा ते नामंजूर करु शकत नाही. मंत्रिमंडळ लोकसभेला जबाबदार असते. त्यामुळे कार्यकारी मंडळावर आणि अर्थव्यवहारांवर लोकसभेचे अंतिम नियंत्रण असते.[३]

**नेतृत्व** :

परंपरागत पद्धतीनुसार नेतृत्व ही संकल्पना महान मानव, हिरो किंवा बुद्धिजीवी नेतृत्व अशा प्रतिकांमध्ये बंदिस्त होती. परंपरागत नेतृत्वाच्या या संकल्पनेमध्ये राजे, महाराजे, सरदार आणि वतनदार

यांचा समावेश होतो. यामध्ये केवळ सत्ताधारी एवढाच मर्यादित अर्थ आहे. या नेतृत्वात सर्वांच्या वतीने प्रतिनिधित्व करणे, हा अर्थ समाविष्ट नाही नेतृत्वाच्या या संकल्पनेपेक्षा आधुनिक लोकशाहीतील नेतृत्वाची संकल्पना भिन्न आहे. कारण आधुनिक लोकशाहीत नेतृत्व प्रतिनिधित्व करत असते. आधुनिक लोकशाहीमध्ये नेतृत्वाला बंदिस्त चौकटीतून बाहेर काढले गेले. त्यामुळे पुन्हा नेतृत्व आणि प्रतिनिधित्व या संकल्पनाच्या भोवती राजकीय चर्चाविश्व उभारले गेले. नेतृत्व आणि प्रतिनिधित्वाची संकल्पनांच्या भोवती राजकीय चर्चाविश्व उभारले गेले. नेतृत्व आणि प्रतिनिधित्वाची संकल्पना परस्परांशी संबंधित आहे. या मुद्द्यांपासूनच भारतात इतर संबंधित मुद्द्यांचा आरंभ झाला. लोकशाहीने सर्वसामान्य नागरिकांना नेतृत्व करण्याचा अधिकार दिला. [४]

## ३.५ संशोधनाची उद्दिष्टे :

१. २००४ नंतर लोकसभा पातळीवर महिला नेतृत्वामध्ये कोणता बदल घडून आला.

२. लोकसभा पातळीवर महिलांना सत्ता, अधिकार, प्रतिष्ठा मिळाली की नाही.

३. महिला हा वर्ग सलग नाही या वर्गामध्ये उच्चजाती, प्रभुत्वशाली जाती, ओबीसी, अनुसुचित जाती जमाती असे सामाजिक स्तर आहेत. या प्रत्येक सत्ता अधिकार प्रतिष्ठा कशी विस्तारली या मुद्द्यांचा तुलनात्मक अभ्यास करणे हे या अभ्यासाची उद्दिष्टे आहेत.

## ३.६ संशोधनाची गृहितके :

आपल्या देशात एकूण लोकसंख्येच्या बाबतीत जवळपास निम्मी लोकसंख्या ही महिलांची आहे. त्या दृष्टीने पुरुषाच्या तुलनेने स्त्रीचाच राजकीय प्रक्रियेतील सहभाग अत्यंत कमी दिसून आली ज्या गृहात लोकांचे प्रश्न मांडले जातात. त्या लोकसभेत महिलांचे प्रमाण खूप कमी आहे. त्यामुळे महिलांचे पुरुषाच्या तुलनेत विशेष नेतृत्व घडत असताना दिसत नाही. परंपरेमुळे व मानसशास्त्रीयदृष्ट्या स्त्री राजकारणापासून उदासिन राहते त्यांची कुटुंबाप्रती असलेली जबाबदारी या व अनेक बाबी स्त्रियांच्या राजकीय सहभागातील की प्रमाणात कारणीभूत ठरतात. या पार्श्वभूमीवर लोकसभेतील महिला नेतृत्वाचा संशोधनात्मक अभ्यास करण्यासाठी पुढील गृहितके निर्धारित केली आहेत.

१) भारतीय राजकीय व्यवस्थेत लोकसभेत महिलांचे नेतृत्व राजकीय सहभाग अल्प स्वरुपाचा राहिला आहे.

२) महिलांचे राजकीय प्रक्रियेतील स्थान नगण्य दिसते महत्त्वाच्या निर्णय निर्धारण व्यवस्थेत त्याचे प्रमाण कमी आहे. त्यांना राजकीय सत्ता कमी प्रमाणात मिळाली आहे.

३) महिला आरक्षणामुळे स्थानिक स्वराज्यमधून घडलेल्या नेतृत्वाचे समावेशन लोकसभा पातळीवरती झालेले नाही.

वरील गृहितकांची सत्यता शोधण्यासाठी संशोधकाने वर्णनात्मक आराखड्याचा उपयोग केला आहे.

## ३.७ संशोधन पद्धती :

प्रस्तुत अभ्यासासाठी आंतरविद्याशाखीय व तुलनात्मक अभ्यास पद्धती वापरली आहे. १५६ महिलांचा वयोग, शिक्षण, जात, धर्म, मतदार संघ, घटकराज्य, व्यवसाय, राजकीय पार्श्वभूमी, सत्तेतील सहभाग या मुद्द्यांच्याआधारे माहिती गोळा केली आहे. लोकसभेमध्ये निवडून आलेल्या या महिलांच्या संदर्भात ही माहिती गोळा केली आहे.

यासाठी खासदारांची परिचय पुस्तके, २००४ ते २०१४ निवडणूक आयोगाच्या वेबसाईटवरील मतदार संघ व त्यांना मिळालेली मतदान ही माहिती घेतली आहे तसेच पक्ष कार्यालयातून माहिती गोळा केली आहे. महाराष्ट्रातील काही महिलांच्या मुलाखती घेतल्या आहेत.[५]

## ३.८ तथ्य संकलनाची साधने

अभ्यासासाठी माहिती गोळा करताना तथ्य संकलनाची साधने पुढील २ स्त्रोतांचा वापर केला आहे.

१. **प्राथमिक स्त्रोत** :

प्राथमिक स्वरुपाच्या माहितीसाठी सर्वसमावेशक आणि विस्तृत अशा प्रश्नावलीचा वापर केला आहे ज्याचप्रमाणे मुलाखत आणि प्रत्यक्ष निरिक्षणाद्वारे माहिती गोळा केली आहे.

२. **द्वितीय स्त्रोत** :

प्रस्तुत विषयाच्या संशोधनासाठी आवश्यक असणारी माहिती प्राप्त करण्यासाठी द्वितीय स्त्रोताचा देखील वापर केला आहे. ही माहिती प्रामुख्याने संदर्भ पुस्तके, विविध अहवाल, वेबसाईट, शासकीय प्रशासने, रेकॉर्ड, द्वितीय स्त्रोताद्वारे उपलब्ध झाली आहे. याखेरीज विविध प्रकारच्या सांख्यिकी माहितीचे संकलन शासकीय दप्तरातून उपलब्ध केली आहे. [६]

## ३.९ संशोधन अध्ययनाची व्याप्ती :

२००४ ते २०१४ म्हणजेच या कालावधीत लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकींचा अभ्यास केला आहे. लोकसभेमध्ये निवडून आलेल्या महिलांचा अभ्यास केला आहे.

## ३.१० संशोधनाच्या मर्यादा :

१. प्रस्तुत अभ्यासासाठी कालावधी २००४ ते २०१४ या १५ वर्षाचा निर्धारित केला आहे.

२. संपूर्ण भारतातील महिला खासदार यांच्या मुलाखती घेता आल्या नाहीत.

## ३.११ प्रकरणांची योजना :

प्रकरण १ : प्रास्ताविक

प्रकरण २ : संदर्भ साहित्याचा आढावा

प्रकरण ३ : संशोधन कार्यपद्धती

प्रकरण ४ : माहितीचे संकलन आणि विश्लेषण

प्रकरण ५ : सारांश निष्कर्ष आणि शिफारशी

## संदर्भ सूची :


१. “योजना ” विकास समर्पित मासिक, महाराष्ट्र शासन, माहिती व प्रसारण मंत्रालय, प्रकाशन विभाग, ऑक्टोबर २०१८– महिला नेतृत्वाखालील विकासाव्दारे राष्ट्राची सक्षमीकरण, पान नं. ४

२. “योजना ” विकास समर्पित मासिक, महाराष्ट्र शासन, माहिती व प्रसारण मंत्रालय, प्रकाशन विभाग, ऑक्टोबर २०१८– महिला नेतृत्वाखालील विकासाव्दारे राष्ट्राची सक्षमीकरण, पान नं. १३–१७

३. व्होरा राजेंद्र / पळशीकर सुहास, १९८७, राज्यशास्त्र कोश, दास्ताने राजेंद्र कंपनी, पुणे.

४. पवार प्रकाश, भारतीय राजकारण आणि नेतृत्वाची वाटचला, राजकीय धुरिणत्व वर्चस्व, डायमंड पब्लिकेशन, पुणे, पान नं. १७

५. आगलावे प्रदिप, २०१०, सामाजिक संशोधन पद्धती विद्या बुक, प्रकाशन, औरंगाबाद.

६. प्राचार्य मेश्राम सुरेश स., सामाजिक संशोधन पद्धती कृष्णचंद्र एजन्सी, नागपूर.

# प्रकरण ४ थे

# तथ्य विश्लेषण आणि अर्थनिर्वचन

## लोकसभेतील महिला नेतृत्वाच्या अभ्यासाचे विश्लेषण – २००४ ते २०१४.

२००४ च्या लोकमत निवडणुकीमध्ये एकूण २८ घटकराज्ये व ७ केंद्रशासित प्रदेशापैकी अठरा घटक राज्ये व १ केंद्रशासित प्रदेशातून ४५ महिला निवडून आल्या होत्या. सर्वाधिक सात महिला खासदार या उत्तर प्रदेश या राज्यातून निवडून आल्या होत्या. त्या खालोखाल पाच महिला या महाराष्ट्रातून निवडून आल्या होत्या. तामिळनाडू व पश्चिम बंगालमधून चार महिला निवडून आल्या होत्या. तसेच आंध्रप्रदेश बिहारमधून प्रत्येकी दोन महिला निवडून आल्या तर कर्नाटक, केरळ, मध्यप्रदेश, ओरीसा, राजस्थान व पंजाब मधून केवळ दोन महिला निवडल्या गेल्या होत्या. गुजरात, हरियाणा, हिमाचल प्रदेश, जम्मू काश्मिर, छत्तीसगड व झारखंड मधून प्रत्येकी एकच महिला निवडून आल्याचे दिसते. एकूण अठरा घटकराज्यातून केवळ ४४ महिला खासदास आल्या होत्या हे प्रमाण खूपच कमी असल्याचे दिसून येते. बाकी १० घटकराज्यांत तर महिलांना लोकसभेत स्थान असल्याचे दिसून येत नाही. लोकशाही प्रधान राष्ट्रात अशी परिस्थिती असणे म्हणजे महिलांचे दुय्यमत्त्व अजून नाकारलेले दिसत नाही.

केंद्र शासीत प्रदेशाबाबतही अजून दयनीय अवस्था असल्याचे दिसते. ७ केंद्रशासित प्रदेशांपैकी केवळ एका दिल्ली याप्रदेशातूनच एक महिला निवडून आल्या आहेत. बाकी ६ केंद्रशासित प्रदेशात महिला लोकसभेवर निवडून गेल्याचे दिसत नाही.

२००४ च्या प्रमाणेच २००९ च्या लोकसभा निवडणुकीचा विचार असता राज्यनिहाय महिला सदस्यामध्ये एकूण २८ घटक राज्ये व ७ केंद्रशासित प्रदेशांपैकी केवळ १५ घटकराज्ये व १ केंद्रशासित प्रदेशामधून महिला निवडून आल्याचे दिसते. बाकी १३ घटकराज्यात व ६ केंद्रशासित प्रदेशामध्ये महिला सदस्यांना वाव असताना दिसतच नाही. हे प्रमाण मागील २००४ च्या तुलनेने आणखीच कमी झाल्याचे दिसते. प्रदेशनिहाय निवडून येण्याचे प्रमाण कमी झाले आहे. मात्र तुलनात्मक महिला खासदाराची संख्या वाढलेली दिसते. २००४ मध्ये ४५ महिला निवडून आल्या होत्या. मात्र २००९ च्या निवडणुकीत त्यात वाढ झालेली दिसते. एकूण ५९ महिला निवडून आल्या होत्या. १४ महिला खासदारांची वाढ झालेली होती. ही वाढ ३१% नी झालेली दिसते. (तक्ता क्र. १)

२००४ च्या प्रमाणे विचार करता २००९ च्या लोकसभा निवडणुकीमध्ये ही महिला खासदारामध्ये उत्तर प्रदेश या राज्याने बाजी मारलेली दिसते. एकूण १२ महिला सदस्यांची वर्णी लावलेली दिसते. देशात एकूण राज्यामध्ये ही संख्या लक्षणीय आहे. तसेच २००४ च्या तुलनेत देखील ५ ने वाढ झालेली दिसते. उत्तर प्रदेश या राज्याबाबत ही सकारात्मकता दिसून येते. मुळात स्वातंत्र्य लढ्याची पाळेमुळे ज्या भागात

खणली गेली. त्या भागातून महिला सदस्य निवडून येणे. ही बाब लक्षणीय आहे. काँग्रेसचा वारसा असलेला तसेच स्वातंत्र्यलढ्यातील नेहरु गांधी सारख्या लढवय्ये तपस्वी असलेल्या प्रदेशातून महिला निवडून येणे. ही कौतुकास्पद बाब आहे.

एकूणच स्वातंत्रोत्तर कालखंडापासून एकूण खासदारमध्ये देखील उत्तरप्रदेश आघाडीवर असल्याचे दिसते आणि त्यात महिला खासदारांना देखील अनन्य साधारण महत्त्व आहे. सोनिया गांधी, मेनका गांधी, उमा भारती, उषा वर्मी, सारीका सिंह, जयप्रदा, मायवती, हेमामालीनी, साध्वी निरंजन, ज्योती अशी उल्लेखनीय नावे घेता येतील. उत्तर प्रदेश या राज्याप्रमाणेच पश्चिम बंगाल, आंध्रप्रदेश, बिहार, मध्य प्रदेश पंजाब, गुजरात, हरियाणा, छत्तिसगड या राज्यामध्ये २००४ च्या तुलनेत संख्यात्मक वाढ झालेली आहे. पश्चिम काळामध्ये ७ आंध्रप्रदेश, ५ बिहार, ४ मध्यप्रदेश, ६ पंजाब, ४ गुजरात, ४ हरियाणा, १ छत्तीसगड, प्रत्येकी २ अशी महिला खासदारांची निवड झालेली आहे. २००४ च्या तुलनेत निवडून येणाऱ्या राज्यांची संख्या कमी असली तरी महिला सदस्यांमध्ये वाढ झालेली आहे. तसेच आसाम व मेघालय या राज्यातून नविन महिला सदस्यांची वर्णी लागली आहे. तर जम्मू, काश्मिर, झारखंड, हिमाचल प्रदेश, ओरीसा, केरळ या राज्यांतून २००४ च्या तुलनेत एकही महिला सदस्य निवडून आल्या नाहीत. तसेच महाराष्ट्र, तमिळनाडू, कर्नाटक या राज्यातून महिला सदस्यांची संख्या कमी झालेली आढळते. (तक्ता क्र. २)

केंद्रशासित प्रदेशाबाबत २००४ च्या प्रमाणे २००९ मध्ये देखील एका महिला सदस्यांची वर्णी लागलेली आहे.

संशोधन विषयातील घटकानुसार २००४, २००९ या लोकसभेतील निवडणुकीप्रमाणे २०१४ ची निवडणूक अभ्यासली असता २००४ व २००९ च्या निवडणुकींची तुलना करता २०१४ च्या निवडणुकीमध्ये बरेच बदल झालेले आढळतात. हे बदल स्वातंत्र्योत्तर कालखंडापासून झालेल्या बदलामध्ये लक्षणीय आहे.

२०१४ च्या लोकसभा निवडणुकीमध्ये राज्य निहाय महिला सदस्यामध्ये एकूण २९ घटक राज्ये व ७ केंद्रशासित प्रदेशापैकी १८ घटक राज्ये व १ केंद्रशासित प्रदेशामधून महिला निवडून आल्या आहेत. २००४ व २००९ ची तुलना येणाऱ्या राज्यातून निवडून येणाऱ्या महिलांच्या संख्येत बदल झालेला आढळतो. त्यात वाढ झालेली दिसते. म्हणजेच प्रदेशनिहाय निवडून येणाऱ्या महिलांची संख्या वाढली आहे. तसेच तुलनात्मक महिला खासदाराच्या संख्येतही वाढ होताना दिसते. २००४ मध्ये ४५ महिला, २००९ मध्ये ५३ महिला तर २०१४ मध्ये त्याच्या तुलनेत ६२ महिला खासदार झाल्या आहेत. ही वाढ २००४ च्या तुलनेत ३७% नी आहे तर २००९ च्या तुलनेत २८% झालेले दिसते.

२००४ व २००९ लोकसभा निवडणुकीप्रमाणेच २०१४ मध्येही महिला खासदाराची संख्या ही महिला खासदार यांचा बालेकिल्ला असलेल्या उत्तर प्रदेशातुनच जास्त झालेली दिसते. २००४ ला ७, २००९ ला १२ तर

२०१४ मध्ये १३ महिला सदस्य निवडून आल्या आहेत. उत्तर प्रदेशाप्रमाणे २०१४ च्या निवडणुकीत पश्चिम बंगाल राज्यामध्ये महिला सदस्य चांगल्या संख्येने निवडून आलेल्या दिसतात. त्याचबरोबर महाराष्ट्र, तामिळनाडू, मध्यप्रदेश, गुजरात या राज्यातही महिला सदस्यांची संख्या चांगली आहे. तेलंगणा, उत्तराखंड यांची प्रथमत:च वर्णी लागलेली दिसते. महाराष्ट्राबाबत सुप्रिया सुळे यांनी आपला बालेकिल्ला कायम राखल्याचे दिसते. तर एकूण महाराष्ट्राबरोबर संपूर्ण भारतात प्रथमत: निवडून येणाऱ्या महिलांची संख्या अधिक आहे. जवळपास निम्मी असल्याचे दिसते.

केंद्रशासित प्रदेशाबाबत विचार केलाअसता २०१४ च्या निवडणुकीत २००४ व २००८ यांच्यानुसार दिल्लीबरोबरच चंदिगढ राज्यातही महिला खासदारांचे खाते उघडलेले दिसते. चंदिगढ मधुन किरण खेर निवडुन आल्या आहेत. २०१४ मध्ये हा महत्त्वपूर्ण बदल पहावयास मिळतो. (तक्ता क्र. ३)

**तक्ता क्र. ४.१**

**राज्यनिहाय महिला प्रतिनिधीत्व / सदस्य–२००४**

| **अ. क्र.** | **राज्य** | **सदस्य संख्या** |
|---|---|---|
| १. | उत्तर प्रदेश | ७ |
| २. | महाराष्ट्र | ५ |
| ३. | तामिळनाडू | ४ |
| ४. | पश्चिम बंगाल | ४ |
| ५. | आंध्र प्रदेश | ३ |
| ६. | बिहार | ३ |
| ७. | कर्नाटक | २ |
| ८. | केरळ | २ |
| ९. | मध्यप्रदेश | २ |
| १०. | ओरिसा | २ |
| ११. | राजस्थान | २ |
| १२. | पंजाब | २ |

| | | |
|---|---|---|
| १३. | गुजरात | १ |
| १४. | हरियाणा | १ |
| १५. | हिमाचल प्रदेश | १ |
| १६. | जम्मू काश्मिर | १ |
| १७. | छत्तीसगड | १ |
| १८. | झारखंड | १ |
| **केंद्रशासित प्रदेश** | | |
| १. | दिल्ली | १ |
| | **एकूण** | **४५** |

**तक्ता क्र. ४.२**

**राज्यनिहाय महिला प्रतिनिधित्व/ सदस्य–२००९**

| **अ.क्र.** | **राज्य** | **सदस्य संख्या** |
|---|---|---|
| १. | उत्तर प्रदेश | १२ |
| २. | महाराष्ट्र | ०३ |
| ३. | तामिळनाडू | ०२ |
| ४. | पश्चिम बंगाल | ०७ |
| ५. | आंध्र प्रदेश | ०५ |
| ६. | बिहार | ०४ |
| ७. | कर्नाटक | ०१ |
| ८. | मध्यप्रदेश | ०६ |
| ९. | राजस्थान | ०३ |

| | | |
|---|---|---|
| १०. | पंजाब | ०४ |
| ११. | गुजरात | ०४ |
| १२. | हरियाणा | ०२ |
| १३. | छत्तीसगड | ०२ |
| १४ | आसाम | ०२ |
| १५. | मेघालय | ०१ |
| **केंद्रशासित प्रदेश** | | |
| १. | दिल्ली | १ |
| | **एकूण** | **५९** |

**तक्ता क्र. ४.३**

**राज्यनिहाय महिला प्रतिनिधीत्व / सदस्य–२०१४**

| **अ. क्र.** | **राज्य** | **सदस्य संख्या** |
|---|---|---|
| १. | उत्तर प्रदेश | १३ |
| २. | महाराष्ट्र | ५ |
| ३. | तामिळनाडू | ४ |
| ४. | पश्चिम बंगाल | १२ |
| ५. | आंध्र प्रदेश | २ |
| ६. | बिहार | ३ |
| ७. | कर्नाटक | १ |
| ८. | केरळ | १ |
| ९. | मध्यप्रदेश | ५ |
| १०. | ओरिसा | २ |

| | | |
|---|---|---|
| ११. | राजस्थान | १ |
| १२. | पंजाब | १ |
| १३. | गुजरात | ४ |
| १४. | आसाम | २ |
| १५. | तेलंगना | १ |
| १६. | जम्मू काश्मिर | १ |
| १७. | छत्तीसगड | १ |
| १८. | उत्तराखंड | १ |
| **केंद्रशासित प्रदेश** | | |
| १. | दिल्ली | १ |
| २. | चंदीगड | १ |
| | **एकूण** | **६२** |

## ४.१ २००४ च्या निवडणूकची माहिती व विश्लेषण :

एकविसाव्या शतकातील भारताची ही पहिलीच निवडणूक होती. २००४ च्या लोकसभा निवडणुकीत ५४३ जागांसाठी निवडणूक झाली. ५४३ जागांपैकी ४५ महिला लोकसभेवर निवडून आल्या. तर ५४३ पैकी ३९८ पुरुष लोकसभेवर निवडून आले हे प्रमाण फारच व्यस्त आहे. कारण ८.२९% टक्के महिला खासदार झाल्या तर पुरुषाचे प्रमाण ९१.७ टक्के आहे. (पहा तक्ता क्र. १) संपूर्ण भारतातून ४५ मतदारसंघातून महिला निवडून आल्या होत्या.

**तक्ता क्र. ४.४**

**महिला पुरुष घटकांनुसार खासदारांचे वर्गीकरण (२००४)**

| अ.क्र. | प्रकार | खासदाराची संख्या | टक्के |
|---|---|---|---|
| १. | महिला | ४५ | ८.२९% |
| २. | पुरुष | ४९८ | ९१.७% |
| | **एकूण** | **५४३** | **१००** |

**आलेख क्र. ४.१**




**टिप : तक्ता क्र. ४.४ नुसार बनवलेला आलेख**

**तक्ता क्र. ४.५**

**केंद्रिय लोकसभेतील मतदारसंघ निहाय महिला सदस्य (२००४)**

| **अ. क्र.** | **मतदार संघ** | **महिला सदस्यांची नावे** |
|---|---|---|
| १. | भापताला(आंध्र प्र.) | दग्गुबती पुरंदरेश्वरी |
| २. | खम्माम(आंध्र प्र.) | रेणुका चौधरी |
| ३. | सहरसा (बिहार) | रणजीत रंजन |
| ४. | अराह (बिहार) | क्रांती सिंह |
| ५. | ससराम (बिहार) | मीरा कुमार |
| ६. | वडोदरा (गुजरात) | जयाबेन ठक्कर |
| ७. | अंबाला (हरियाणा) | सेलजा |
| ८. | मंडी (हिमालय प्रदेश) | प्रतिभा सिंह |
| ९. | अनंतनाग (जम्मु आणि कश्मिर) | मेहबुबा मुफ्ती |
| १०. | कनकपुरा (कर्नाटक) | तेजस्विनी शो. रमेश |
| ११. | उडपी (कर्नाटक) | मनोरमा माधवराज |

| | | |
|---|---|---|
| १२. | बदागरा (केरळ) | पी. सथ्थेदेवी |
| १३. | मावेलीकर (केरळ) | सी. एस. सुजाया |
| १४. | सेओनी (मध्य प्रदेश) | नीता पतेरिया |
| १५. | इंदोर (मध्य प्रदेश) | सुमित्रा महाजन |
| १६. | वाशिम (महाराष्ट्र) | भावना गवळी |
| १७. | हिंगोली (महाराष्ट्र) | सूर्यकांता पाटील |
| १८. | लातूर (महाराष्ट्र) | पाटील निलेगेकर रुपाताई |
| १९. | उस्मानाबाद (महाराष्ट्र) | नरहिरे कल्पना |
| २०. | इचलकरंजी (महाराष्ट्र) | निवेदिता माने |
| २१. | केंद्रपारा (ओरिसा) | अर्चना नायक |
| २२. | बोलांनगिर (ओरिसा) | संगीता कुमारी सिहदेव |
| २३. | पटियाला (पंजाब) | परिजित कौर |
| २४. | भेटिडा (पंजाब) | परमजीत कौर गुलशन |
| २५. | उदयपूर (राजस्थान) | किरण महेश्वरी |
| २६. | जालोरे (राजस्थान) | बी. सुशीला |
| २७. | आसीपुरम (तामिळनाडू) | रानी के. |
| २८. | तिरुचनगोडे (तामिळनाडू) | सुब्बलक्ष्मी जगदेसन |
| २९. | रामनाथपुरम (तामिळनाडू) | भवानी राजेंथरन एम. एस. के. |
| ३०. | तिरुचेंदूर (तामिळनाडू) | राधिका सेलवी व्ही |
| ३१. | रामपूर (उत्तर प्रदेश) | जयाप्रदा |
| ३२. | पिलभीत (उत्तर प्रदेश) | मनेका गांधी |
| ३३. | हारडोई (उत्तर प्रदेश) | उषा वर्मा |
| ३४. | रायबरेली (उत्तर प्रदेश) | सोनिया गांधी |
| ३५. | अकबरपूर (उत्तर प्रदेश) | मायावती |
| ३६. | बहरीय (उत्तर प्रदेश) | रुबाब सयेदा |
| ३७. | खैराना (उत्तर प्रदेश) | अनुराधा चौधरी |

| | | |
|---|---|---|
| ३८. | जलपैगुरी (पश्चिम बंगाल) | मिनाती सेन |
| ३९. | कृष्णानगर (पश्चिम बंगाल) | ज्योर्तीमयी सिकंदर |
| ४०. | कलकत्ता दक्षिण (पश्चिम बंगाल) | ममता बॅनर्जी |
| ४१. | विष्णूपूर (पश्चिम बंगाल) | सुस्मिता बोरी |
| ४२. | जंजीर (झारखंड) | करुणा शुक्ला |
| ४३. | खुंती (झारखंड) | सुशीला केरकट्टा |
| ४४. | करोलबाघ (दिल्ली) | कृष्णा तिराह |
| ४५. | नेल्लोर (आंध्र प्रदेश) | पनाबाका लक्ष्मी |

२००४ च्या लोकसभा निवडणुकीत कोणत्याही एका पक्षाला बहुमत प्राप्त झाले नव्हते. यू.पी.ए. (UPA) चे आघाडी सरकार स्थापन झाले होते. असे असेल तरी सर्वाधिक कॉंग्रेस पक्षाकडून १२ महिला निवडून आल्या होत्या.

**तक्ता क्र. ४.६**

**महिला खासदारांचे पक्षनिहाय वर्गीकरण (२००४)**

| अ. क्र. | पक्ष | महिला सदस्यांची नावे |
|---|---|---|
| १. | कॉंग्रेस | दगुबती पुरंदरेश्वरी |
| २. | कॉंग्रेस | रेणुका चौधरी |
| ३. | कॉंग्रेस | मीरा कुमार |
| ४. | कॉंग्रेस | सेलजा |
| ५. | कॉंग्रेस | प्रतिभा सिंह |
| ६. | कॉंग्रेस | तेजस्विनी शो रमेश |
| ७. | कॉंग्रेस | परिजीत कौर |
| ८. | कॉंग्रेस | रानी के. |
| ९. | कॉंग्रेस | सोनिया गांधी |
| १०. | कॉंग्रेस | सुशीला केरकट्टा |

| | | |
|---|---|---|
| ११. | काँग्रेस | पनाबाका लक्ष्मी |
| १२. | राष्ट्रवादी काँग्रेस | सूर्यकांता पाटील |
| १३. | राष्ट्रवादी काँग्रेस | निवेदिता माने |
| १४. | लोकजनशक्ती पक्ष | रणजीत रंजन |
| १५. | राष्ट्रीय जनता दल | क्रांती सिंह |
| १६. | जम्मु कश्मिर पिपिल्स डेमॉक्रेटी पार्टी | मेहबुबा मुफ्ती |
| १७. | कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया(मार्क्ससिस्ट) | पी. सथ्थेदेवी |
| १८. | कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया(मार्क्ससिस्ट) | सी. एस. सुजाया |
| १९. | बिजू जनता दल | अर्चना नायक |
| २०. | शिरोमणी अकाली दल | परमजीत कौर गुलशन |
| २१. | द्रविड मुन्नेत्र कळघम | सुब्बलक्ष्मी जगदेसन |
| २२. | द्रविड मुन्नेत्र कळघम | भवानी राजेंथरन एम. एस. के. |
| २३. | द्रविड मुन्नेत्र कळघम | राधिका सेलवी |
| २४. | समाजवादी पक्ष | जयाप्रदा |
| २५. | समाजवादी पक्ष | उषा वर्मा |
| २६. | बहुजन समाज पक्ष | मायावती |
| २७. | भारतीय जनता पक्ष | जयाबेन ठक्कर |
| २८. | भारतीय जनता पक्ष | मनोरमा माधवराज |
| २९. | भारतीय जनता पक्ष | नीता पतेरिया |
| ३०. | भारतीय जनता पक्ष | सुमित्रा महाजन |
| ३१. | भारतीय जनता पक्ष | पाटील रुपाताई निलेंगेकर |
| ३२. | भारतीय जनता पक्ष | संगीता कुमारी सिहदेव |
| ३३. | भारतीय जनता पक्ष | किरण महेश्वरी |
| ३४. | भारतीय जनता पक्ष | बी. सुशिला |

| | | |
|---|---|---|
| ३५. | भारतीय जनता पक्ष | मनेका गांधी |
| ३६. | भारतीय जनता पक्ष | करुणा शुक्ला |
| ३७. | ऑल इंडिया तृणमूल कॉंग्रेस | ममता  बॅनर्जी |
| ३८. | कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया(मार्क्ससिस्ट) | मिनाती सेन |
| ३९. | कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया(मार्क्ससिस्ट) | ज्योर्तिमयी सिकंदर |
| ४०. | कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया(मार्क्ससिस्ट) | सुस्मिता बौरी |
| ४१. | कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया(मार्क्ससिस्ट) | अनुराधा चौधरी |
| ४२. | कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया(मार्क्ससिस्ट) | रुबाब सयेदा |
| ४३. | शिवसेना | कल्पना नरहिरे |
| ४४. | शिवसेना | भावना गवळी |
| ४५. | कॉंग्रेज | कृष्णा तिराह |

**महाराष्ट्रातील महिला खासदार – २००४**

१) सूर्यकांता पाटील

२) निवेदिता माने

३) रुपाताई पाटील निलंगेकर

४) भावना गवळी

५) कल्पना नरहिरे

**तक्ता क्र. ४.७**

**२००४ – महिला खासदार पक्ष**

| | |
|---|---|
| कॉंग्रेस | १२ |
| भाजप | १० |
| सप | ०३ |
| बसपा | ०१ |

| | |
|---|---|
| जनता दल (यू) | |
| सी.पी.एम | ०५ |
| राष्ट्रवादी काँग्रेस | ०२ |
| शिवसेना | ०२ |
| डी.एम.के. | ०३ |
| ऑल इंडिया तृणमूल काँग्रेस | ०१ |
| इतर | ०६ |
| | **४५** |

**आलेख क्र. ४.२**




तक्ता क्र. ४.७ वरुन २००४ च्या लोकसभा निवडणुकीत सर्वात जास्त काँग्रेस पक्षाकडून महिला खासदार निवडून आल्या होत्या. त्याचप्रमाणे भाजप पक्षाकडून ही महिलांची संख्या लक्षणीय आहे. कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (मार्क्सिसिस्ट) या पक्षाकडून ही महिला खासदारांची संख्या विशेष आहे. महाराष्ट्रातून राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेना या पक्षाकडून प्रत्येकी दोन महिला खासदारांची निवड झाल्याची दिसते. तर ड.एम.के. व समाजवादी पक्षाकडून प्रत्येकी तीन महिला खासदारांची निवड झाली आहे. बहुजन समाजवादी पक्ष ऑल इंडिया तृणमूल काँग्रेस या दोन पक्षांना एका वरतीच समाधान मानावे लागले आहे.

## तक्ता क्र. ४.८

## महिला खासदारांना मिळालेली मते (२००४)

| अ.क्र. | महिला सदस्यांची नावे | मिळालेली मते |
|---|---|---|
| १. | दग्गुबती पुरंदरेश्वरी | ४,११,०९९ |
| २. | रेणुका चौधरी | ५,१८,०४७ |
| ३. | रणजीत रंजन | ३,५०,४२६ |
| ४. | क्रांती सिंह | २,९९,४२२ |
| ५. | मीरा कुमार | ४,१६,६७३ |
| ६. | जयाबेन ठक्कर | ३,१६,०८९ |
| ७. | सेलजा | ४,१५,२६४ |
| ८. | प्रतिभा सिंह | ३,७५,६२३ |
| ९. | मेहबुबा मुफ्ती | ७४,४३६ |
| १०. | तेजस्विनी शो. रमेश | ५,८४,२३८ |
| ११. | मनोरमा माधवराज | ३,६९,६२७ |
| १२. | पी. सथ्थेदेवी | ४,२९,२९४ |
| १३. | सी. एस. सुजाया | २,७८,२८१ |
| १४. | नीता पतेरिया | २,६८,१९५ |
| १५. | सुमित्रा महाजन | ५,०८,१०७ |
| १६. | भावना गवळी | ३,५८,६८२ |
| १७. | सूर्यकांता पाटील | ३,२७,९४४ |
| १८. | पाटील निलंगेकर रुपाताई | ४,०४,५४४ |
| १९. | नरहिरे कल्पना | २,९४,४३६ |
| २०. | निवेदिता माने | ४,२२,२७२ |
| २१. | अर्चना नायक | ४,५३,२७६ |
| २२. | संगीता कुमारी सिहदेव | ३,२२,९१२ |

| | | |
|---|---|---|
| २३. | परिजित कौर | ४,०९,९१७ |
| २४. | परमजीत कौर गुलशन | ३,२३,३९४ |
| २५. | किरण महेश्वरी | ३,९८,०५९ |
| २६. | बी. सुशीला | ३,२१,२२५ |
| २७. | रानी के. | ३,८४,१७० |
| २८. | सुब्बलक्ष्मी जगदेसन | ५,०१,५६९ |
| २९. | भवानी राजेंथरन एम. एस. के. | ३,३५,२८७ |
| ३०. | राधिका सेलवी व्ही | ३,९४,४८४ |
| ३१. | जयाप्रदा | २,८९,३९० |
| ३२. | मेनका गांधी | २,५५,६१५ |
| ३३. | उषा वर्मा | २,०३,४४५ |
| ३४. | सोनिया गांधी | ३,७८,१०७ |
| ३५. | मायावती | ३,२५,०१७ |
| ३६. | रुबाब सयेदा | १,१८,९४९ |
| ३७. | अनुराधा चौधरी | ५,२३,९२३ |
| ३८. | मिनाती सेन | ४,२४,१६३ |
| ३९. | ज्योर्तीमयी सिकंदर | ३,९७,५६१ |
| ४०. | ममता बॅनर्जी | ३,९३,५७१ |
| ४१. | सुस्मिता बोरी | ५,१८,५०७ |
| ४२. | करुणा शुक्ला | ३,०६,६५५ |
| ४३. | सुशीला केरकट्टा | २,१८,१५८ |
| ४४. | कृष्णा तिराह | १,३८,५९६ |
| ४५. | पनाबाका लक्ष्मी | ५,५०,१२९ |

**तक्ता क्र. ४.९**

**महिला खासदाराचे प्रवर्गानुसार वर्गीकरण (२००४)**

| अ.क्र. | महिला सदस्यांची नावे | प्रवर्ग |
|---|---|---|
| १. | दग्गुबती पुरंदरेश्वरी | साधारण |
| २. | रेणुका चौधरी | साधारण |
| ३. | रणजीत रंजन | साधारण |
| ४. | क्रांती सिंह | साधारण |
| ५. | मीरा कुमार | अनुसुचित जाती |
| ६. | जयाबेन ठक्कर | साधारण |
| ७. | सेलजा | अनुसुचित जाती |
| ८. | प्रतिभा सिंह | साधारण |
| ९. | मेहबुबा मुफ्ती | साधारण |
| १०. | तेजस्विनी शो. रमेश | साधारण |
| ११. | मनोरमा माधवराज | साधारण |
| १२. | पी. सथ्थेदेवी | साधारण |
| १३. | सी. एस. सुजाया | साधारण |
| १४. | नीता पतेरिया | साधारण |
| १५. | सुमित्रा महाजन | साधारण |
| १६. | भावना गवळी | साधारण |
| १७. | सूर्यकांता पाटील | साधारण |
| १८. | पाटील निलंगेकर रुपाताई | साधारण |
| १९. | नरहिरे कल्पना | अनुसुचित जाती |
| २०. | निवेदिता माने | साधारण |
| २१. | अर्चना नायक | साधारण |
| २२. | संगीता कुमारी सिहदेव | साधारण |
| २३. | परिजित कौर | साधारण |

| | | |
|---|---|---|
| २४. | परमजीत कौर गुलशन | अनुसुचित जाती |
| २५. | किरण महेश्वरी | साधारण |
| २६. | बी. सुशीला | अनुसुचित जाती |
| २७. | रानी के. | अनुसुचित जाती |
| २८. | सुब्बलक्ष्मी जगदेसन | साधारण |
| २९. | भवानी राजेंथरन एम. एस. के. | साधारण |
| ३०. | राधिका सेलवी व्ही | साधारण |
| ३१. | जयाप्रदा | साधारण |
| ३२. | मेनका गांधी | साधारण |
| ३३. | उषा वर्मा | अनुसुचित जाती |
| ३४. | सोनिया गांधी | साधारण |
| ३५. | मायावती | अनुसुचित जाती |
| ३६. | रुबाब सयेदा | साधारण |
| ३७. | अनुराधा चौधरी | साधारण |
| ३८. | मिनाती सेन | साधारण |
| ३९. | ज्योर्तीमयी सिकंदर | साधारण |
| ४०. | ममता बॅनर्जी | साधारण |
| ४१. | सुस्मिता बोरी | अनुसुचित जाती |
| ४२. | करुणा शुक्ला | साधारण |
| ४३. | सुशीला केरकट्टा | अनुसुचित जाती |
| ४४. | कृष्णा तिराह | अनुसुचित जाती |
| ४५. | पनाबाका लक्ष्मी | अनुसुचित जाती |

**आलेख क्र. ४.३**




२००४ च्या लोकसभा निवडणुकीमध्ये एकूण महिला खासदारांपैकी (४५) साधारण प्रवर्ग यांची संख्या लक्षणीय आहे. अनुसुचित जाती या प्रवर्गाची संख्या बारा आहे. तर अनुसुचित जमातीची संख्या अगदी नगण्य केवळ एक आहे. (तक्ता क्र. ४.९)

## ४.२) २००९ च्या निवडणूकीची माहिती व विश्लेषण :

२००९ च्या लोकसभा निवडणुकीत ५४३ जागासाठीच निवडणूक झाली. ५४३ जागांपैकी ५९ महिला लोकसभेवर निवडून आल्या तर ५४३ पैकी ४८४ पुरुष लोकसभेवर निवडून आले हे प्रमाण २००४ च्या निवडणुकीप्रमाणेच फारच व्यस्त आहे. कारण १०.८% महिला खासदार झाल्या तर पुरुषांचे प्रमाण ८९.१३% आहे. (पहा तक्ता क्र. ४.१०) संपूर्ण भारतातून ५९ मतदारसंघातून महिला निवडून आल्या आहेत.

**तक्ता क्र. ४.१०**

**महिला पुरुष घटकानुसार खासदारांचे वर्गीकरण (२००९)**

| अ.क्र. | प्रकार | खासदारांची संख्या | टक्के |
|---|---|---|---|
| १. | महिला | ५९ | १०.८% |
| २. | पुरुष | ४८४ | ८९.१३% |
| | एकूण | ५४३ | १००% |

आलेख क्र. ४.४




तक्ता क्र. ४.११

केंद्रिय लोकसभेतील मतदारसंघ निहाय महिला सदस्य (२००९)

| अ. क्र. | मतदार संघ | महिला सदस्यांची नावे |
|---|---|---|
| १. | मेडक (आंध्रप्रदेश) | विजयाशांती एन. |
| २. | विशाखापट्टणम(आंध्रप्रदेश) | डी. पुरंदेरेश्वरी |
| ३. | व्हिझीयानागाराम(आंध्रप्रदेश) | बी. झांशी |
| ४. | सिक्राकुलम(आंध्रप्रदेश) | के. कृपारानी |
| ५. | भापताला (आंध्रप्रदेश) | पनाबाका लक्ष्मी |
| ६. | सासराम (बिहार) | मीरा कुमार |
| ७. | उजियापूर (बिहार) | अश्वमेधदेवी |
| ८. | अराह (बिहार) | मिनासिंग |
| ९. | शेओहर (बिहार) | रमादेवी |
| १०. | दाहोड (गुजरात) | प्रभाबेन किशोरसिंह ताविद |
| ११. | मेहसाणा (गुजरात) | जयश्रीबेन कनुभाई पटेल |
| १२. | कच्छ (गुजरात) | पूनमबेन जाट |

| | | |
|---|---|---|
| १३. | सूरत (गुजरात) | दर्शनाबेन जरदोस |
| १४. | अंबाला (हरियाणा) | सेलजा |
| १५. | भिवानी महेंद्रगड (हरियाणा) | सृष्टी चौधरी |
| १६. | बेल्लारी (कर्नाटक) | जे. शांथा |
| १७. | मंदसोर (मध्य प्रदेश) | मिनाक्षी नटराजन |
| १८. | ग्वाल्हेर (मध्य प्रदेश) | यशोदाराजे सिंधिया |
| १९ | शहाडोल (मध्य प्रदेश) | राजेशनंदिनी सिंह |
| २० | इंदोर (मध्य प्रदेश) | सुमित्रा महाजन |
| २१. | बेतुल (मध्य प्रदेश) | ज्योती दुर्वे |
| २२. | विदेशा (मध्य प्रदेश) | सुषमा स्वराज |
| २३. | बारामती (महाराष्ट्र) | सुप्रिया सुळे |
